जी ४९
५६
for approval
Feb 07.
T/2483
255 Rewarded
आ ४९४

उपनिषद्-भाषान्तरमाला.

# श्रीबृहदारण्यकोपनिषद्.

याचें

## मराठी भाषान्तर.

खंड २.] अध्याय ३ रा. [भाग १.

विद्यापरायण काशीनाथ बाळकृष्ण मराठे, एल्.एल्. बी.
भगवानदास पुरुषोत्तमदास संस्कृत स्कॉलर
ह्यांणीं केलेलें.

विष्णु काशीनाथ मराठे
यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

Registered under Government of India's
Act XXV of 1867.

All rights reserv

Printe

# प्रस्तावना.

अत्यन्त शुद्ध, सरळ सुबोध व खुलाशाच्या टीपांसहित ती० काशिनाथ बाळकृष्ण मराठे, भगवानदास पुरुषोत्तमदास संस्कृतस्कॉलर यांनीं केलेलें भाषान्तर विद्वज्जनांस अर्पण करीत आहोंत. तें छापून सर्व लोकांस उपयोगी होण्याकरितां विद्याभिवृद्धि करूं इच्छिणारे उदार आश्रयदाते व बुभुत्सु लोक आश्रय देतील अशी आशा बाळगतों. हा बृहदारण्यकाच्या दुसरा खंडाचा पहिला भाग आहे. दुसरा भाग ( अध्याय ४ ) लौकरच छापून तयार होईल. तातपादांनीं अत्यंत परिश्रमानें हें भाषांतर केलें असून अद्वैतज्ञानाचा प्रसार होऊन देशबांधवांनीं परमार्थाचा विचार करावा ह्मणून ह्या अध्यायाची किंमत अगदीं अल्प ८८ आणे ठेविली आहे.

पुणें,
पेठ सदाशिव
घर नंबर ७८४.

विष्णु काशिनाथ मराठे,

ए|२४३

# खंड २, भाग १.

## ( अध्याय ३ )

### अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| उपोद्घात .... | झ–ढ |
| अश्वल ब्राह्मण––मृत्युमुक्ति .... | १ |
| आर्तभाग ब्राह्मण––ग्रहातिग्रहमुक्ति .... | १३ |
| भुज्यु ब्राह्मण—पारिक्षितमुक्ति .... | २२ |
| उषस्त ब्राह्मण––सर्वान्तर आत्मा .... | ३२ |
| कहोल ब्राह्मण––सर्वान्तरज्ञानानें एषणात्याग .... | ३६ |
| गार्गी ब्राह्मण—अक्षर .... | ४६ |
| उद्दालक ब्राह्मण—अन्तर्यामी .... | ४८ |
| दुसरें गार्गी ब्राह्मण––प्रशास्तृ–अक्षर .... | ५५ |
| शाकल्य ब्राह्मण—शारीरक ( प्राण ) .... | १४ |

# उपोद्घात.

## ( अध्याय ३, )

अश्वल, आर्तभाग जारत्कारव, भुज्यु लाह्यायनि, उषस्त चाक्रयण, कहोल कौषीतकेय, गार्गी वाचक्नवी, उद्दालक आरुणि, शाकल्य विदग्ध, याज्ञवल्क्य, व कुरु पाञ्चाल देशांतील अनेक विद्वान् ब्राह्मण, सार्वभौम वैदेह जनक राजा बहुदक्षिण ( अश्वमेध ) यज्ञ उरकून दक्षिणा वाटीत होता, त्यासमयीं एकत्र जमले होते. त्यांमध्यें मोठा विद्वान् ब्रह्मवादी कोण आहे, हें जाणण्याकरितां एक सहस्र सुवर्णपदकांनीं श्रृंगारलेल्या उत्तम गायी जो कोणी उत्तम ब्रह्मनिष्ठ असेल त्यास देईन अशी जनक राजानें प्रतिज्ञा केली, ती सर्वांनीं ऐकली, तरी पुढें होऊन त्या गायी ग्रहण कराव्या, असें कोणाच्याहि मनांत येईना; ह्मणून याज्ञवल्क्य ऋषीनें आपला शिष्या सामश्रवा ( सामवेद शिकणारा ) ह्यास त्या गायी घेऊन जाण्यास सांगितलें. याज्ञवल्क्य हा मोठा ब्रह्मवादी असावा असा सर्वांस विस्मय जाहला. त्याच्या विद्वत्तेची परीक्षा करावी, ह्मणून, अश्वलादिक आठ ऋषींनीं त्यास वेदान्त विषयांतील मुख्य तत्वांविषयीं प्रश्न केले. त्यां सर्वांचीं याज्ञवल्क्यानें समाधानकारक उत्तरें देऊन आपलें श्रेष्ठत्व सिद्ध केलें. प्रश्न करणारांनीं अत्यन्त बिकट प्रश्न केले, तरी याज्ञवल्क्य ऋषि महाविद्वान् असल्यामुळें, त्यानें खात्रीलायक उत्तरें दिलीं हा विषय ह्या बृहदारण्यकाच्या तिसऱ्या अध्यायांत आहे. बृहदारण्यक उपनिषदाचे कालमानाविषयीं वगैरे विचार प्रथमाध्यायाचे आरंभीं करण्यांत आले आहेत.

## ब्राह्मण १.

अश्वल प्रश्नांतील मुख्य मुद्दे असे आहेत कीं, संसारांत पडलेल्या सर्व मनुष्यांस कर्मासक्ति उत्पन्न होत असल्यामुळें, व संसार आणि तदन्तर्गत सर्व कर्में अत्यन्त अशाश्वत असल्यामुळें तदासक्त आत्म्याला जन्मपरंपरेचें बन्धन पडतें. तो संसार आणि तीं कर्में मृत्युस्वरूप आहेत. त्यांतून मुक्ति कशी मिळणार? हा पहिला प्रश्न. त्या प्रश्नाला याज्ञवल्क्यानें उत्तर दिलें कीं, यज्ञासारखीं नित्यकर्में करीत असतांना यजमानानें आपण होतृस्वरूप, अग्निस्वरूप, अथवा वाग्देवतारूप आहों, अशी दृष्टि ठेविली असतां तो मुक्तच असतो, अतिमुक्त होतो. या उत्तरांत मुक्ति व अतिमुक्ति असे मुक्तीचे विभाग केले आहेत. मीं यज्ञकर्म करणारा होता ऋत्विज आहे, अग्निसाहाय्यानें यज्ञ करीत आहे, व वाणीचा योग्य उपयोग करीत आहे, वगैरे भावना ठेविली असतां स्वर्गादिक लोकांप्रत यजमान जातो, ही साधारण मुक्ति होय; पण वाणी तोच होता, व अग्नि तीच वाग्देवता, आणि मीं देवतारूप आहें अशी दृष्टि ठेविली असतां अत्यन्त मुक्ति अथवा साक्षात् ब्रह्मप्राप्ति होऊन संसाराचा व कर्मांचा मुळींच संबंध राहत नाहीं.

अश्वलानें दुसरा प्रश्न असा केला कीं, कालाचीं दोन स्वरूपें आहेत—( १ ) अहोरात्रस्वरूपीं काल आहे, त्याच्या योगें सर्व कर्में व कर्मसाधनें क्षीयमाण होत असतात; व तो कालच मृत्यु आहे. त्यांतून मुक्ति व अतिमुक्ति कशी होते ? याज्ञवल्क्यानें उत्तर दिलें कीं, यज्ञकर्त्यानें

अध्वर्यु ऋत्विज्, व अध्वर्यूच्या नात्यानें आपले डोळे व डोळ्यांचा अधिपति आदित्य, हीं तिन्हीं एकच आहेत, व अध्वर्यु, डोळा, व आदित्य आपणच आहोंत अशी दृष्टि ठेविली असतां जी मुक्ति प्राप्त होते, तीच अतिमुक्ति. ह्या उत्तराचा भावार्थ पूर्वीं प्रमाणेंच भाष्यकारांनीं दाखविला आहे.

अश्वलानें तिसरा प्रश्न असा केला कीं, ( ३ ) चालू मानानें तिथि व शुक्ल कृष्ण पक्ष येतात, तत्स्वरूपी काल मृत्यूच होय. त्यांतून मुक्ति कशी होईल ? याज्ञवल्क्यानें उत्तर दिलें कीं, उद्गाता ऋत्विज्, प्राण वायु, व वायुदेवता आपणच आहों, असें मानलें असतां मुक्ति व अतिमुक्ति प्राप्त होते.

अश्वलानें चौथा प्रश्न असा केला कीं, स्वर्ग प्राप्ति होते, त्या स्वर्गावर चढण्यास निराधार अन्तरिक्षामध्यें निश्चित मार्ग दिसत नाहीं. मार्ग असल्यास तो कोणता ? याज्ञवल्क्यानें उत्तर दिलें, ब्रह्माऋत्विज्, मन, आणि चन्द्र एतद्रूप आपण आहों, असें मानिलें ह्मणजे त्या दृष्टीच्याद्वारें स्वर्गावर चढतां येतें.

सदरीं मुक्तीचे मार्ग सांगितले; पण इहलोकीं यज्ञादिक कर्मं करतांना याज्ञिकांच्या कांहीं समजुती असतात, ह्या समजुतींना संपत्ति ( संपादणुकी ) ह्मणतात. त्यासंबंधानें अश्वलानें चार प्रश्न केले.

पहिला प्रश्न—होताऋत्विज कांहीं विशिष्ट ऋचा ह्मणत असतो, त्या ऋचा कोणत्या ? व त्या ऋचा ह्मटल्यापासून काय मिळतें, ह्मणून समजत असते ? याज्ञवल्क्यानें उत्तर दिलें कीं, होता पुरोनुवाक्या नांवाचा ऋक्समुदाय, याज्या नावाचा ऋक्समुदाय, व शस्या नांवाचा ऋक्समुदाय ह्मणत असतो; व ह्या ऋचा ह्मटल्यानें त्रैलोक्य आपल्या स्वाधीन राहील असें मानीत असतो.

प्रश्न दुसरा—अध्वर्यु कांहीं विशिष्ट आहुति देत असतो, त्या कोणत्या ? व त्या आहुति दिल्यापासून त्यास काय प्राप्त होतें ? याज्ञवल्क्यानें उत्तर दिलें कीं, लखलखीत जळणाऱ्या आहुति आहेत, कांहीं आवाज करणाऱ्या आहुति आहेत, व तळाशीं जाणाऱ्या कांहीं आहेत, पैकीं दीप्तिमान् आहुति दिल्यापासून देवलोक प्राप्त होतो; दुःखसूचक आवाज करणाऱ्या आहुतीपासून पितृलोक प्राप्त होतो, व तळाशीं जाणाऱ्या आहुति दिल्यापासून पृथ्वीलोक प्राप्त होतो असें अध्वर्यु समजतो.

तिसरा प्रश्न—यज्ञाच्या दक्षिण भागीं बसणारा ब्रह्माऋत्विज कोणत्या देवतेचें आव्हान करून यज्ञ रक्षण करितो ? याज्ञवल्क्यानें उत्तर दिलें, तो अनंत मनोदेवतेचें ध्यान करून अनंत विश्वेदेवांचा लोक मिळेल असें समजतो.

चौथा प्रश्न—उद्गाता ऋत्विज् कोणत्या ऋचा ह्मणतो ? आणि त्यापासून त्यास काय प्राप्त होतें ? त्यास याज्ञवल्क्यानें उत्तर दिलें कीं, तोही सामवेदाच्या छंदानें पुरोनुवाक्या नांवाचा ऋक्समुदाय, याज्या नांवाचा ऋक्समुदाय, व शस्या नांवाचा ऋक्समुदाय ह्मणतो, व त्या ऋचा ह्मटल्यापासून प्राण, अपान, व्यान वायूंचा निरोध होऊन स्वर्ग प्राप्त होतो.

ह्याप्रमाणें यज्ञादिक नित्य कर्मांमध्यें त्या त्या प्रसंगीं, त्या त्या ऋत्विजांविषयीं, ऋचा विषयीं, आहुतीविषयीं, व इतर कर्माविषयीं अलौकिक देवतादृष्टि व समजूत ठेविली असतां स्वर्गप्राप्तिरूप मुक्ति व अतिमुक्ति प्राप्त होते, असा या ब्राह्मणाचा सारांश आहे.

## ब्राह्मण २,

आर्तभाग ऋषीनें प्रश्न केला कीं, एकंदर कर्मांशीं आपला जो संबंध आहे तो कित्येक ग्रहांनीं व अतिग्रहांनीं उत्पन्न केलेला आहे, आणि हे ग्रहातिग्रह जर मृत्युरूप संसारसंबंधाला कारण आहेत, तर ते ग्रह व अतिग्रह किती आहेत? व त्यांपासून मुक्ति व अतिमुक्ति कशी होईल. याज्ञवल्क्यानें उत्तर दिलें कीं, ग्रह आठ, व अतिग्रह आठ आहेत. ( १ ) घ्राणेन्द्रिय ग्रह अपान वायुरूप अतिग्रहानें बद्ध असून गन्धज्ञान देतो. ( २ ) वाणी हा ग्रह असून संज्ञारूप शब्दातिग्रहानें बद्ध आहे, त्याचे योगानें शब्दज्ञान होतें. ( ३ ) जिव्हा हा ग्रह असून रसज्ञान देण्यास रस अतिग्रह आहे. ( ४ ) नेत्र हा ग्रह असून रूपज्ञान देणारें रूप हा अतिग्रह आहे. ( ५ ) कान हा ग्रह असून ध्वनिज्ञान देणारा ध्वनि हा अतिग्रह आहे. ( ६ ) मन हा ग्रह असून कामाभिनिवेश उत्पन्न करणारा काम अतिग्रह आहे. (७) हात हा ग्रह असून क्रियाशक्ति देणारा कर्मरूप अतिग्रह आहे. ( ८ ) त्वचा हा ग्रह असून स्पर्शज्ञान देणारा स्पर्श अतिग्रह आहे.

आर्तभागानें दुसरा प्रश्न असा केला कीं, एकंदर संसार मृत्यूचें अन्न आहे, पण मृत्यूला खाणारी एखादी देवता आहे कीं नाहीं? अग्नि सर्व भक्षक असून त्याला शान्त करणारें उदक आहेच; ह्याप्रमाणें मृत्यूचा नाश करणारी देवता कोणती? याज्ञवल्क्यानें उत्तर दिलें कीं, मृत्यूचा नाश करणारी देवता आत्मा होय. ह्या प्रश्नांत मृत्यूचा मृत्यु आहे असें ह्मटल्यास मृत्यूच्या मृत्यूचाही मृत्यु असला पाहिजे, अशी अनवस्था होऊन याज्ञवल्क्य घोटाळ्यांत पडेल असें आर्तभागास वांटल्यावरून त्यानें मोठा बिकट प्रश्न केला; परंतु सर्व गोष्टींचा विनाशक, व स्वतः अमृत स्वरूप आत्मा आहे, त्याचें ज्ञान झालें असतां विनाश पावणाऱ्या सर्व वस्तु मिथ्या ठरतील, अशा आशयानें याज्ञवल्क्यानें उत्तर दिलें.

आर्तभागानें पुनः प्रश्न केला कीं, हा देह मृत झाल्यावर आत्मा उठून जातो कीं नाहीं? याज्ञवल्क्यानें उत्तर दिलें कीं सर्वव्यापी ज्ञानी आत्मा उठून दुसरीकडे जाण्यास काहींच कारण नाहीं. त्यावर आर्तभागानें विचारिलें कीं, देह मृत झाल्यावर आत्म्याला सुटत नाहीं तें काय? याज्ञवल्क्यानें सांगितलें कीं, कांहीं काळ पर्यंत नाम सुटत नाहीं. नामशेष राहतो. मग आत्मानुषंगी देहाची काय व्यवस्था होते? हे विचारल्यावरून याज्ञवल्क्यानें सांगितलें कीं वाणी अग्नीप्रत, प्राण वायूप्रत, डोळे आदित्याप्रत, मन चंद्राप्रत, कान दिशाप्रत, शरीर पृथ्वीप्रत, हृदय आकाशाप्रत, अंगावरील लव औषधीप्रत, केस वनस्पतीप्रत, रक्त व रेत उदकाप्रत जातात; आणि कर्मानुषंगी आत्मा पुण्यकर्मानें पुण्यरूप, व पापकर्मानें पापरूप होतो.

## ब्राह्मण ३,

नंतर लाह्यायनि भुज्यूनें याज्ञवल्क्याशीं वाद केला. त्यांत अश्वमेधयाजी पारिक्षित (अन्तरिक्ष गोलाच्या पलीकडे असणारे) कोठें जातात? ह्या प्रश्नावरून सूर्याच्या रथाच्या

दैनिक गतीनें मापलेल्या प्रदेशाचे बत्तीसपट पृथ्वीलोक पसरला आहे, त्याचें भोंवती दुप्पट मापाचा समुद्र आहे, त्याच्या पलीकडे क्षितिज वस्त्र्याच्या धारेइतकें किंवा माशीच्या पंखाइतकें बारीक आहे. तेथपर्यंत अश्वमेधयाजी जीवात्मे पक्षिरूपानें इन्द्र घेऊन जातो, आणि त्या बारीक क्षितिजांतून त्यांस वायु आपलें रूप देऊन पलीकडे नेतो. तो वायु व्यष्टिसमष्टिरूप मनांत आणिला असतां मृत्यूपासून मुक्ति होते.

## ब्राह्मण ४.

उषस्त चाक्रायण ऋषीनें सर्वांच्या अभ्यन्तरीं सर्वान्तर आत्मा कसा आहे ? हें विचारल्यावरून, याज्ञवल्क्यानें उत्तर दिलें कीं, तो दृष्टीला दृष्टिरूप देणारा, श्रोत्रांना श्रवण करविणारा, मनाचें मनन करणारा, बुद्धिजन्य ज्ञानाचें ज्ञान उत्पन्न करणारा असल्यामुळें तो आत्मा पाहतां येत नाहीं, ऐकतां येत नाहीं; त्याचें मनन करितां येत नाहीं; अथवा त्याचें स्वरूपज्ञान होणें शक्य नाहीं.

## ब्राह्मण ५.

मग कुषीतकपुत्र कहोल ऋषीनें पुनः ज्याचें प्रत्यगात्म्यास प्रत्यक्ष व मुख्य ज्ञान होतें, व जो सर्वान्तर ह्मणविला जातो, तो कसा आहे ? असें विचारल्यावरून याज्ञवल्क्यानें सांगितलें कीं, तो देहसंबंधजनित भूक, तहान, शोक, मोह, जरा व मृत्यु यांचे पलीकडे आहे. असा तो विकारातीत आत्मा जाणला ह्मणजे ज्ञानसंपन्न ब्राह्मण पुत्रैषणा, वित्तैषणा व लोकैषणा टाकून देऊन, केवळ शरीरयात्रा चालवण्याकरितां भिक्षावृत्ति धरून, पूर्ण पांडित्य अंगीं आणून, बालस्वभावानें राहूं इच्छितात; व मौन आणि मौनाभाव ह्मणजे आत्मज्ञान व अनात्म वस्तूंची उपेक्षा धारण करून कसा तरी काळ कंठितात. ही उच्च भावना उत्पन्न झाली ह्मणजे बाकी सर्व वस्तु नश्वर आणि दुःखयुक्त आहेत असें स्पष्ट दिसूं लागतें.

## ब्राह्मण ६

नंतर गार्गीनें सर्व वस्तूनां उदक व्यापून आहे, त्या उदकाला व्यापून कोण आहे ? असें विचारलें. ज्याप्रमाणें सर्व जड वस्तु उत्पन्न होण्यास उदक कारण आहे, त्याप्रमाणें उदकाचें कारण वायु आहे; वायूचें कारण आकाश आहे; आकाशाचें कारण सूक्ष्मरूपानें असणारें गन्धर्वांचें वसतिस्थान आहे; गन्धर्व लोकांला कारण आदित्य लोक ( सूक्ष्म प्रकाशत्व ) आहे; आदित्य लोकाला कारण त्याहून सूक्ष्म चन्द्र प्रकाश आहे; चन्द्रलोकाला कारण त्याहून सूक्ष्म नक्षत्र प्रकाश आहे. नक्षत्र लोकाला कारण देवांचें तेज अथवा देवलोक आहे. देवलोकाला कारण इन्द्रलोक ( सूक्ष्म क्रियाशक्ति ) आहे. इन्द्रलोकांला कारण प्रजापति लोक ( गूढ अव्यक्त उत्पादनशक्ति ) आहे. प्रजापति लोकाला कारण ब्रह्म लोक ( अव्यक्त ईश्वरशक्ति ) आहे. ह्याप्रमाणें प्रश्नानुक्रमानें याज्ञवल्क्यानें उत्तरें दिलीं. तरी पुनः गार्गीनें विचारलें कीं, त्या ब्रह्मलोकाला ( अव्यक्त ईशशक्तीला ) व्यापक काय आहे ? तेव्हां याज्ञवल्क्यानें ही देवता अनुमान पद्धतीनें जाणण्यासारखी नाहीं. श्रुतीनेंच समजण्यासारखी आहे, असें असून तूं विचारशील तर तुझें डोकें फुटून जाईल, असें सांगितलें.

## ब्राह्मण ७.

मग आरुणि उद्दालकानें काप्य पतंचलऋषीच्या बायकोच्या अंगातील गन्धर्वानें सांगितलेल्या सूत्र व अन्तर्यामी या तत्त्वांच्या ज्ञानाविषयीं याज्ञवल्क्यास प्रश्न केला. त्यावरून माळेंतील मण्यांनां धरणारें सूत्र असतें, त्याप्रमाणें सर्व जगांतील भिन्न भिन्न वस्तूंना एकत्र धरणारें वायुरूप सूत्र आहे, असें याज्ञवल्क्यानें सांगून अन्तर्यामी आहे तो कोण? ह्या प्रश्नासंबंधानें सांगितलें कीं, पृथ्वी, आप, अग्नि, अन्तरिक्ष, वायु, द्युलोक, आदित्य, दिशा, चन्द्रतारका, आकाश, अंधकार प्रकाश ह्या देवतात्मक विभूति व भौतिक पदार्थ, व शारीरिक वस्तु ह्मणजे प्राण, वाणी, चक्षु, श्रोत्र, मन, त्वचा, जीवात्मा (विज्ञान), रेत, इत्यादिकांच्या आंत राहून, आंतून त्यांचें नियमन करितो; परंतु त्यांस ज्याची ओळख पटत नाहीं, तो अन्तर्यामी अन्तरात्मा होय.

## ब्राह्मण ८,

वाचक्नवी गार्गीनें इतर सर्व ब्राह्मणांच्या अनुमतीनें पुनः दोन प्रश्न केले. त्यापैकीं प्रथम प्रश्नास उत्तर दिलें कीं, जें तत्व पृथ्वीच्या खालीं, आकाशाच्यावर, व द्यावापृथ्वीरूपानें, भूत वर्तमान भविष्यरूपानें नांदत आहे, तें आकाशस्वरूपांत ओंवलेलें भरलेलें आहे. त्यावरून गार्गीनें दुसरा असा प्रश्न केला कीं, तें आकाश कशांत गोंवलेलें आहे ? याज्ञवल्क्यानें उत्तर दिलें कीं, तें अक्षरतत्वांत गोंवलेलें आहे, आणि अक्षर तत्वाचें निषेधरूप शब्दांनीं वर्णन केलें. अक्षर स्थल नाहीं, सूक्ष्म नाहीं, आंखूड नाहीं, लांब नाहीं; आरक्त नाहीं, स्निग्धता नव्हे; छायारूप नाहीं, तमोरूप नाहीं वगैरे. त्याच अक्षराचें सत्तास्वरूपानें असें वर्णन केलें कीं, सूर्य, चन्द्र, द्यावापृथिवी, मेषोन्मेष, तास, दिवस, रात्र, मास, पक्ष, ऋतु, संवत्सर वगैरे कालमानें त्याच्या हुकुमानें चाललीं आहेत. त्याच्या हुकुमानें पूर्ववाहिनी, पश्चिमवाहिनी, दक्षिणोत्तरवाहिनी सर्व नद्या आपआपल्या दिशेला वाहत जातात. त्याच्या हुकुमानें देव यज्ञाची, व पितर श्राद्धहोमाची आशा करून असतात. असें सर्वांचें प्रशासन करणारें तें अक्षर आहे. तें दिसत नसून पाहणारें, ऐकूं येत नसून ऐकणारें, मनन करितां येत नसून मनन करणारें, ओळखतां येत नसून सर्वांस ओळखणारें आहे. त्याहून दुसरें कोणी पाहणारें, ऐकणारें, मननकरणारें, जाणणारें नाहीं. हें ऐकून वाचक्नवी गार्गी स्तब्ध झाली.

## ब्राह्मण ९.

अश्वलप्रभृति गार्गीपर्यंत कर्ममुक्ति, ग्रहमुक्ति, पारिक्षितमुक्ति, सर्वान्तरआत्मा, एषणात्याग, अक्षर, सूत्र, अन्तर्यामी, प्रशास्तृ अक्षर, ह्या तत्त्वांविषयीं यज्ञवल्क्याशीं विवाद झाल्यावर, त्याला विदग्ध शाकल्यानें देव किती आहेत ? असा प्रश्न केला. त्यासंबंधानें तीन हजार तीनशेंसहा देवांच्या विभूति आहेत; त्यांत मुख्य—आठ वसु, अकरा रुद्र, बारा आदित्य, व इंद्र आणि प्रजापति मिळून तेहतीसच आहेत. इंद्र ह्मणजे पर्जन्य देवता; व प्रजापति ह्मणजे यज्ञ देवता; असें सांगितलें. त्या तेहतीसांची निवड करितां सहाच देव राहतात; त्यांत तीन मुख्य—त्यांत प्राण देवता सर्वांचे अभिवृद्धीला कारण आहे ह्मणून ती मुख्य, व शेवटीं ब्रह्मसंज्ञेनें एकच देव आहे असें सांगितलें.

पुढें शरीरांतील पुरुष, कामपुरुष, आदित्यपुरुष, बुद्धिपुरुष, छायामयपुरुष, अक्षिपुरुष, आपपुरुष, पुत्ररूपपुरुष, अशीं त्याच देवाचीं रूपें आहेत असें सांगितलें. मग शाकल्यानें प्रत्येक दिशेला कोण कोणते पुरुष आहेत हें विचारल्यावरून प्राची दिशेला आदित्यपुरुष, दक्षिणदिशेला यज्ञपुरुष, प्रतीची दिशेला आपपुरुष, उत्तर दिशेला सोमपुरुष, ऊर्ध्व दिशेला अग्निपुरुष असून, ते सर्व मनुष्याच्या हृदयांत राहतात, असें सांगितलें. एवढें मोठें मनुष्याचें हृदय कोणावर अवलंबून आहे, असा शाकल्यानें प्रश्न केल्याबरोबर याज्ञवल्क्य रागावला. हें ठीकच आहे. कारण मनुष्याच्या बुद्धिद्वारें सर्व तत्वांचें ज्ञान होत असून, मनुष्याची बुद्धि आत्म्यावर अवलंबून आहे, हें उघड आहे. याज्ञवल्क्यानें क्रोधाविष्ट होऊन उत्तर दिलें कीं—अरे नीच शाकल्या हें हृदय आत्माश्रयकरून नसतें तर, ह्याला कोल्हीं कुत्रीं खाऊन जातीं; व गिधाडें फाडून खातीं. त्यावर शाकल्यानें पुनः प्रश्न केला कीं, अरे तूं किंवा तुझा आत्मा कशावर अवलंबून आहांत ? उत्तर—प्राणावर अवलंबून आहे; प्राण अपानावर, अपान व्यानावर, व्यान उदानावर, उदान समानावर, समान वायूवर, ह्या प्रमाणें उत्तरापाठी मागून उत्तर दिलें; व शेवटीं असें सांगितलें कीं, मुख्य तत्व आत्मा आहे; तो अतीन्द्रिय, अप्रमेय, अविनाशी, असंग, अबद्ध, व्यथारहित, व दुःखरहित आहे. एकंदरींत याज्ञवल्क्यानें आठस्थानें, आठलोक, आठदेव, आठपुरुष, सांगितलें, ते सर्व जाणून जो त्यांच्या पलीकडे जाईल तो उपनिषद्वर्णित पुरुष होय. असें सांगून शाकल्याला अशा अडचणींत घातला कीं, तूं तो सर्व श्रेष्ठ पुरुष न सांगशील (न समजशील), तर तुझें डोके तुटून पडेल. शाकल्य अत्यन्त मदभरित असल्यामुळें त्यास ही दहशत दिली; पण त्यानें परमपुरुष समजून न घेतल्यामुळें त्या दहशतीनें त्याचें डोकें खरोखरी तुटून पडलें; व त्याचे शिष्य त्याच्या अस्थि घेऊन जात असतां तें अस्थीचें गाठोडें चोरांनीं नेलें, अशी त्याची दुरवस्था होण्यास त्याचें अज्ञान कारण झालें.

त्यानंतर याज्ञवल्क्यानें बाकींचे ब्राह्मणांस तुह्मी कोणी तरी मला पाहिजे तें विचारा असें ह्मटलें, पण कोणाचेंही धारिष्ट झालें नाहीं; तेव्हां त्यांस अगदीं बालबोध रीतीनें सात श्लोकांनीं जगाचें मूळ—उत्पादक तत्त्व—काय आहे हें सांगितलें.

---

# ॥ श्री बृहदारण्यकोपनिषद ॥

## —मुनिकांड—

( जनकसभेंत अनेक ऋषींचा याज्ञवल्क्याशीं झालेला तत्वविषयक वाद किंवा जल्प )

# अश्वलब्राह्मण

### मृत्युमुक्ति—अतिमुक्ति.

### अध्याय ३ ब्राह्मण १.

श्रीपरमात्मने नमः

**॥ हरिः ॐ ॥**

**ऋचा १—वैदेह जनकानें बहुदक्षिण यज्ञ केला. त्यांत कुरुपंचाल देशांतील ब्राह्मण गोळा झाले. त्या वैदेह जनक राजाला या ब्राह्मणांमध्यें मोठा पढीक विद्वान कोण ? असें जाणण्याची इच्छा झाली. नंतर त्यानें ( एका गोठ्यांत ) एक हजार गायी बांधल्या; व प्रत्येक गायीच्या शिंगांस दहा दहा (सोन्याचे) पाद ( तोळे ) बांधले.**

भाष्य—( उपोद्घात )—' वैदेह जनकानें ' इत्यादि ( श्रुतीनें ) याज्ञवल्क्यकांडाचा ( मुनिकांडाचा ) आरंभ केला आहे. ( हें कांड ) उपपत्तिप्रधानें असल्यामुळें मागील मधुकांडाचा व ह्या कांडाचा विषय एकच आहे तरी, पुनरुक्ति दोष येत नाहीं; कारण, मधुकांड श्रुतिप्रधान आहे. आत्मा एकच आहे हें समजावण्यास श्रुति आणि उपपत्ति हीं दोन्ही असतील तर तीं तें तळहातावरील बेलफळाप्रमाणें ( स्पष्ट ) दाखवूं शकतात. ( आत्म्याचें ) " श्रवण करावें, मनन करावें " असें सांगितलें आहे. त्याकरितां श्रुतिगत अर्थाचाच युक्तीनें निश्चय करण्याकरितां ( हें ) उपपत्तिप्रधान याज्ञवल्क्यकांड आरंभिलें आहे.

---

१—ज्यांत पुष्कळ दक्षिणा दिली जाते असा, किंवा अश्वमेध.

२—ज्यांत उपपत्ति ह्मणजे युक्ति अथवा तर्क ह्यांची मुख्यत्वें योजना असते.

३—अध्याय २, ब्राह्मण ५ यांत आत्मा सर्व भूतांस मध आहे ( ऋचा १४ ) असें सांगितलें आहे. त्या ५ व्या ब्राह्मणाला मधुकांड ह्मणतात.

४—" [ आत्मावा अरे द्रष्टव्यः ] श्रोतव्यो मन्तव्यः " बृह. २-४-५

" ४-५-६

यांतील गोष्ट तत्वज्ञानाची प्रशंसा करण्याकरितां किंवा ( ज्ञानाचे ) उपाय[1] सांगण्याकरितां आहे; कारण दानरूप उपाय प्रसिद्ध आहे, व तो विद्वानांना शास्त्रांतही सांपडलेला आहे. 'दानानेंच प्राणी नम्र होतात.' प्रकृत गोष्टींत हजार गायी व पुष्कळ सुवर्ण देण्याकरितां काढलें आहे. त्यावरून ( तत्वज्ञानरूप ) अन्यविषयक शास्त्र असूनही विद्याप्राप्तीला दान साधनीभूत आहे हें दाखविण्याकरितां गोष्ट आरंभिली. शिवाय तर्कविद्येंत[2] आढळतें कीं, वेद्यार्थांच्या ज्ञानानें जे संपन्न असतील, त्यांचा समागम, व त्यांशीं वाद करणें, हा विद्याप्राप्तीचा उपाय आहे. या अध्यायांत हा प्रकार विशेषेंकरून व्यक्त केला आहे. विद्वानांचा समागम झाला असतां बुद्धि वाढते, हा प्रत्यक्ष अनुभव आहे; याकरितां ( प्रकृत ) गोष्ट विद्याप्राप्तीचा उपाय दाखविण्याकरितांच आहे.

जनक नांवाचा विदेह देशाचा सार्वभौम[3] राजा होता. त्या देशांत त्याचा जन्म ( ह्मणून तो ) वैदेह[4]. त्यानें बहुदक्षिण यज्ञ केला. बहुदक्षिण नांवाचा यज्ञ अन्य शाखेंत प्रसिद्ध आहे; अथवा अश्वमेधांतही[5] पुष्कळ दक्षिणा दिली जाते ह्मणून ( अश्वमेधच ) या ठिकाणीं बहुदक्षिण शब्दानें घ्यावा; ह्या यज्ञांत निमंत्रणावरून अगर ( यज्ञ ) पाहण्याच्या इच्छेनें कुरु देशांतील व पंचाल देशांतील ब्राह्मण ( आले होते ). त्या देशांत पुष्कळ विद्वान् असल्याचें प्रसिद्ध आहे. ( ते ) एकत्र गोळा झाले तेव्हां, ( तो ) मोठा विद्वत्समुदाय पाहून त्या यज्ञ करणाऱ्या वैदेह जनक राजाला यांपैकीं खरा ब्रह्मिष्ठ[6] कोण आहे, हें मुख्यत्वें जाणण्याची इच्छा झाली. कोणत्या प्रकारची ? या ब्राह्मणामध्यें खरोखरी उत्तम पढीक कोण असावा ? हे सर्व पढीक आहेत; पण यांपैकीं अतिशय पढलेला कोण असावा ? याप्रमाणें उत्तम पढीक कोण, याविषयीं जिज्ञासा त्यास उत्पन्न झाल्यावरून ती गोष्ट जाणण्याचा उपाय ह्मणून हजार तरुण गायी त्यानें गोठ्यांत बांधल्या. त्यांवर काय घालून बांधल्या होत्या, हें श्रुति सांगते.

सोन्याच्या एक पलाच्या चवथ्या भागाला ( ह्मणजे एक तोळ्याला ) पाद ( ह्मणतात ). दहा दहा पाद ( सोनें ). एकेका गायीच्या शिंगांवर बांधिलें होतें. ( ह्मणजे ) एक एक शिंगावर पांच पांच पाद ( पदकें ) होतीं.

---

१—विद्या शिकण्यास दान साधनीभूत आहे असें प्रसिद्ध आहे. 'गुरुशुश्रूषया विद्या पुष्कलेन धनेन वा । अथवा विद्यया विद्या चतुर्थं नोपलभ्यते " गुरुसेवेनें किंवा पुष्कळ धन दिल्यानें विद्या प्राप्त होते, अगर विद्येनें विद्या मिळते, चवथें साधन नाहीं.

२—" अविज्ञाततत्वेर्थे कारणोपपत्तितस्तत्वज्ञानार्थमूहस्तर्कः " अर्थ—ज्या विषयांचें तत्व समजलें नाहीं त्यांत कारणाचें विवेचन करून तत्वज्ञान होण्याकरितां तर्क घ्यावा लागतो. पहा सुरेश्वर वार्तिक पृ. ११३

३—राजसूययज्ञ करून राज्याभिषेक करून घेतला ह्मणजे सार्वभौम राजा होतो. त्याला सम्राट् ह्मणतात.

४—वैदेह नांवांत गर्भित श्लेष आहे. ज्याला देहबुद्धि नाहीं तद्रूप.

५—जनकराजा सार्वभौम असल्यानें अश्वमेध करणें त्याला सहज होतें.

६—ब्रह्मा ह्मणजे ब्रह्म जाणणारा, आणि ब्रह्मिष्ठ ह्मणजे ब्रह्म जाणणाऱ्यांमध्यें उत्तम.

**ऋचा २.—त्यांस मग (जनकानें) भाषण केलें कीं, हे पूज्य ब्राह्मण हो, तुमच्या मध्यें जो ब्रह्मिष्ठ असेल तो ह्या गायी घेऊन जावो. तेव्हां ते ब्राह्मण धजावले नाहींत. मग याज्ञवल्क्य हा आपल्याच ब्रह्मचाऱ्याला म्हणाला, बाबा सामश्रव्या[1], ह्या घेऊन जा. त्या ( गायी तो ) सोडून घेऊन चालला, तेव्हां ते ब्राह्मण, आमच्या समोर हा ब्रह्मिष्ठ कसें म्हणविणार ! असें ( मनांत आणून ) रागावले. मग वैदेह जनकराजाचा अश्वल ह्मणून हौत्र करणारा ( ऋत्विज ) होता, त्यानें ह्यास प्रश्न केला; हे याज्ञवल्क्या, तूंच काय तो आमच्यामध्यें ब्रह्मिष्ठ आहेस? त्यास यानें उत्तर केलें. आह्मीं ब्रह्मिष्ठाला नमस्कार करितों. ( पण ) गायी प्राप्त व्हाव्या, हीच आमची इच्छा आहे. त्यावरूनच त्यास मग अश्वल होत्यानें प्रश्न करण्याचें मनांत आणिलें.**

भाष्य—( जनक राजानें ) वर सांगितल्याप्रमाणें गायी ( गोठ्यांत ) बांधून त्या ( जमलेल्या ) ब्राह्मणांस भाषण केलें. 'हे पूज्य ब्राह्मण[3] हो,' अशी हाक मारून, तुमच्यामध्यें जो ब्रह्मिष्ठ असेल ( ह्मणजे ) तुह्मी सर्व ब्रह्म जाणणारे आहांत, त्यांत जो उत्कृष्ट ब्रह्म जाणणारा ( ब्रह्मिष्ठ ) असेल, तो ह्या गायी आपल्या घराला घेऊन जावो. तेव्हां त्या ब्राह्मणांनीं धाष्टर्य केलें नाहीं; त्या ब्राह्मणांनीं तें भाषण ऐकून आपल्या ब्रह्मिष्ठपणाबद्दल प्रतिज्ञा करण्याचें धैर्य केलें नाहीं; ते पुढें झाले नाहींत. त्या ब्राह्मणांनीं मौन धरल्यावर याज्ञवल्क्य, आपल्या ब्रह्मचारी शिष्याला ह्मणाला,बाबा,या गायी आमच्या घरीं घेऊन जा. 'बाबा साम[4]श्रव्या' (अशी हांक मारली); कारण तो सामवेदाचे पाठ ऐकत असे, त्यावरून अर्थात् याज्ञवल्क्य चतुर्वेदी होता. त्या गायी त्यानें ( सामश्रव्यानें ) आचार्याच्या घरीं नेल्या. याज्ञवल्क्यानें आपण ब्रह्मिष्ठ असल्याची प्रतिज्ञा केली, असें त्यानें ब्रह्मिष्ठाला देण्याकरितां जें जनकानें द्रव्य पणाला लाविलें होतें तें स्वीकारल्यामुळें सिद्ध झालें. तेव्हां ब्राह्मण कोपले. त्यांना क्रोध येण्यास हेतु काय होता हें श्रुति सांगते. आह्मी एकएक जण मुख्य असून आमच्या समोर ह्यानें मीं ब्रह्मिष्ठ आहें असें कसें ह्मणावें ! मग ते ब्राह्मण याप्रमाणें क्षुब्ध झाल्यावर यज्ञ करणाऱ्या जनक राजाचा अश्वल[5] नांवाचा हौत्र करणारा ऋत्विज होता. तो ब्रह्मिष्ठपणाचा अभिमानी असून त्यास राजाश्रय होता; ह्मणून त्यानें

---

१—मॉक्स मुल्लर (Max Muller) साहेबांनीं 'सामश्रव्या' हें संबोधन याज्ञवल्क्याकडे लावलें आहे. पण आचार्यांच्या भाष्यावरून तसें दिसत नाहीं.

२—यज्ञांत चार मुख्य ऋत्विज असतात. (१) होता, (२) अध्वर्यु, (३) उद्गाता, (४) ब्रह्मा.

३—ज्यांनीं वेदाचें अध्ययन करून त्यांचा अर्थ समजण्याविषयीं निष्ठा ठेविलेली असते, त्यांस ब्राह्मण म्हणतात.

४—याज्ञवल्क्य ऋषि यजुर्वेदी होता, त्यापासून त्याचा ब्रह्मचारी शिष्य सामवेद श्रवण करीत होता. ऋग्वेदावर सामवेद अवलंबून आहे, यावरून तीन वेद व तदंतर्गत अथर्ववेद याज्ञवल्क्याला येत होते, व तो चतुर्वेदी ऋषि होता, असें सिद्ध होतें.

५—अश्वल राजाश्रित असल्यामुळें त्यानें प्रथम प्रश्न केला.

उद्धटपणानें याज्ञवल्क्याला प्रश्न केला. आमच्या मध्यें तूंच कसा ब्रह्मिष्ठ आहेस-( आहेस हें पद ) मूळांत लांबट ह्मटलें आहे, तें निंदेनें ह्मटलें आहे.—मग याज्ञवल्क्यानें उत्तर दिलें, ब्रह्मिष्ठाला नमस्कार असो. तूर्त आह्मांस गायींची इच्छा आहे. ह्यावरून ब्रह्मिष्ठपणाची प्रतिज्ञा त्यानें केली, व ब्रह्मिष्ठाला देऊं केलेला पण ( ठेविलेलें द्रव्य ) त्यानें स्वीकारिला एवढ्यावरूनच अश्वल होत्यानें त्यास प्रश्न करावा, असें मनांत आणिलें.

**ऋचा ३—हे याज्ञवल्क्या, अशी हाक मारून ( अश्वल ) म्हणाला, जें हें सगळें मृत्यूनें व्याप्त आहे, सगळें मृत्यूनें आपलेंसें केलें आहे; ( त्यांतून ) कोणत्या ( ज्ञाना ) नें यजमान मृत्यूची व्याप्ति मागें टाकून मुक्त होतो ? (उत्तर)–होताऋत्विज, अग्नि, वाणी, ( ह्यांच्या बलानें ). वाणी हीच यजमानाचा होता-ऋत्विज होय. त्यांत जी ही वाणी तोच हा अग्नि होय; व तो (च) होता (ऋत्विज). तो मुक्ति, (आणि) ती (च) अतिमुक्ति.**

भाष्य—' याज्ञवल्क्या, अशी हाक मारून ह्मणाला ' ( वगैरे ). ( पूर्वीच्या अध्यायांत ) मधुकांडामध्यें पाङ्क्त ( पंचविध ) कर्म ज्ञानयुक्त असेल तर तें करून यजमान मृत्यूपलीकडे जातो असें सांगितलें. उद्गीथ प्रकरणांत संक्षेपानें तेंच सांगितलें. त्याच्याच विवेचनाचा हा विषय आहे व त्यासंबंधानें जें विशेष ज्ञान पाहिजे, तें स्पष्ट करण्याकरितां हा विस्तृत ग्रंथ आरंभला आहे. ह्या ( यज्ञ ) कर्माचा ऋत्विज, अग्नि, वगैरे जो साधनसमुदाय आहे, तो ( मनुष्य ) स्वभावानुरूप आसक्तिसहित कर्मस्वरूप मृत्यूनें व्याप्त असतो. केवळ व्याप्त असतो, एवढेंच नव्हे; मृत्यूनें आपल्या स्वाधीन ठेविलेला असतो. कोणत्या ज्ञानस्वरूप उपायानें यजमान मृत्युवशता मागें टाकून मुक्त होतो, व स्वतंत्र होऊन मृत्यूच्या स्वाधीन रहात नाहीं, अशा अर्थाचा प्रश्न आहे. उद्गीथ प्रकरणांतच ज्या योगानें ह्मणजे मुखांतील प्राणरूप आत्मसाक्षात्कारानें मुक्त होतो असें सांगितलें ना ? ( मग अशी शंका कां आली ? ) खरें; पण एक विशेष गोष्ट तेथें सांगितली नाहीं, ती सांगण्याकरितां हा यत्न आहे; ह्मणून ( पुनरुक्ति ) दोष येत नाहीं.

याज्ञवल्क्य ह्मणतो, 'होताऋत्विज, अग्नि, वाणी यांच्या बलानें', याचा अर्थ (श्रुति) स्पष्ट करिते. ज्याच्या योगानें (यजमान) मृत्यूपलीकडे जातो तो होता कोण ? तर 'वाणी हीच यज्ञाचा'

---

१—या प्रश्नाचा अभिप्राय ब्रह्मज्ञानी उद्धटपणा करीत नाहींत, हें सुचविण्याचा आहे.

२—अध्याय २, ब्राम्हण ५.

३—मन, वाणी, प्राण, चक्षु, व श्रोत्र ह्या पांचांनीं केलेलें पांक्त अथवा पंचविध कर्म (१–४–१७) यथाक्रमानें ४८ संस्कारांतील सर्व यज्ञ, ज्ञानसंपादन करून केले असतां, मुक्ति प्राप्त होते. पांक्त ह्मणजे यथाक्रम असाही अर्थ होईल.

४—अध्याय १, ब्राह्मण ३.

५—वाणी अग्निस्वरूपी व होतृस्वरूपी आहे, हें विशेष ज्ञान.

६—" परिच्छेदकृदज्ञानं सासंगं मृत्युसंज्ञितं " परिच्छेद ( ब्रह्मक्षत्रादि भेद ) करणारें आसक्तियुक्त अज्ञान ( रागद्वेषोत्पादक भ्रांतिज्ञान ) हाच मृत्यु. सुरेश्वर वार्तिक. पृ. ११४०.

७—प्रत्येक इंद्रियाला ( प्राणाला ) मृत्यूपासून मुक्त होण्याला विशेष साधन कोणतें, हें या (अश्वल) कांडांत सांगितलें आहे. पहा–मिताक्षरा.

(ह्मणजे) यजमानाचा ( होता ). 'यज्ञ तोच यजमान' अशी श्रुति आहे. यज्ञरूप यजमानाची जी अध्यात्मवाणी तीच अधियज्ञ ( यज्ञसंबंधानें ) होता-ऋत्विज होय. कसा ? त्या ( यज्ञांत ) यज्ञस्वरूप यजमानाची जी ही वाणी, तो हा प्रसिद्ध अग्नि, अधिदैवत ( देवतात्मक ) आहे. तें हें त्र्यन्न[1] प्रकरणांत स्पष्ट केलें आहे. आणि तो अग्नि होता ( ऋत्विज ) ह्मणावा; " अग्नि तोच होता " अशी श्रुति आहे. यज्ञाला दोन साधनें लागतात. होता-ऋत्विज असतो तो अधियज्ञ ( यज्ञसंबंधानें ) असतो, आणि (यजमानाची) वाणी असते, तें अध्यात्म (शारिरिक) साधन होय. हीं दोन्ही साधनें मर्यादित (परिच्छिन्न[3]) स्वरूपांचीं मृत्युव्याप्त (नश्वर) असून स्वाभाविक अज्ञानावरील आसक्तीनें प्रेरित केलेल्या कर्मरूपी मृत्यूनें प्रतिक्षणीं विकृत होत असून मृत्यूच्या स्वाधीन असतात. (पण) तींच ( साधनें ) अधिदैवत ( देवतारूप ) अग्नीसह दिसलीं ह्मणजे यज्ञस्वरूप यजमानाची मृत्यूपासून सुटका ( अतिमुक्ति ) होण्यास ( कारणीभूत ) होतात. त्यावरून ( श्रुति ) असें ह्मणते कीं, तो ( अग्नि ) मुक्ति; तो होतृस्वरूप अग्नि मुक्ति; अग्निस्वरूपाचें दर्शन तीच मुक्ति. (होता आणि वाणी) हीं दोन साधनें जेव्हां अग्निरूपानें पाहतो तेव्हांच स्वाभाविक ( कर्मा) सक्तिरूप मृत्यूपासून ( यजमान ) मुक्त होतो; व ( वाणीचें ) शारिरिक ( आध्यात्मिक ) मर्यादित स्वरूप आणि ( होत्याचें ) आधिभौतिक स्वरूप ह्यांपासून मुक्त होतो. या कारणांकरितां होता अग्निरूप आहे असें पाहिलें ह्मणजे तोच यजमानाला मुक्तिसाधन होतो. 'तीच अतिमुक्ति.' जी मुक्ति तीच अतिमुक्ति—अतिमुक्तीचें साधन असा अर्थ. ( वर सांगितलेलीं होता व वाणी ) हीं दोन साधनें परिछिन्न ( मर्यादित ) आहेत, त्यांविषयीं अपरिछिन्न देवतात्मक अग्नीची दृष्टि ठेविली ह्मणजे ती मुक्ति. जी ही आधिदैवत दृष्टिरूप मुक्ति तीच आध्यात्मिक ( शारीरिक ) व आधिभौतिक ( पंच महाभूतांपासून उत्पन्न झालेल्या वाणी व होता यांच्या ) मर्यादित स्वरूपाविषयीं आसक्ति असल्याकारणानें प्राप्त होणाऱ्या मृत्यूला मागें टाकून, अधिदैवत अग्निरूप फलाऐवजीं प्राप्त होते; ती अतिमुक्ति असें ह्मणतात. अतिमुक्तीचें मुक्ति हेंच साधन असें मानून ( मुक्ति ) ती अतिमुक्ति असें ( श्रुति ) ह्मणते. वागादि इंद्रियांना अग्न्यादिक देवतांचें स्वरूप प्राप्त होतें, ती यजमानाची अतिमुक्ति असें उद्गीथ प्रकरणांत सांगितलें आहे. त्या ठिकाणीं मुखांतील प्राणाचें ज्ञान होणें मात्र मुक्तिसाधन आहे असें सामान्यतः ( संक्षेपानें ) ह्मटलें, ( पण ) वागादिक इंद्रियांवर अग्न्यादिदेवतादृष्टि ठेवावी, ही विशेष गोष्ट (सांगितली) नाहीं, ती या प्रकरणांत सांगितली आहे; परंतु मृत्यूच्या व्याप्तींतून अतिमुक्ति तीच ( मुख्य ) फल, असें उद्गीथ ब्राह्मणांत सांगितलें आहे. " जो पुरुष मृत्यूच्या पलीकडे जातो, तो दीप्तिमान ( तेजस्वी[4] ) होतो," वगैरे.

---

१— मन, वाणी, प्राण हीं तीन आत्म्याचीं अन्नें आहेत. पहा १–५–३.

२—पहा १–५–११ व भाष्य.

३—अज्ञानामुळें परिछिन्न ह्मणजे भिन्नभिन्न भासणारीं स्वरूपें.

४—पहा १–३–१२. उद्गीथ प्रकरणांत प्राण मुख्य आत्मा आहे, असें जाणून कर्मे केलीं असतां मुक्ति प्राप्त होते, व आत्मा यशस्वी ( उज्वलित ) होतो, असें ह्मटलें आहे. ही मुक्ति असें सांगितलें पण या प्रकरणांत वाक् ( वाणी ) अग्नि देवता आहे, असें जाणलें ह्मणजे मुक्ति प्राप्त होते; व आत्मा ( यजमान ) अग्निरूपच आहे, अशी भावना झाली ह्मणजे अतिमुक्तिरूप फल प्राप्त झालें, असें समजावें, ह्मणून वर्णन आहे.

**ऋचा ४—याज्ञवल्क्या, अशी हाक मारून अश्वल पुन्हा ह्मणाला, जें हें सर्व अह(दिवस) आणि रात्र यांनीं व्यापिलेलें आहे; सगळें अहोरात्रींनीं आपलेसें केलें आहे, तर कोणत्या (उपायानें) यजमान अहोरात्रींची व्याप्ति मागें टाकून मुक्त होतो ? (उत्तर)—अध्वर्युऋत्विज, चक्षुरिंद्रिय, आदित्य ह्यांनीं (अतिमुक्ति प्राप्त होते). डोळा (चक्षु) हाच यजमानाचा अध्वर्यु. तें जें हें चक्षुरिंद्रिय, तो हा आदित्य; तो अध्वर्यु; तो मुक्ति; ती अतिमुक्ति.**

भाष्य—' याज्ञवल्क्या, अशी हाक मारून ह्मणाला.' स्वाभाविक अज्ञानामुळें (विषया–) सक्तियुक्त कर्मस्वरूप मृत्यूपासून होणारी अतिमुक्ति वर्णिली. आसक्तियुक्त कर्मरूपी मृत्यूची स्थळें दर्शपूर्णमास वगैरे; त्या कर्मांच्या साधनाचें (प्रतिक्षणीं) रूपांतर होण्याला कारणीभूत जो कालस्वरूपी मृत्यु, त्या मृत्यूपासून वेगळी अतिमुक्ति कशी होते ? हें सांगावें ह्मणून या ( ऋचे)चा आरंभ आहे. कर्मानुष्ठानाच्या अभावीं देखील क्रियेच्या पूर्वीं व मागून क्रियेच्या साधनाच्या रूपांतराला कारणीभूत कालव्यापार चालू असतो; ह्मणून कालापासून स्वतंत्रपणें अतिमुक्ति सांगितली पाहिजे. याकरितां ( श्रुति ) सांगते कीं, ' जें हें सर्व अहोरात्रींनीं व्याप्त आहे,' तो काळ अहोरात्र स्वरूपानें व तिथ्यादिस्वरूपानें दोन रूपांचा आहे; पैकीं अहोरात्रस्वरूप काळापासून अतिमुक्ति कशी होते, हें ( श्रुति ) सांगते ( सदरहु ऋचेंत सांगितलें आहे ). अहोरात्रींपासूनच सर्व उत्पन्न होतें, वृद्धि पावतें, व नाश पावतें. त्याप्रमाणेंच यज्ञसाहित्य ( उत्पत्तिस्थितिविनाशाप्रत जातें ). यज्ञस्वरूप यजमानाचा डोळा (चक्षु) व अध्वर्यु (वगैरे) बाकी वर्णनाचा पूर्वींप्रमाणें अर्थ करावा. यजमानाचा डोळा व अध्वर्यु हीं दोन साधनें यांचें अध्यात्म ( शारीरिक ) आधिभौतिक (पंचभूतात्मक) स्वरूप सोडून देऊन त्याविषयीं आधिदैवत आदित्यदृष्टि ठेविली असतां तो मुक्ति. तीच—मुक्तीच—अतिमुक्ति. ह्याप्रमाणें पूर्वीं सारखाच आपण तो आदित्य अशी भावना ठेवणाऱ्याला अहोरात्री संभवत नाहींत.

**ऋचा ५—याज्ञवल्क्या अशी ( अश्वलानें ) हाक मारून पुन्हा ह्मटलें. जें हें सगळें शुक्लपक्ष, कृष्णपक्ष, ( पूर्वापरपक्ष ) ह्यांनीं व्यापलें आहे, सगळें या पक्षांनीं आपलेसें केलें आहे, (तर) कोणत्या उपायानें यजमान पूर्वपक्ष व अपरपक्ष यांची व्याप्ति मागें टाकून मुक्त होतो ? ( उत्तर ). उद्गाताऋत्विज, वायु, प्राण ह्यांनीं ( ह्यांचे ज्ञानानें अतिमुक्ति मिळते. ) प्राण तोच यज्ञाचा उद्गाता; त्यांत जो हा प्राण तो वायु. तो ( वायु ) उद्गाता. तो मुक्ति; ती अतिमुक्ति.**

भाष्य—आतां तिथिस्वरूपी काळापासून अतिमुक्ति सांगितली आहे; 'जें हें सर्व' अहोरात्री एक सारख्या ( वृद्धिक्षयरहित ) असतात, त्यांचा उत्पादक आदित्य आहे. प्रतिपदा वगैरे तिथींचा तो उत्पादक नाहीं. तिथींना वृद्धिक्षय असतो, व त्या प्रतिपदादिक तिथींचा उत्पादक चंद्र आहे. ह्मणून

---

१—प्रति पौर्णिमेला व अमावास्येला अग्निहोत्री इष्टि करीत असतात. ते यज्ञ व चातुर्मास्येष्टि, अग्निष्टोम, जोतिष्टोम, वाजपेय वगैरे यज्ञ, ४८ संस्कारांपैकीं आहेत.

२—कर्मांपासून मुक्ति सांगितली ह्मणजे काळापासून मुक्ति सांगितल्यासारखी होतेच व काळाचा कर्मामध्यें अंतर्भाव आहे; तरी काळापासून वेगळी मुक्ति समजली पाहिजे.

आदित्यप्राप्तीनें अहोरात्रीचें उल्लंघन करतां येतें, त्याप्रमाणें चंद्रप्राप्तीनें पूर्वापर पक्षांचें उल्लंघन होतें. त्यांत यजमानाचा प्राण ( तो ) वायु. तोच उद्गाता असें उद्गीथ ब्राह्मणांत समजलें, वाणीनेंच आणि प्राणानेंच त्यानें उद्गान केलें असा निश्चय केला, आणि असेंहि ह्मटलें कीं उदक या प्राणाचा देह आहे आणि ज्योतिरूप आहे; हा चंद्र आहे. प्राण, वायु, चंद्र हें एकच स्वरूप असल्यामुळें आणि चंद्रानें किंवा वायूनें उपसंहार केला असतां ( मृत्यु तरून जाण्याच्या कामीं ) कांहीं भेद होणार नाहीं, असें मानून श्रुतीनें आधिदैवत वायुरूपानें उपसंहार केला आहे. आणखी चंद्राला वृद्धिक्षय प्राप्त होतात, ते वायूच्या कारणानें होतात; त्यावरून तिथिस्वरूप कालाचा उत्पादक जो चंद्र त्याचा उत्पादक वायु आहे. ह्मणून ( यजमानाला ) वायुरूप प्राप्त झालें ह्मणजे तो तिथिरूप कालाच्या पलीकडे जाऊन मुक्त होतो हें स्पष्ट सिद्ध होतें. याच कारणाकरितां तिथिकाल चंद्रस्वरूप आहे अशी दृष्टि (तीच) मुक्ति व अतिमुक्ति होय, असें अन्य श्रुतींत ( माध्यंदिन श्रुतींत ) ह्मटलें आहे, व या काण्वश्रुतींत (उद्गाता व प्राण) या दोन्ही साधनांविषयीं तत्कारणस्वरूप वायूची दृष्टि ठेवणें मुक्ति व अतिमुक्ति होय असें ह्मटलें आहे, त्यावरून माध्यंदिन व काण्व या श्रुतींमध्यें विरोधे नाहीं.

**ऋचा ६—याज्ञवल्क्या, अशी हाक मारून ( अश्वलानें ) पुनः भाषण केलें. जें हें अंतरिक्ष आहे तें जणूं निराधार आहे. यजमान स्वर्गलोकांप्रत कोणत्या आधारानें जातो? (उत्तर.) ब्रह्मा–ऋत्विज, मन, चंद्र या (आधारा)नें जातो. मन हेंच यज्ञाचा ब्रह्माऋत्विज. त्याचें जें हें मन तो हा चंद्र, तो ब्रह्मा; तो मुक्ति; ती अतिमुक्ति. या प्रमाणें अतिमोक्ष[३]. मग संपत्ति[४].**

---

१—चन्द्रप्राप्तीनें तिथिरूप कालाचें उल्लंघन करतां येतें व मुक्ति प्राप्त होते, असें माध्यन्दिन श्रुतींत म्हटलें आहे. वरील ऋचा काण्व श्रुतीपैकीं आहे. त्यांत वायुरूप प्राप्त झाल्यानें पूर्वापरपक्षरूप कालाचें उल्लंघन होऊन मुक्ति व अतिमुक्ति मिळते, असें ह्मटलें आहे. ह्यावरून दोन्ही श्रुति परस्पर विरुद्ध होतात, तो विरोध दूर करण्याकरितां आचार्यांचें ह्मणणें असें कीं त्यांत ह्मणजे काण्वश्रुतींत उद्गाता प्राणरूपी वायु आहे असें म्हटलें तें पुष्कळ विचारानें निश्चितहि केलें आहे. प्राण व चन्द्र हे दोन्ही एकच आहेत, असें सप्तान्न श्रुतींत ( १–५–१ ) निश्चित केलें आहे. मन किंवा त्याची देवता चन्द्र व प्राण किंवा त्याची देवता वायु हीं दोन्ही ब्रह्मच आहेत. त्यामुळें सदरील काण्व श्रुतींत वायु देवतेचा संग्रह करून उपसंहार केला आहे, आणि माध्यंदिन श्रुतींत चन्द्र देवतेचा संग्रह करून उपसंहार करितात, मिळून दोन्ही श्रुति योग्यच आहेत व त्यांत विरोध नाहीं.

२—" ऱ्हास वृध्द्योर्यतः कर्ता वायुश्चन्द्रमसस्ततः । वायुनैवोपसंहारः प्राणोद्गात्रोरयं कृतः ॥ " अर्थ—वायु हा चंद्राचा कर्ता व वृद्धिक्षयांचा कर्ता आहे, ह्मणून ह्या काण्व श्रुतींत प्राण व उद्गाता यांचा उपसंहार मुळांत वायु शब्द घालून केलेला आहे. पहा—सुरेश्वर वार्तिक पृ. ११४३.

३—ज्यापासून अतिमोक्ष ( अतिमुक्ति ) मिळते, ते अतिमोक्ष इतर इंद्रियांची मुक्ति. पहा–मिताक्षरा.

४—अग्निहोत्रादिक लहान लहान यागांमध्यें मोठ्या कर्मांची व त्यांच्या फलांची इच्छा धरून लहान मोठीं कर्मे तेथून सारखींच या दृष्टीनें कल्पना करणें ह्याला संपत्ति ( संपादणी ) किंवा संपत्कर्म ह्मणतात. पहा–मिताक्षरा.

भाष्य— मृत्युरूपी कालापासून यजमानाची अतिमुक्ति सांगितली. तो ( यजमान ) अतिमुक्त ( होतांना ) कोणत्या आधारानें मर्यादित ( परिच्छिन्न ) गोष्टींच्या संबधाच्या मृत्यूच्या पलीकडे जाऊन फल मिळवितो, अतिमुक्त होतो–ह्या विषयीं श्रुति सांगते कीं जें हें प्रसिद्ध अंतरिक्ष किंवा आकाश निराधार (दिसतें)–जणूं ( इव ) शब्दावरून त्यालाही आधार आहे, पण तो ध्यानांत येत नाहीं असें ह्मणण्याचा (श्रुतीचा) अभिप्राय आहे–आतां जो आधार ध्यानांत येत नाहीं तो कोणता? असें "केन" (कोणत्या) सर्वनामानें विचारलें आहे. (स्वर्गलोकांप्रत जाण्यास आधार किंवा पायरी) नसेल तर (स्वर्गरूप) फलप्राप्ति होण्याचा इतर रीतीनें संभव नाहीं. ज्या आधारानें (किंवा पायरीनें) यजमान कर्मफलाप्रत पोंचून अतिमुक्त होतो, तो (आधार) कोणता? असा प्रश्न आहे; पोहोंचून कोणत्या आधारानें स्वर्गलोकास चढतो-स्वर्गलोकफल पावतो-अतिमुक्त होतो-असा अर्थ. ( याज्ञवल्क्याचें उत्तर ) 'ब्रह्माऋत्विज, मन, चंद्र, या' शब्दांची योजना पूर्वींप्रमाणें–त्यांत अध्यात्म ( शारीरिक ) यज्ञस्वरूपी यजमानाचें जें हें प्रसिद्ध मन आहे, तो हा चंद्र आधिदैवत (देवतात्मक) होय. मन शारीरिक आहे (व) चंद्र आधिदैवत (देवरूप) आहे, हें प्रसिद्धच आहे. तोच चंद्र ब्रह्माऋत्विज ह्मणून आधिभौतिक ( पंचमहाभूतात्मक ) ब्रह्म्याचें स्वरूप व मनाचें स्वरूप. हीं दोन्हीं परिछिन्न असून अपरिछिन्न ( ह्मणजे ) अमर्यादित जें चंद्राचें देवतारूप आहे त्या रूपानें पहातो; ह्मणजे चंद्ररूप मनाच्या आधारानें (यजमान) कर्मफलरूप स्वर्गलोकांप्रत जातो, अतिमुक्त होतो– असा भावार्थ आहे. ( अतिमुक्ति शब्दापुढें ) मुळांत 'इति' शब्द आहे तो उपसंहाराऐवजीं आहे. याप्रकारचे मृत्यूपासून ( इतर प्राणेंद्रियांचे ) अतिमोक्ष होतात. हे सर्व यज्ञांगांच्या ज्ञानाचे ( दर्शनाचे ) प्रकार या ठिकाणीं सांगितले आहेत; ह्मणून मुळांत 'अतिमोक्षाः' असा उपसंहार केला आहे. अतिमोक्ष तेवढे अशा प्रकारचे आहेत असा अर्थ घ्यावा.

'मग संपत्ति' (अशी पदें आहेत त्यांपैकीं) 'मग' ह्मणजे आतां, 'संपत्ति' ( संपादणुकी ) सांगण्यांत येतात. 'संपत्' ( संपत्ति ) ह्मणजे काय? ( कर्मपणाच्या वगैरे ) कोणत्या तरी साम्यावरून फल देणारीं अग्निहोत्रादिक कर्में करून (मोठ्या यागांच्या)[1] विशिष्ट फलाची किंवा केवळ फलाची संपादणी. पूर्ण उत्साहानें फलसाधनीभूत कर्मांचें अनुष्ठान प्रयत्नानें करीत असतां जेव्हां ( सामग्रीच्या वगैरे ) कोणत्या तरी न्यूनतेमुळें ( त्यांस त्या कर्मांचें फल प्राप्त होण्याचा ) संभव नसतो, तेव्हां अग्निहोत्री असला ह्मणजे अग्निहोत्र वगैरे पैकीं एकादें कर्म साधेल तें घेऊन तोच आधार करून त्या कर्माचें फल जाणत असला तर जें कर्म व्हावें ह्मणून इच्छा करतो त्याचें फल संपादितो ( प्राप्त झालें अशी कल्पना करितो ). असें न केलें तर राजसूययज्ञ, अश्वमेध, पुरुषमेध, सर्वमेध, वगैरे यज्ञ करण्यास तीन वर्णांच्या लोकांस अधिकार आहे. पण ज्यांनीं ते करण्याचा ( गरिबीमुळें ) संभव नाहीं, त्यांनीं तीं मखवर्णनें स्वाध्याया-

---

१–अश्वमेधासारख्या मोठमोठ्या यागांची कल्पना करणें.

२–तुपाची आहुती द्रोणांत तयार करितात, आणि त्यांत तोंड पाहून हें तूप स्वर्गलोकाप्रमाणें स्वच्छ आहे अशी कल्पना करितात. पण त्या तुपाला स्वर्गलोकाची उपमा देण्यासारखा गुण त्यामध्यें एक उजळपणा ( स्वच्छपणा ) मात्र असतो.

ऐवजीं नुसतीं तोंडानें ह्मणावीं असें जालें असतें; ह्मणून संपत्तीनें (संपादणुकीनें) त्यांस फलप्राप्ति ठेवली, यावरून संपत्तीचाही उपयोग आहे, ह्मणून त्यांचें वर्णन आरंभिलें आहे.

**ऋचा ७—हे याज्ञवल्क्या, अशी हाक मारून ( अश्वलानें ) पुन्हां प्रश्न केला. आज हा होता किती ऋचांनीं ह्या यज्ञामध्यें ( शंसन ) करील? तीन ऋचांनीं करील, असें ( याज्ञवल्क्यानें उत्तर दिलें ). कोणत्या तीन ऋचांनीं? पुरोनुवाक्या, याज्या, ( व ) शस्या ही तिसरी. त्या ( ऋचां ) नीं काय जिंकील? जें कांहीं हें प्राण धारण करणारें ( त्रैलोक्य आहे ) तें जिंकील.**

भाष्य—(याज्ञवल्क्यानें) आपणाकडे पहावें ह्मणून, ( अश्वल ) याज्ञवल्क्या, अशी (त्याला) हाक मारून ह्मणाला, किती ऋचांनीं आज हा होता ऋत्विज ह्या यज्ञामध्यें शस्त्रें[१] शंसन करितो? दुसऱ्यानें उत्तर दिलें, तीन ऋक्‌समुदायांनीं. असें ह्मटल्यावर अश्वल पुनः प्रश्न करितो; त्या तीन कोणत्या? हा प्रश्न तीन संख्येनें निर्दिष्ट केलेल्या वस्तूंविषयीं आहे. पहिला प्रश्न ( फक्त ) संख्येबद्दल होता. पुरोनुवाक्या ह्मणजे–ज्या ऋचा यागकालापूर्वीं योजितात त्या ऋक्‌समुदायास 'पुरोनुवाक्या' असें ह्मणतात. यागकाळीं ज्या ऋचांचा उपयोग करितात, ती ऋग्जाति 'याज्या.' शंसन कर्माचे वेळीं ज्या ऋचा ह्मणतात, त्या जातीच्या ऋचांनां ' शस्या ' ह्मणतात. कोणत्याहि जातीच्या ज्या सर्व ऋचा, ह्मणजे स्तोताऋत्विजाच्या ऋचा किंवा दुसऱ्या,या सर्व ऋचांचा ह्या (सदरीं सांगितलेल्या ) तीन जातींच्या ऋचांमध्यें अंतर्भाव होतो. त्या ऋचांनीं काय जिंकितो ह्मणाल तर, जें कांहीं हें प्राणधारण करणारें आहे तें ( मिळतें ). ( तीन लोक व तीन जातींच्या ऋचा ) यांजमध्यें संख्यासादृश्य आहे यावरून ( त्रैलोक्यांतील ) प्राणधारण करणारें जें कांहीं आहे तें सर्व मिळतें. तें सर्व फल ( यजमान ) संपादितो. संख्यासादृश्यावरून ( आपणांस त्रैलोक्य प्राप्त झालें, असें कल्पितो. )

**ऋचा ८—याज्ञवल्क्या, अशी हाक मारून ( अश्वलानें ) आणखी भाषण केलें. आज हा अध्वर्युऋत्विज या यज्ञामध्यें किती आहुति हवन करील? तीन. त्या तीन कोणत्या? (१) ज्यांचा होम केला असतां लखलखीत जळतात, (२) ज्या अग्नींत टाकिल्या ह्मणजे मोठमोठ्यानें ओरडतात, (३) ज्यांचा होम केला असतां खालीं तळाशीं बसतात. त्यांपासून कोणतें फल प्राप्त होतें? ज्या लखलखीत जळतात त्यांच्या योगानें दिव्य स्वर्गलोक प्राप्त होतो, ज्या ओरडतात ( चरचर असा शब्द करतात ) त्या पितृलोकाला पोहोंचवितात, ज्या टाकिल्या असतां ( कुंडाच्या तळाशीं ) खालीं जातात, त्यांच्या योगानें मनुष्य लोक मिळतो; ( कां तर ) मनुष्यलोक खालीं असल्यासारिखा आहे.**

भाष्य—हे याज्ञवल्क्या, असें बोलला हें पूर्वींप्रमाणेंच. आज हा अध्वर्यु ऋत्विज या यज्ञांत किती आहुतींचें हवन करील? आहुतींचे प्रकार किती आहेत? तीन आहेत. त्या तीन ( आहुति ) कोणत्या हें पूर्वींप्रमाणें. दुसरा ( याज्ञवल्क्य ) उत्तर देतो, ज्या समिधा व तूप ह्यांच्या आहुति त्या

---

१—होता ज्या ऋचा ह्मणतो त्यांना शस्त्रें ह्मणतात; व शंसन ह्मणजे शस्त्रें ह्मणणें.

होमात टाकिल्या ह्मणजे प्रकाशयुक्त जळतात. ज्या आहुति फार ओरडतात किंवा शब्द करितात, त्या मांसाच्या वगैरे असतात. ज्या आहुति होमाच्या तळीं जाऊन भूमीवर पसरतात, त्या दुधाच्या किंवा सोमरसाच्या असतात. त्या आहुतींनीं काय जिंकितो ? ह्याप्रमाणें समर्पण केल्यानें ( फलें ) कोणतीं मिळवितो ? ज्या आहुति दिल्याबरोबर भडक जाळ होतो, त्या भडक प्रकाशाच्या आहुति समर्पिल्या, आणि ज्याला देवलोक ह्मणतात तें फल प्रकाशयुक्तच आहे; ह्या सादृश्यावरून ज्या मी ह्या उजळ आहुति समर्पण केल्या, त्या ह्या प्रत्यक्ष देवलोकरूपी कर्म फलाचें स्वरूप होत. ज्याला देवलोक ह्मणतात, तेंच फल मी सिद्ध करित आहें असें यजमान मानितो. ज्या आहुति दिल्या असतां बहुत शब्द करितात, त्यां ( आहुतीं ) च्या योगानें ( यजमान ) पितृलोक मिळवितो; कारण ( दोहोंमध्यें ) कुत्सित शब्द उत्पन्न करण्याचा सारखेपणा आहे. पितृलोकाला जोडलेल्या संयमनी ( यमपुरी ) मध्यें ज्यांस ( यम ) यातना होत असतात, ते जीव 'अरे आम्ही मेलों ! सोड ! सोड !' असे शब्द करितात. तशा (मांसाच्या वगैरे ) अवदानाच्या आहुति ओरडतात. त्यावरून त्यांत व पितृलोकांत सादृश्य असल्यामुळें मी पितृलोक सिद्ध करित आहें असें ( यजमान ) मानितो. ज्या आहुति दिल्याबरोबर खालीं ( भूमीवर ) पसरतात, त्यांच्या योगानें मर्त्यलोक प्राप्त होतो; कारण दोन्ही भूमीवर आहेत, हें त्यांत सादृश्य आहे. मुळांत मर्त्यलोक खालीं असल्यासारखा आहे, असें ह्मटलें; कारण, तो खालींच आहे. वर असणारे लोक प्राप्त करून घ्यावयाचे, त्यांपेक्षां तो खालीं आहे; किंवा ( पापी मनुष्यें ) खालीं भूमीवर जातात, ह्या संबंधानें दूध व सोम यांच्या आहुति देतांना ( यजमान ) मी मनुष्यलोक सिद्ध करित आहें अशी कल्पना करितो.

**ऋचा ९—याज्ञवल्क्या, अशी हाक मारून ( अश्वलानें ) पुन्हा प्रश्न केला. आज हा ब्रह्माऋत्विज दक्षिणेस बसून किती देवतांनीं यज्ञाचें रक्षण करीत आहे ? एक देवतेनें. ती एक देवता कोण ? मनच ती देवता. मन खरोखरीं अनंत आहे. विश्वेदेव अनंत आहेत. त्या मनानें यजमान अनंत लोकाप्रत जातो.**

भाष्य—'याज्ञवल्क्या, अशी हांक मारून तो ह्मणाला' हें पूर्वीप्रमाणें. हा ब्रह्माऋत्विज दक्षिण[१] दिशेस ब्रह्मासनावर बसून यज्ञ राखितो. किती देवतांनीं राखितो ? असा बहुवचनीं प्रश्न ( पूर्वानुक्रमावरून ) प्रसंगवशात् केला आहे; कारण तो एके देवतेनें ( यज्ञ ) रक्षण करतो, असें ( अश्वलाला ) ठाऊक असतांना स्वतः जाणणाऱ्यानें बहुवचनीं प्रश्न करणें योग्य नाहीं; ह्मणन पूर्वीच्या दोन प्रकरणांत असणारे प्रश्नोत्तरांमध्यें कितींनीं किती, तिहींनीं तीन, असा ( अनुवृत्ति ) प्रसंग पाहून ह्या ठिकाणीं देखील बहुवचनानेंच प्रश्नाचा उपक्रम केला आहे. अथवा प्रत्युत्तर देणारास भ्रम पडावा ह्मणून बहुवचन ( योजिलें आहे ). दुसऱ्यानें ( याज्ञवल्क्यानें ) ह्मटलें, एक देवतेनें; ह्मणजे ज्या देवतेच्या बलानें ब्रह्मा दक्षिणेस आसनावर बसून यज्ञ राखितो, ती देवता एक आहे. ती एक ( देवता ) कोणती ? मनच; ह्मणजे मनच ती देवता; कारण ब्रह्मा मनानें ध्यान करण्यांत गुंतलेला असतो. अन्य श्रुतींत[२] ह्मटलें आहे. "त्या यज्ञाच्या मन व

---

१—आहवनीय अग्नीच्या दक्षिणदिशेस ब्रम्ह्याचें आसन असतें.

२—छांदोग्य १-२-४,१६.

वाणी (ह्या दोन) वांटा;" त्यांपैकीं एक वाट ब्रह्मा मनानें संस्कारयुक्त करितो. त्यावरून मन हीच देवता, तिच्या बलानें ब्रह्मा यज्ञरक्षण करतो, आणि तें मन, त्याच्या वृत्ति भिन्नभिन्न असल्यामुळें, अनंत आहे. 'खरोखरीं' (वै) हें अव्यय प्रसिद्ध गोष्ट दाखविण्याकरितां घातलें आहे. मनाचा अनंतपणा प्रसिद्ध आहे. मनाच्या अनंतपणाविषयीं अभिमान धरणारे देव, विश्वेदेव अनंतच आहेत. "सर्व देव ज्या मनांत एकत्र होतात," वगैरे अन्य श्रुति आहेत. असें (मनाचे व लोकांचे) अनंतपणाचे संबंधानें साम्य असल्यामुळें यजमान अनंत लोकाप्रत जातो.

**ऋचा १०—याज्ञवल्क्या, अशी हाक मारून (अश्वलानें) पुन्हां प्रश्न केला. आज ह्या यज्ञामध्यें उद्गाताऋत्विज स्तोत्रिय ऋचा किती ह्मणेल? (उत्तर) तीन. त्या तीन कोणत्या? (१) पुरोनुवाक्या, (२) याज्या, (३) शस्या, ती तिसरी. ज्या अध्यात्म (शारीरिक) तीन ऋचा आहेत, त्या कोणत्या? प्राण तीच पुरोनुवाक्या, अपान ती याज्या, व्यान ती शस्या. त्यां तिहीं (ऋचां) नीं काय संपादन करितो? पुरोनुवाक्या (प्राण) या ऋचेनें पृथ्वीलोकच संपादितो. याज्या (अपान) या ऋचेनें अंतरिक्षलोक संपादितो. शस्या (व्यान) या ऋचेनें स्वर्गलोक संपादितो. त्यानंतर अश्वल होता स्तब्ध झाला.**

भाष्य—'याज्ञवल्क्या, अशी हांक मारून प्रश्न केला,' हें पूर्वींप्रमाणें. किती स्तोत्रिय (स्तवनाच्या ऋचा) हा उद्गाता ह्मणेल? स्तोत्रियें ह्मणजे कित्येक सामऋचांचा समुदाय. स्तोत्रिय ऋचा घ्या, शस्य ऋचा घ्या, किंवा कोणत्याही ऋचा घ्या, त्या सर्व तीनच असें (याज्ञवल्क्य) ह्मणतो. त्या (१) पुरोनुवाक्या, (२) याज्या, (३) व शस्या तिसरी ह्मणून (याज्ञवल्क्यानें) सांगितल्या. ह्या (च ब्राह्मणां) त पूर्वीं सांगितलें कीं, प्राण धारण करणारें जें कांहीं हें सर्व (तें यजमान) प्राप्त करून घेतो; तर (प्राप्य विषय व ऋचा) यांत सारखेपणा कोणता आहे, हें येथें सांगितलें. ज्या (प्राणभृत्) शरीर होतात, त्या तीन ऋचा कोणत्या? 'प्राण' तोच 'पुरोनुवाक्या' (ह्या दोन्ही शब्दांच्या आरंभीं) पकार समान आहे. 'अपान' (ती) 'याज्या' हीं दोन्हीं (पहिल्या दोहोंच्या) मागून येतात. अपानवायूच्या बलानेंच दिलेला हविर्भाग देवता भक्षण करितात. याग करणें ह्मणजें

---

१—वांटा–ब्रह्माऋत्विज केवळ मनानें ह्मणजे मौन धरून वांट शुद्ध करतो. तो बोलल्यास त्याला प्रायश्चित्त करावें लागतें. असें छांदोग्यांत सांगितलें आहे.

२—स्तोत्रिया–ऋचा किंवा श्लोक गाण्याचे सुरानें मोठ्यानें ह्मटले ह्मणजे त्याला स्तोत्र ह्मणतात. सामगायनांतील सुरांवर ऋचा ह्मणतात त्यांस स्तोत्रिय ऋचा ह्मणतात. साध्या सुरानें ऋचा ह्मटल्या तर त्यांनां शस्त्र ह्मणतात.

३—नाभीच्याखालीं अपानवायूचा संचार आहे, त्या वायूनें खाल्लेलें अन्न पचतें, ही गोष्ट देवांसही लागू केलेली आहे.

हविर्भाग देणें. ' व्यान ' ती ' शस्या '. " प्राण किंवा अपान बाहेर न टाकतां ( शस्या ) ह्मणतो " अशीं अन्य श्रुति आहे. ह्या ( तीन ) ऋचांनीं यजमानाला काय प्राप्त होतें, हें पूर्वीं सांगितलें; त्यांत ऋचांचे शरीराशीं विशेष संबंध सांगितले नव्हते, ते येथें सांगितले; बाकी सर्व ( पूर्वीं ) सांगितलें. ( या ऋचाचा तिन्ही ) लोकांशीं समान संबंध आहे, त्यामुळें, ( यजमान ) पुरोनुवाक्या ऋचेनें पृथ्वीलोक, व याज्येनें अंतरिक्ष लोक मिळवितो. याज्या व अंतरिक्ष लोक मध्यभागीं आहेत हें त्यांतील साम्य. शस्येनें स्वर्गलोक मिळवितो; कारण शस्या व स्वर्गलोक हीं शेवटीं येतात ह्मणून समान आहेत. ( इतकें भाषण झालें ); नंतर आपले प्रश्नाचा निकाल लागला असें मानून होता अश्वल स्तब्ध झाला. हा याज्ञवल्क्य आपल्या आटोक्यांत नाहीं, ( असें त्यास वाटलें ).

**अध्याय ३, अश्वलब्राह्मण समाप्त.**

१—" अप्राणन्ननपानन्नृचमभिव्याहरति." छा. १-३-३, ४, ५.

# आर्तभाग ब्राह्मण.

## ग्रह व अतिग्रह ह्यांपासून अतिमुक्ति.

## अध्याय ३, ब्राह्मण २.

ऋचा १—मग त्याला ( याज्ञवल्क्याला ) आर्तभाग जारत्कारव ह्यानें प्रश्न केला. याज्ञवल्क्या, अशी ( हाक मारून ) भाषण केलें. ग्रह किती आहेत व अतिग्रह किती आहेत ? ग्रह आठ आहेत; अतिग्रह आठ आहेत. जे ते आठ ग्रह व आठ अतिग्रह ते कोणते ?

भाष्य—प्रस्तावना-( या ब्राह्मणांतील ) कथेचा संबंध स्पष्टच आहे. ( मागील ब्राह्मणांत ) कालस्वरूप आणि कर्मस्वरूप मृत्यूपासून अतिमुक्ति सांगितली; पण ज्या ( मृत्यू ) पासून अतिमुक्ति सांगितली तो हा मृत्यु कोण ? तो मृत्यु नैसर्गिक[1] ( अनादिसिद्ध ) अज्ञानासक्तिमूलक आध्यात्मिक ( शारीरिक ) व आधिभौतिक ( पांच भौतिक ) विषयांस व्यापून असणारा ग्रहस्वरूप[2] व अतिग्रहस्वरूप[3] होय. अशा व्यक्त मृत्यूपासून अतिमुक्त झालेल्या ( पुरुषाचीं ) अग्नि, आदित्य इत्यादि स्वरूपें उद्गीथ प्रकरणांत सांगितलीं. अश्वलाचे प्रश्नावरून तत्संबंधी कांहीं विशेष[4] गोष्ट सांगितली. ती ही ( अतिमुक्ति ) ज्ञानसहित कर्माचें फल होय. हीं कर्मफलें व साधनीभूत कर्में एतद्विशिष्ट जो संसार त्यापासून मोक्ष साधावयाचा आहे, ह्मणून बंधनकारक मृत्यूचें स्वरूप ( श्रुति ) सांगत आहे. बद्धानें मोक्ष मिळवावा.

अतिमुक्ताचें ह्मणून जें स्वरूप सांगितलें त्यांत देखील मृत्युरूप ग्रहातिग्रहांतून तो सुटलेला नसतोच. आणि असें ह्मटलें आहे कीं " अशनाया[5] ( क्षुधा ) च मृत्यु. " हाच मृत्यु व आदित्यांतील पुरुषाचे संबंधानें श्रुति ह्मणते " एक मृत्यु बहुत स्वरूपाचा आहे.[6] " ह्यावरून आत्मस्थितीला पोहोंचलेला मात्र मृत्यूच्या व्याप्तींतून अतिमुक्त असें ( शेवटीं ) सांगितलें आहे.

( सूत्रात्मा ह्मणजे हिरण्यगर्भ, या स्वरूपांत असला तरी ) तेथें ग्रह व अतिग्रह हीं मृत्युस्वरूपें असत नाहींत असें नाहीं. ( त्या स्वरूपांत मन आहेच ); आणि त्या मनाचें स्वर्गलोक हें शरीर आहे; आणि आदित्य हा त्याचें जोतिरूप आहे. पुढें सांगेलं[7] कीं " मन हा ग्रह आहे,

---

१—अज्ञान अनादिसिद्ध ब्रह्माबरोबर आहे असें आचार्यांचें मत आहे.

२—ग्रह ह्मणजे परस्वाधीन करणारी किंवा धरणारी वस्तु.

३—अतिग्रह ह्मणजे अत्यंत परवश करणारी वस्तु.

४—अश्वलाला उत्तर दिलें त्यांत वाणी हा अग्नि आहे असें आपण पाहूं लागलों ह्मणजे मुक्ति प्राप्त होते; आणि आपणच अग्नि आहों अशी भावना केली ह्मणजे अतिमुक्ति प्राप्त होते, व प्रत्येक इंद्रियाविषयी त्या त्या इंद्रियाच्या देवतेची भावना केली असतां आतिमुक्ति प्राप्त होते ही विशेष गोष्ट.

५—बृह १-१-२. ६—एको वै मृत्युर्बह्वा. ७—पहा सातवी ऋचा.

तो कामरूपी अतिग्रहानें धरिलेला आहे. " " प्राणच ग्रह तो अपान अतिग्रहानें " ( धरिलेला आहे ) " वाणीच ग्रह, तो नाम( संज्ञा )रूप अतिग्रहानें ( व्याप्त असतो ). " ह्याप्रमाणें आह्मीं व्यन्नविभागप्रकरणांत स्पष्ट केलें आहे. शिवाय पुष्कळ विचारानें हें ठरविलें आहे कीं, जें प्रवृत्तीला कारण होतें, तेंच निवृत्तीला कारण होत नाहीं.

कित्येक, सर्व ( कर्म ) निवृत्तीला कारण ( निवृत्तस्थिति देणारें ) आहे, असें मानतात; म्हणूनच प्रथम प्रथमच्या ( कर्मरूप ) मृत्यूपासून मुक्त होतो, व पुढच्या पुढच्या ( कर्मांत ) पडतो तो त्यांतून मुक्त होण्याकरितांच ( तीं कर्में बाजूला टाकण्याकरितां ) पडतो, तद्रूप होण्याकरितां त्यांत पडतो असें नाहीं. ह्यावरून ( एकंदर ) द्वैताचा क्षय होईपर्यंत सर्व ( कर्मे ) मृत्यु ( स्वरूप ) आहेत, परंतु द्वैतक्षय झाला ह्मणजे मृत्यूच्या व्याप्तींतून खरा अतिमुक्त होतो. याकरितांच दर्म्यान गौण ( कमी दर्जाची ) आपेक्षिक ( आवडेल ती ) मुक्ति आहे.

हें सर्व असें ( ह्मणणें ) बृहदारण्यकोपनिषदाबाहेरचें आहे. " सर्वांचा एकपणा मोक्ष " " त्यापासून ( ब्रह्मापासून ) तें सर्व उत्पन्न झालें " अशी श्रुति आहे, असें कोणी ह्मणेल तर होय, तसेंही आहे; परंतु "गांवाच्या इच्छेनें यज्ञ करावा," " पशूची इच्छा धरणारानें यज्ञ करावा. " वगैरे श्रुति आहेत, त्या ब्रम्हप्राप्तीकरितां आहेत असें नाहीं. गांव, पशू, स्वर्ग वगैरे प्राप्त होण्याकरितां या श्रुति नाहींत, अद्वैतब्रह्मप्राप्तीकरितां या श्रुति आहेत, असें असतें तर ग्राम, पशू, स्वर्ग वगैरे (पदार्थ) कोणी पत्करले नसते; पण भिन्नभिन्न कर्मांचीं भिन्नभिन्न विशेष फलें पत्करतात. आणि ( सर्व ) वैदिक कर्में तत्प्राप्त्यर्थच ( ब्रह्मप्राप्त्यर्थ ) असतीं तर संसारच उत्पन्न झाला नसता.

आतां ( कर्में ) तदर्थ ( ब्रह्मप्राप्त्यर्थ ) असलीं तरी संसार हा तज्जनित ( कर्म ) पदार्थांचा स्वभाव आहे. उदाहरण, स्वरूपें पाहण्याकरितां प्रकाश आहे तरी त्यांतील सर्व पदार्थ प्रकाशित होतातच. असें ह्मणाल तर तसें नाहीं. ( ह्या ह्मणण्याला ) प्रमाण नाहीं. अद्वैत ब्रह्मप्राप्तीकरितां ज्ञानसहित वैदिक कर्में केलीं असतां ' अन्य ( संसार बंध ) निष्पन्न होतो असें म्हणण्याला प्रमाण नाहीं. प्रत्यक्ष ( प्रमाण ) नाहीं, अनुमान ( प्रमाण ) नाहीं; आणि म्हणूनच ( श्रुति-

---

१—पहा दुसरी ऋचा. २—बृह. १—५—३

३—स्वर्ग मिळविण्याच्या यागाचे आज्ञेनें देह आत्मा नव्हे हें कळतें, गोदोहन विधीमध्यें कर्माधिकार स्वाधीन नाहीं असें कळतें. नित्य नैमित्तिक विधीमध्यें कांहीं निराळे प्राप्त करून घेण्याचा उपदेश असतो त्यामुळें स्वच्छन्दप्रवृत्ति बंद होते. निषेध वाक्यानीं स्वाभाविक प्रवृत्ति बंद होते. याप्रमाणें सर्वच कर्मकांड निवृत्ति उत्पन्न करणारे व मोक्ष देणारे आहे—आनंदगिरि.

४—अध्याय ३, ब्राह्मण १, ऋचा ३ वगैरे ह्यांतील मुक्ति.

५—अध्याय १, ब्राह्मण ४, ऋचा १०.

६—सर्व एकच ब्रह्म आहे तर कर्में सर्व ब्रह्मच आहेत, आणि ब्रह्मप्रापक आहेत, ह्मणून केलीं पाहिजेत.

स्मृति ) प्रमाणही नाहीं. पाण्याचे पाट ( निरनिराळ्या कामाकरितां ) बांधून आणणें, ( किंवा ) प्रकाशाप्रमाणें, एका ( कर्मविधायक श्रुतिवाक्यानेंच संसार व ब्रह्म हीं ) दोन्हीं दाखविलीं जातात, असें म्हणाल तर, तें वाक्याचें लक्षणावरून सिद्ध होणार नाहीं.[2] एके वाक्यांतील अर्थ प्रवृत्ति व निवृत्ति ह्या दोन्हींला साधक होईल असें समजणें शक्य नाहीं. पाण्याचा पाट आणणें किंवा प्रकाश ( ह्यांपासून भिन्नभिन्न कामें होतात किंवा पदार्थ दृष्टीस पडतात ) ही प्रत्यक्ष अनुभवाची गोष्ट असल्यामुळें त्यांत ( एकापेक्षां अधिक प्रयोजनें असतात असें म्हणण्यास दोष नाहीं. ( दोन्ही गोष्टी प्रवृत्ति व निवृत्ति एक ठिकाणींच आहेत; ज्ञानाची व कर्माची सांगड आहे ) ह्या अर्थाचे मंत्र आढळतात, असें जरी म्हटलें तरी, हाच त्यांचा अर्थ हें प्रमाणानें सिद्ध होणारें नव्हे. शिवाय मंत्र, या किंवा अन्यार्थी आहेत ? याविषयीं विचारच पडेल. करितां ग्रहातिग्रहरूप मृत्युबंधन ( अज्ञजनांस ) आहे त्यांतून मोक्ष कसा प्राप्त करून घ्यावा हें सांगणें अवश्य आहे; त्याकरितां पुढील ग्रंथाचा आरंभ आहे.

दोन ( प्रवृत्ति व निवृत्ति ) प्रकरणांच्या मध्यभागीं राहून अर्धी ह्यातारी ( असें ह्मणण्यांत जें ) चातुर्य ( लोक दाखवित असतात ) तें आह्मांस येत नाहीं. मृत्यूपासून अतिमुक्ति होते असें सांगून, ग्रह व अतिग्रह ( या ब्राह्मणांत ) सांगितलें ते अर्थसंबंधानें आले. हा सर्व साध्य साधनरूप बंध आहे; कां तर ग्रह आणि अतिग्रह यांतून ( कोणी ) सुटलेला नाहीं. बेड्या कोणत्या आहेत हें कळल्यावर बद्धानें बेडींतून सुटण्याकरितां यत्न करावयाचा असतो. ह्मणन त्याकरितां ( बेड्या सांगण्याच्या हेतूनें ) पुढील ग्रंथाचा आरंभ आहे.

‘ मग त्याला ’ ( या पुढें मुळांत ) “ ह ” हें अव्यय आहे, ह्याचा हेतु इतिहास ( सुचविण्याचा आहे ). मग अश्वल थांबल्यावर सदरचा याज्ञवल्क्य ( तेथें होता ) त्याला जरत्कारु गोत्रांतला जारत्कारव–ऋतभागाचा मुलगा आर्तभाग–ह्यानें प्रश्न केला. याज्ञवल्क्यानें आपणाकडे पहावें ह्मणून याज्ञवल्क्या, अशी हाक मारली, व प्रश्न पूर्वींच्या रीतीनेंच केला. ग्रह किती, व अतिग्रह किती ? ( प्रश्नाचें शेवटीं ) ‘ इति ’ शब्द आहे तो प्रश्न-वाक्य पूर्ण झाल्याचें दाखवितो. आतां ग्रह व अतिग्रह आर्तभागाला माहित असतां त्यानें प्रश्न केला किंवा माहित नसल्यामुळें प्रश्न केला ( असे दोन पक्ष होतील ). जर ग्रह व अतिग्रह आर्तभागाला माहित होते, तर त्यांचा संख्यागुण ( ते किती आहेत ही गोष्ट ) त्याला माहित असल्यामुळें ग्रह किती व अतिग्रह किती हा प्रश्न योग्य होत नाहीं. आतां त्याला माहित नव्हतें असें घेतलें असतां ज्या पदार्थांची संख्या विचारली ते पदार्थ कोणते, ह्मणजे ग्रह कोणते, व अतिग्रह कोणते, असेंच आर्तभागानें विचारणें जरूर होतें. ग्रह किती आहेत व अतिग्रह किती आहेत ? असा प्रश्न केला नसता. शिवाय सामान्य स्वरूप माहित असतांना विशेष स्वरूप जाणावयाचें असल तर प्रश्न

---

१—बारीक पाण्याचे बारीक ओहोळ वाहत असतात त्यांस पाट ह्मणतात. पाटापासून शेत भिजतें, पिण्याचें पाणी मिळतें, व हातपाय धुवावयास पाटाचें पाणी उपयोगीं पडतें.

घरास शोभा यावी ह्मणून दिवा टांगतात. त्यापासन उजेड होतो, जाणारायेणारास वाट समजते व दिव्याचे उजेडांत असणारे सर्व पदार्थ दिसतात.

२—एका वाक्याचा एकच अर्थ निघतो असा सिद्धांत आहे.

विचारतात तो असा कीं, येथें ( जमलेल्या मंडळींत ) कठ कोणते आहेत, कालाप कोणते आहेत? प्रकृत गोष्टींत ग्रह किंवा अतिग्रह नांवाचे कांहीं पदार्थ लोकप्रसिद्ध आहेत, असें नव्हतें. तसें असतें तर विशेष मजकुराचा प्रश्न योग्य झाला असता. आणखी अतिमुक्त होतो असें ह्मटलें. ग्रहांत सांपडला असेल त्याचा मोक्ष तोच मुक्ति, व तीच अतिमुक्ति असें द्विवार कां ह्मटलें ? अशी शंका येईल. त्यावरून बंधनें ( ग्रह ) व अतिबंधनें ( अतिग्रह ) आलीं. पण त्यांतही वाणी, चक्षु, प्राण व मन हे चार ग्रह व अतिग्रह ठाऊकच आहेत, तर किती हा प्रश्न योग्य होत नाहीं, कारण ते प्रसिद्ध आहेत. असें नव्हें. अनिश्चय असल्यामुळें प्रश्न केलेला आहे. चार आहेत असें सांगण्याची इच्छा नव्हती, परंतु ह्या स्थळीं ग्रहातिग्रहांचा विचार करतांना ते आठ आहेत असें सांगावयाचें होतें. ह्मणून किती हा प्रश्न योग्यच आहे. आणि याच कारणाकरितां तोच मुक्ति, तीच अतिमुक्ति असें द्विवार ह्मटलें. ग्रह व अतिग्रह ( हीं दोन्हीं ) असल्याचें सिद्ध झालें. ह्मणून ग्रहांची संख्या किती व अतिग्रहांची संख्या किती असा प्रश्न आर्तभाग करतो. दुसऱ्यानें ( याज्ञवल्क्यानें ) उत्तर दिलें—ग्रह आठ, व अतिग्रह आठ आहेत. आतां जे ते आठ ग्रह सांगितलें, ते कोणते निश्चयानें घ्यावे ? असें ( शेवटीं विचारलें. )

**ऋचा २—प्राण ( घ्राणवायु ) हा एक ग्रह ( बंधन ) आहे. हा घ्राण अपान ( वायुगत गंधरूपी ) अतिग्रहानें धरलेला आहे. अपान वायूच्या साह्यानें वास घेतो.**

भाष्य—ह्यावर (ग्रहातिग्रहांच्या संबंधानें याज्ञवल्क्य) म्हणतो प्राणच ग्रह. प्राण शब्दानें घ्राणाचा निर्देश केला आहे; कारण ( हें ) प्रकरण ( इंद्रियांविषयीं आहे. ) तें ( घ्राण ) वायुसहित असतें. अपानानें ह्मणजे गंधानें असें ( समजावें ); गंध वाहण्याला अपानवायूचें साह्य लागतें, म्हणून गंधाला अपान म्हणतात. अपानवायूबरोबर गंध येतो, तो सर्व लोक नाकानें ( घ्राणानें ) घेतात. त्यावरून ( मुळांत ) म्हटलें आहे—अपानानें वास घेतो.

**ऋचा ३—वाणीच ग्रह. हा नामानें ( वक्तव्यविषयरूप ) अतिग्रहानें बद्ध होतो; वाणीनेंच नामें उच्चारितो.**

**ऋचा ४—जिव्हाच ग्रह. ती रसरूप अतिग्रहानें बद्ध आहे; जिव्हेनेंच रस जाणतो.**

**ऋचा ५—चक्षु ( डोळा ) च ग्रह. तो रूपविषयक अतिग्रहानें बद्ध आहे. डोळ्यानेंच रूपें पाहतो.**

**ऋचा ६—कान (श्रोत्र) च ग्रह. तो शब्दरूप अतिग्रहानें बद्ध असून कानानेंच शब्द ऐकतो.**

**ऋचा ७—मनच ग्रह. तें इच्छारूप अतिग्रहानें बद्ध होतें; मनानेंच इच्छा करतो.**

**ऋचा ८—दोन हातच ग्रह. ते कर्मरूप अतिग्रहानें बद्ध होतात; हातांनीं कर्म करितो.**

**ऋचा ९—त्वचाच ग्रह. ती स्पर्शरूपी अतिग्रहानें बद्ध झाल्यामुळें स्पर्श ओळखितो.**

**ह्याप्रमाणें आठ ग्रह व आठ अतिग्रह आहेत.**

---

१ प्राचीनकाळीं कठ ब्राह्मण, कालाप ब्राह्मण अशा ब्राह्मणाच्या शाखा असत.

भाष्य—वाणीच ग्रह; कारण, शारीरिक मर्यादेनें मर्यादित ( शब्दादि ) विषयासक्तीच्या कारणानें उत्पन्न झालेल्या असत्य[1], अनृत[2], असभ्य[3], बीभत्स[4] वगैरे[5] भाषणांत गुंतलेल्या वाणीनें लोक मोहित झालेले असतात; त्यामुळें वाणी हा एक ग्रह ( म्हणजे बंधन आहे ). ती वाणी नामातिग्रहानें बांधली जाते. तो वाणीनामक ग्रह वक्तव्यविषयरूप नामातिग्रहानें धरलेला आहे. मुळांत 'अतिग्राह' असा शब्द आहे. त्यांतील दीर्घ अकार खचित आर्ष आहे. जें बोलावयाचें त्याच्याकरितां ह्मणून वाणी त्या वक्तव्यविषयानें प्रेरित झाली ह्मणजे त्याच्या स्वाधीन असते; त्यामुळें तें काम केल्याशिवाय तिची सुटका ( मुक्ति ) नाहीं. याकरितां वाणी नामरूपी अतिग्रहानें बद्ध आहे, असें म्हटलें. वक्तव्यविषयावरील आसक्तीनें वाणी प्रवृत्त झाली म्हणजे सर्व प्रकारचे अनर्थांत पडते. बाकी ऋचांचा अर्थ सारखाच. ह्याप्रमाणें ( प्राण, वाक् वगैरे ) त्वचेपर्यंत आठ ( इंद्रियें ) ग्रह होत, व त्यांचे ( गंधादिक ) स्पर्शापर्यंत आठ विषय, आठ अतिग्रह होत. असें ३, ४, ५, ६, ७, ८, ९ या ऋचांमध्यें वर्णन आहे.

**ऋचा १०—याज्ञवल्क्या, अशी हाक मारून ( आर्तभागानें पुढील ) प्रश्न केला. जर हें सर्व मृत्यूचें अन्न आहे; तर ज्या देवतेचें मृत्यु अन्न आहे, ती देवता कोण ? अग्नि हा मृत्यूच आहे पण तो उदकाचें अन्न आहे. ( पुरुषच ) पण मृत्यूला जिंकितो.**

भाष्य—ग्रह व अतिग्रह संपवल्यावर ( श्रुति ) पुन्हां ह्मणते—' याज्ञवल्क्या अशी हाक मारून ( आर्तभाग ) बोलला,'–जें हें सर्व मृत्यूचें अन्न ( ह्मणजे ) जें हें सकल प्रकट केलेलें ( वस्तुजात ) मृत्यूला अन्नरूप आहे, तें सगळें उत्पन्न होतें व ग्रहातिग्रहरूप मृत्यूनें गिळलें ह्मणजे नाश पावतें. ज्या देवतेचें मृत्यु देखील अन्न होईल, ती देवता कोणती असावी ? कां तर अन्य श्रुतींत ह्मटलें आहे. " मृत्यु[6] ज्याची शाक भाजी " आहे.

( प्रश्न करणाऱ्याचा ) अभिप्राय असा—( उत्तर देणारा जर ) मृत्यूचाही मृत्यु सांगेल, तर अनवस्था होईल[7]; आणि ( मृत्यूचा मृत्यु ) न सांगेल तर, ग्रहातिग्रहरूप मृत्यूपासून मोक्ष संभवत नाहीं. ग्रहातिग्रहरूप मृत्यूचा नाश होईल तरच मोक्ष होईल; ( आणि ) असा तो मृत्यूचाही मृत्यु असेल तर ग्रहातिग्रहरूप मृत्यूचा नाश होईल. या कारणाकरितां[8] ( आपला ) प्रश्न निरुत्तर आहे असें मानणारा ( आर्तभाग ) प्रश्न करतो कीं, 'ती देवता कोणती' ( वगैरे ).

---

१—ज्या खोट्या वचनापासून परपीडा होते तें असत्य.

२—स्वतः पाहिलेल्या गोष्टीविषयीं विरुद्ध वर्णन करणें तें अनृत.

३—थोरवीस अयोग्य तें असभ्य.

४—ग्राम्य अगर घाणेरडें भाषण तें बीभत्स.

५—वगैरे शब्दानें इष्ट अनिष्ट भाषण घ्यावें.

६—" मृत्युर्यस्योपसेचनम् " कठवल्ली २, ऋचा २५.

७—दांताचा दांत, डोळ्याचा डोळा वगैरे ह्मटलें तर शेवट कधींच होत नाहीं, ह्मणून तसें ह्मणणें अप्रयोजक होईल. ह्या अपवादाला अनवस्था ह्मणतात.

८—मृत्यूचा मृत्यु आहे असें ह्मटलें तर अनवस्था होईल, नाहीं ह्मटलें तर मोक्षाचा अभाव ह्मणावा लागेल. ह्मणून प्रश्न निरुत्तर आहे असा आर्तभागाचा आशय आहे.

मृत्यूचा मृत्यु आहे यात शंका नाहीं. ( मृत्यूच्या मृत्यूचा ) आणखी दुसरा मृत्यु अशी अनवस्था होईल अशी शंका येते; ( पण या बाबतींत ) अनवस्था नाहीं. सकल वस्तूंचा विनाश करणारा जो मृत्यु असेल त्यास दुसरा मृत्यु असण्याचा संभव नाहीं. मग वर्णिलेल्या मृत्यूचा मृत्यु आहे हें कशावरून समजावयाचें ? ( ग्रहातिग्रहाप्रमाणें विनाशक वस्तूंचा दुसरा विनाशक असतो हें आपण ) पाहिलेलें आहे. उदाहरण, सर्व ( विदाह्य ) वस्तूंचा अग्नि मृत्यु आहे, हें पाहिलेलें आहे; कारण, अग्नि नाश करितो. त्याला उदक खातें, ( ह्यावरून ) तो अग्नि उदकाचें अन्न आहे. तर मग असें समज कीं मृत्यूचाही मृत्यु आहे; आणि तो मृत्यूचा मृत्यु सर्व ग्रहातिग्रह खातो. ( ग्रहातिग्रहरूप ) बंधन या मृत्यूनें खाल्लें ह्मणजे संसारापासून मोक्ष होणें हें युक्त होतें. ग्रहातिग्रहरूप बंधन आहे असें ( पूर्वीं ) सांगितलें; आणि त्यापासून मोक्ष होणें योग्य आहे, हें सिद्ध झालें. यां ( सर्व कारणां ) वरून बंधापासून मोक्ष होण्याकरितां पुरुष प्रयत्न करितो, तो ( निष्फल होत नाहीं, ) सफल होतो; त्यामुळें तो मृत्यूला ( ही ) जिंकितो.

**ऋचा ११—याज्ञवल्क्या, अशी हाक मारून ( आर्तभाग ) बोलला. जेव्हां हा पुरुष मरतो तेव्हां प्राण त्यांतून उठून जातात कीं नाहीं? याज्ञवल्क्य ह्मणाला, नाहीं; नाहीं. ( ते प्राण ) यांतच लीन होतात. तो फुगतो, त्यांत वारा भरतो, आणि वाऱ्यानें फुगलेला मरून ( निचेष्ट ) पडतो.**

भाष्य—( परमात्मदर्शनरूप ) मोठ्या मृत्यूनें ( ऐहिक ) मृत्यु खाल्ला ह्मणजे तो विद्वान् मुक्त पुरुष ज्या समयाला मरतो, ( त्या समयीं ) त्या मरणाऱ्या ब्रह्मवेत्त्यांतून प्राण ह्मणजे वाचा आदिकरून ग्रह, ( व ) नाम आदिकरून अतिग्रह त्यामध्यें वासनारूपानें अंतस्थ ( आंत राहणारे, देहांतराला ) कारणीभूत होणारे, बाहेर निघून जातात कीं नाहीं ? नाहीं, असें याज्ञवल्क्य म्हणाला. ( ते प्राण ) बाहेर निघून जात नाहींत. तेथेंच ह्मणजे त्या पुरुषांतच परमात्म्याशीं संगत होतात. विद्वानांची शरीरें ( कार्यें ) आणि इंद्रियें ( करणें ) परब्रह्मरूप उत्पत्तिस्थानामध्यें लीन होतात; ह्मणजे एकरूप होऊन संसृष्ट होतात; उदाहरण, सागरामध्यें लाटा एकरूप होऊन समुद्रांत मिळतात. याप्रमाणेंच अन्य श्रुति कलासंज्ञक प्राणांचा परमात्म्याचे ठायीं लय दाखविते. " याप्रमाणेंच पूर्ण दर्शन झालेल्या ( पुरुषाच्या ) ह्या सोळा कला पुरुषांत रहाणाऱ्या, त्या ( परम ) पुरुषाप्रत जाऊन अस्ताला जातात. " याप्रमाणें प्राण परमात्म्याशीं संयुक्त होतात असें दाखविलें आहे; तर ( मग ) तो मेला नाहीं ? होय, तो मेला नाहींच; कारण तो फुगतो, त्यांत उलटा बाहेरचा वारा भरतो. भात्यात वारा शिरला ह्मणजे भाता फुगतो त्याप्रमाणें, तो फुगून निचेष्ट पडतो. ( मेला असें लोक मात्र ह्मणतात. ) बंधननाश होऊन मुक्त झालेल्या पुरुषास कोठेंही जावें लागत नाहीं, असा या( श्रुति )वाक्याचा अर्थ आहे.

---

१—बाहेर जातात असें ह्मणावें तर 'ध्रुवं जन्म मृतस्य च.' मरणाराला पुन्हा जन्म आहेच या न्यायानें पुनर्जन्म येणार. प्राण बाहेर जात नाहींत हा पक्ष घेतला असतां जीवन्मुक्त देखील मरतात, असें लोकांत दिसतें तें खोटें ठरेल. पण हा दुसरा पक्ष याज्ञवल्क्यानें खोडून काढला आहे.

२—विषयसहित अकरा इंद्रियें ( पंचज्ञानेंद्रियें, पंचकर्मेंद्रियें, व अंतःकरण ), व पंचप्राण मिळून पुरुषाच्या सोळा कला आहेत. त्या पुरुषांतच राहतात.

पहा " एवमेवास्य परिद्रष्टुरिमाःषोडशकलाः पुरुषायणाः पुरुषंप्राप्यास्तंगच्छान्ति " प्रश्न ६–५.

**ऋचा १२—याज्ञवल्क्या, अशी हाक मारून पुन्हा ( आर्तभाग ) ह्मणाला. जेव्हां हा पुरुष मरतो, ( तेव्हां ) त्याला काय सोडीत नाहीं ? ( उत्तर ) नाम ( नांव ). नाम खरोखरी अनंत आहे, आणि विश्वेदेव ( सर्व देव ) अनंत आहेत; ह्मणून तो अनंतलोकांप्रत पावतो.**

भाष्य—मुक्त पुरुषाचे प्राण मात्र लीन होतात, किंवा प्राणाची सर्व कारणें देखील लीन होतात? आतां ( एकपक्षीं ) प्राणच तेवढे लीन होतात; त्यांचीं सर्व कारणें लीन होत नाहींत. कारणें विद्यमान असलीं तर प्राणांची पुन्हां गांठ पडेल. आतां ( अन्यपक्षीं ) सर्व कामना व कर्मे वगैरे ( कारणें ) हीं लीन होतात, असें ह्मटलें तरच मोक्ष होणें युक्त होतें; अशा अर्थी पुढील प्रश्न आहे. याज्ञवल्क्या, अशी हाक मारून ( आर्तभागानें ) भाषण केलें कीं, जेव्हां हा पुरुष मरतो ( मृतवत् भासतो ), ( तेव्हां ) त्याला काय सोडीत नाहीं ? दुसरा ( याज्ञवल्क्य ) ह्मणतो; नाम. सगळें कांहीं लीन होतें असा अर्थ घ्यावयाचा; परंतु नाम मात्र लीन होत नाहीं; कारण त्याचा शरीररूप ) आकृतीशीं संबंध आहे. नाम नित्यच आहे, अनंतच आहे. नाम नित्य असणें हाच त्याचा अनंतपणा. नामाच्या आनंत्यानें युक्त असलेले विश्वेदेवही अनंतच आहेत. त्यामुळें तो अनंत लोक जिंकितो. त्या नामाच्या अनंतपणाप्रत पावलेले विश्वेदेवांप्रत, ते आत्मस्वरूप आहेत असें पाहून तो अनंतपणा पाहिल्यामुळें, ( मुक्तपुरुष ) अनंत लोकांप्रत जातो.

**ऋचा १३—( आर्तभागानें ) याज्ञवल्क्या, अशी हाक मारून पुन्हा भाषण केलें. जेव्हां ह्या मेलेल्या पुरुषाची वाणी अग्नीप्रत जाते, प्राण वायूप्रत, चक्षु आदित्याप्रत, मन चंद्राप्रत, कान दिशांप्रत, शरीर पृथ्वीप्रत, आत्मा ( हृदय ) आकाशाप्रत, लव औषधीप्रत, व केंस वनस्पतींप्रत जातात, रक्त व रेत जलांत ठेविले जातें, तेव्हां हा पुरुष कोठें असतो ? ( उत्तर )—सच्छिष्या आर्तभागा, तुझा हस्त इकडे आण, आपण दोघेच याविषयीं ज्ञान संपादन करूं. आपली ही ( वस्तु ) मंडळी जमलेल्या या ठिकाणीं ( ठरणार ) नाहीं. ( असें बोलून ) ते दोघे तेथून दूर जाऊन ( आपसांत ) विचार करूं लागले; व ते दोघे, ( शेवटीं ) जें बोलले, तें कर्माविषयींच बोलले. त्या दोघांनीं जें वाखाणलें, तें कर्म वाखाणिलें. पुण्यकर्म केल्यानें पुण्यवानच होतो; पापकर्मानें पापी होतो. मग जारत्कारव आर्तभाग स्तब्ध राहिला.**

उपसंहार भाष्य—ग्रहातिग्रहरूप मृत्युरूपी बंधन सागितलें; आणि त्या मृत्यूचा मृत्यु ( परमात्मज्ञान ) असल्यामुळें मोक्ष सिद्ध होतो. दिव्याच्या विझण्याप्रमाणें ग्रहातिग्रहांचीं ( भिन्न भिन्न ) स्वरूपें ह्या लोकींच लीन होणें तोच मोक्ष. जें ग्रहातिग्रह नांवाचें मृत्युरूप बंधन आहे, त्याचीं जीं कारणें, त्यांचे स्वरूपाचा निर्णय करण्याकरितां या ( ग्रंथा ) चा आरंभ आहे. 'याज्ञवल्क्या, अशी हाक मारून बोलला वगैरे.'

या प्रकरणाच्या संबंधानें, कित्येक ( आचार्य[1] ) अशी व्याख्या करितात कीं, कारणसहित ग्रहातिग्रहांचा नाश झाला तरी ( पुरुष ) मुक्त होत नाहींच. नामशेष राहतो. आणि

१—न्यायदर्शन वादी.

त्याच्यापासून उत्पन्न झालेली अविद्या[1] ( मृगजळाला आधारभूत होणारी ) नापीक जमीनीसारखी असते; त्यामुळें ( पुरुष ) परमात्मस्वरूपापासून भिन्न असतो आणि भोग्य पदार्थांपासून दूर होऊन त्याच्या कामना व त्याचीं कर्में उच्छिन्न होतात; तो अंतराळीं राहतो. त्याची आपण व परमात्मा एकच आहों अशा दृष्टीनें द्वैतदृष्टि दूर व्हावयाची असते, ह्मणून त्यानंतर परमात्मविचार आरंभावयाचा असतो. ह्मणून या प्रकारची दरम्यान एक मुक्तस्थिति ह्मणजे अंतराळीं राहणें कल्पून ( त्या कल्पनेशीं ) पुढील ग्रंथाचा संबंध जोडतात.

त्याजवर विचारावें कीं, इंद्रियें गळाल्यावर देहरहित पुरुषाला परमात्म्याचें दर्शन, श्रवण, मनन, व निदिध्यासन कसें व्हावें ? ते ह्मणतात पुरुषाचे प्राण लीन झाले, आणि तो नामशेष झाला तरी ( ह्या क्रिया चालतील; ) कारण (मागील) श्रुतींत 'मेलेला तो निजतो' असेंच ह्मटलें आहे; (पण) मनोराज्यांतही हें श्रवण वगैरे सिद्ध करणें शक्य नाहीं. आतां अन्यपक्षीं जिवंत असतांनाच अविद्या मात्र शिलक राहिली, (आणि) भोग्य विषयांतून निवृत्त झाला, असें कल्पिलें तर तें तरी कोणत्या हेतूनें हें विचारावें. समस्त द्वैताला एकरूपता देऊन आत्मप्राप्ति करण्याचे हेतूनें तो राहतो, असें ह्मणण्यांत येईल तर तें ( आह्मीं ) पूर्वींच मोडून काढलें आहे. कर्मसहित द्वैत एकरूप आहे, अशा आत्मज्ञानानें परमात्म्याचें दर्शन घेणारा विद्वान् मेला व त्याचे प्राण लीन जाले, तर तो ( विराटस्वरूप ) जगदात्मा हिरण्यगर्भ होईल, अथवा प्राण लीन न होतां जिवंतपणींच भोग्य वस्तूंपासून निवृत्त होऊन विरक्त होत्सातां परमात्म्याचे दर्शनांत राहील.

पण ह्या दोन्ही गोष्टी ( हिरण्यगर्भपदप्राप्ति व भोगनिवृत्ति ) एकाच तऱ्हेच्या प्रयत्नानें उत्पन्न केलेल्या साधनानें प्राप्य नाहींत. हिरण्यगर्भस्वरूपाची प्राप्ति होण्यास साधन असेल, तें विषयनिवृत्तीला साधन होणार नाहीं. विषयनिवृत्ति परमात्मदर्शनाला साधन असेल, तर ती हिरण्यगर्भस्वरूपप्राप्तीला साधन होणार नाहीं; कारण जें गतीचें साधन असतें तें गतिनिवृत्तीला ( अगतीला ) कारण होत नाहीं. एकपक्षीं ( कर्मकरून ) मरण पावून, हिरण्यगर्भस्वरूपांत जाऊन, प्राणलीन केले, व नामरूपानें बाकी राहिला तर परमात्मज्ञानाचा अधिकारी होईल,[2] ( पण ) त्यापक्षीं आमच्या सारख्यास ( मनुष्यस्थितींत असणाऱ्यांस ) परमात्मज्ञानाचा उपदेश व्यर्थ होईल. " जो जो[3] कोणी देवांपैकीं असेल " इत्यादि श्रुतीनें ब्रह्मविद्येचा उपदेश ( मोक्षरूपी ) पुरुषार्थ सिद्ध होण्याकरितां सर्वांस केला जातो. यावरून ( हिरण्यगर्भ झाल्यावर ब्रह्मोपदेश व्हावयाचा वगैरे ) ही कल्पना अत्यंत निकृष्ट व शास्त्रबाह्य आहे.

आतां प्रकृत ( श्रुतीचें ) व्याख्यान करूं. ग्रहातिग्रहरूप बंधन कोणी उत्पन्न केलें, याचा निर्णय करण्याकरितां ( श्रुति ) ह्मणते—ह्या डोकें, हात, पाय इत्यादि अवयवांनीं युक्त असणाऱ्या अल्पज्ञानी मरणाराची वाणी अग्नींत मिळते, प्राण वायूंत मिसळतो, चक्षु आदित्याप्रत

१—आपलें आत्मस्वरूपच मूळच्या अज्ञानाला ( अविद्येला ) उत्पत्तिस्थान आहे असा वेदांतशास्त्राचा सिद्धात आहे. २—मेल्यावर ज्ञानसहित कर्मानें हिरण्यगर्भ स्वरूप प्राप्त होतें त्यांत भोगनिवृत्ति नाहीं, पण नंतर परमात्मदर्शनाविषयीं प्रयत्न करणें हा एक पक्ष, जिवंतपणींच कर्मापासून निवृत्त होणें व परमात्मदर्शन घेणें हा दुसरा पक्ष ह्या उभयपक्षीं परमात्मदर्शनास कर्म कारण आहे असें ह्मणतां येत नाहीं.

३—" तद्यो यो देवानाम् "

जातो. जातो हें क्रियापद सर्वत्र जोडावें. मन चंद्राप्रत, कान दिशांप्रत, शरीर पृथ्वीप्रत, आत्मा आकाशाप्रत. (आत्मा शब्दानें) आत्म्याचें स्थान हृदयाकाश घ्यावें. तें हृदयाकाश (महत्) आकाशाप्रत जातें. रक्त आणि रेत हीं उदकांत ठेवलेलीं असतात. हें ह्मणणें तीं पुन्हा (पाण्यांतून देहांत) घेतलीं जातात ह्यांचें सूचक आहे. वाणी आदिकरून शब्दांनीं त्या त्या अवयवाची देवता घ्यावी. तीं इंद्रियें घेऊं नयेत; कारण मोक्ष होण्यापूर्वीं तीं इंद्रियें जीवात्म्याला सोडून निघून जातात, असें नाहीं. इंद्रियांवर देवतांचें अधिष्ठान नसलें तर, कुऱ्हाड वगैरे हत्यारें टाकून दिल्यावर, जसा बिनहत्यारी मनुष्य असावा, त्याप्रमाणें त्या देवता निघून गेल्या ह्मणजे तीं (निरुपयोगीं) होतात. पुरुषानें देह सोडला ह्मणजे तो पराधीन असणारा कोणाचा आश्रय करितो? त्यावेळीं कोणाचे आश्रयानें पुन्हा देहेन्द्रियसमुदाय घेतो; ज्याचे योगानें त्यास पुन्हा ग्रहातिग्रहरूप बंधन उत्पन्न होतें, तें काय? असा (आर्तभागाचा) प्रश्न आहे.

यावर उत्तर असें आहे कीं–१ स्वभाव—(सृष्टिस्वभाव, निसर्ग), २ यदृच्छा (आकस्मिक संभव), ३ काल, ४ कर्म, ५ दैव, ६ केवळ विज्ञान, ७ शून्य, अशीं (जगत्कारणें) वादी लोकांनीं कल्पिलेलीं आहेत; त्यांत विप्रतिपत्तीला अनेक स्थळें आहेत ह्मणून त्या विषयीं जल्प (भांडाभांडी) करून वस्तुनिश्चय होणें शक्य नाहीं. त्यांत वास्तविक निर्णय जाणूं इच्छित असशील तर, (याज्ञवल्क्य ह्मणतो), हे शिष्या आर्तभागा, (तुझा) हात माझे हातांत दे ह्मणजे आपण दोघेच, तूं जो प्रश्न केला आहेस, त्या संबंधानें जें जाणण्यासारखें आहे, तें समजून घेऊं; विचार करूं. (कां ह्मणशील तर) ती आपली दोघांची वस्तु जनसमुदाययुक्त ह्या स्थळीं निर्णय करणें शक्य नाहीं. करितां विचार करण्यास एकांतांत जाऊं.

'(मग) ते दोघेच' असें श्रुतींत ह्मटलें आहे. ते दोघे ह्मणजे याज्ञवल्क्य व आर्तभाग एकांतांत जाऊन त्यांनीं काय केलें तें (श्रुतीनें) सांगितलें आहे. ते दोघे मंडळी बसली होती त्या जागेवरून उठून जाऊन विचार करूं लागले. प्रथमारंभीं सामान्य लोकांच्या वादांपैकीं, एक एक मत घेऊन त्याचा त्यांनीं विचार केला. त्यांनीं विचार करून, सर्व शंका दूर करूनच काय भाषण केलें तें ऐक. देहेंद्रियें पुनः पुनः घेण्यास आश्रयीभूत कर्मच कारण आहे, असें त्या (एकांत) स्थळांत ते बोलले. बोलले एवढेंच नाहीं; काल, कर्म, दैव, ईश्वर (हीं सर्व) उत्पत्तीचीं कारणें घेऊन त्यांनीं ज्याची प्रशंसा केली तें कर्मच. ज्या अर्थीं ग्रह (इंद्रियें) अतिग्रह (तद्विषय) वगैरे कार्यें व क्रियासाधनें हीं पुनः पुनः प्राप्त होण्यास कर्मच कारण आहे, असें निश्चित केलें; त्या अर्थीं शास्त्रविहित पुण्यकर्मानें (पुरुष) पुण्यवान होतो; व विरुद्ध प्रकारच्या पापकर्मानें पापी होतो. याप्रमाणें (आर्तभागाच्या) प्रश्नांचा याज्ञवल्क्यानें उलगडा केल्यावर तो याज्ञवल्क्य हार जाणें अशक्य वाटल्यावरून जरत्कारूचा मुलगा आर्तभाग स्तब्ध राहिला.

---

१—चार्वाकादि लोकायतिक स्वभाव (निसर्ग) च किंवा यदृच्छा जगाचें कारण समजतात, मीमांसक केवलकर्मवादी; जोतिर्विद कालवादी; देवताकांडीय वैदिक दैववादी; बौद्ध शून्यवादी; माध्यमिक विज्ञानवादी; नय्यायिक ईश्वरवादी; सांख्य प्रकृतिवादी; वेदांती ब्रह्मवादी.

२—याज्ञवल्क्य व आर्तभाग यांनीं एकांतांत जाऊन पुष्कळ वाद करून जगदुत्पत्तीला ईश्वर (God), दैव (Fate), कर्म (Action), काल (Time), हीं कारणें आहेत, असें ठरविलें. व नास्तिकांच्या मताप्रमाणें कल्पिलेलीं स्वभाव (Nature), यदृच्छा (Chance), विज्ञान (Concepts, ideas), व शून्य (Void), हीं चार कारणें सोडिलीं; आणि ईश्वरदैवादि चार कारणां पैकीं कर्मास प्राधान्य देऊन इतर तीन गौण आहेत, अशी कर्माची प्रशंसा केली.

# भुज्युब्राह्मण.

## वायुसायुज्य—पारिक्षितमुक्ति.

## अध्याय ३, ब्राह्मण ३.

ऋचा १——मग ह्याला ( याज्ञवल्क्याला ) भुज्यूनें प्रश्न केला. याज्ञवल्क्या, अशी हाक मारून भाषण केलें. आह्मी चरक[1] मद्रदेशांत गेलों होतों; व कपिगोत्री पतंचल नांवाच्या (ब्राह्मणाच्या) घरीं गेलों. त्याची कन्या गंधर्वानें झडपलेली होती. त्या (गंधर्वा) ला आह्मीं प्रश्न केला. तूं कोण आहेस? तो बोलला, मी आंगिरस सुधन्वा आहें. त्याला जेव्हां भुवनांच्या शेवटच्या हद्दी विचारल्या तेव्हां त्याला ह्मटलें कीं पारिक्षितें[2] कोठें असतात? पारिक्षित कोठें असतात हें तेव्हां कळलें[3]. मी तुला विचारतों कीं, हे याज्ञवल्क्या, पारिक्षित कोठें असतात?

प्रस्तावभाष्य—'मग ह्याला (याज्ञवल्क्याला) (लाह्यायनी) भुज्यूनें प्रश्न केला.' ग्रहातिग्रहरूप ( मृत्युस्वरूपी ) बंधन सांगितलें. ज्या सकारण ( कर्मप्रयुक्त ) बंधापासून सुटला तर मुक्त होतो, किंवा ज्यानें बद्ध असला ह्मणजे संसारांत पडतो, तो (बंधच) मृत्यु; आणि त्यापासून मोक्ष होणें योग्य आहे. ज्याअर्थी (त्या) मृत्यूला मृत्यु आहे, आणि मुक्त झालेल्याला कोठें (अन्य लोकीं) जाणें नाहीं; त्याअर्थी सर्व नाश (होऊन) नाम मात्र शिलक राहतें, आणि दिवा विझतो, त्याप्रमाणें (मरणकालीं मुक्त झालेला जीव जेथला तेथें राहतो) असें ठरलें. त्यांत ( पूर्वीच्या ब्राह्मणांत ) संसारांत पडणारे व मुक्त होणारे जीवांचा ( पंचमहाभूतादि ) कारणांशीं संबंध सारखाच असतांना, मुक्त पुन्हा देहेंद्रियें मुळींच घेत नाहींत; पण संसारांत पडलेल्या जीवांना पुन्हा पुन्हा देहेंद्रियें ज्या कारणानें प्राप्त होतात तें कर्म, असें विचारपूर्वक ठरविलें. आणि कर्मक्षय झाला ह्मणजे सर्व नाश होऊन मोक्ष ( प्राप्त होतो ) ; नाम मात्र शिलक राहतें; आणि तें कर्म पुण्यपाप नांवाचें ( द्विविध ) आहे; कारण, पुण्यकर्मानें मनुष्य पुण्यवान् होतो, व पापकर्मानें पापी होतो असें ठरविलें. संसार ह्या कर्मामुळें ( पुण्यपापापासून ) उत्पन्न झाला आहे.

---

१——अभ्यासाकरितां फिरणारी मंडळी किंवा चरक शाखेची मंडळी.

२——मॉक्स मुल्लर साहेब ह्मणतात पारिक्षित राजे होते, परंतु पारिक्षित राजांचा येथें संबंध दिसत नाहीं.

३——भुज्यूनें 'पारिक्षित कोठें असतात?' असें तीनदां ह्मणण्याचें कारण एकदां गंधर्वाला कसें विचारलें तें बोलून दाखवलें; दुसऱ्यानें, गंधर्वाकडून उत्तर मिळून तें मी जाणत आहें, असें याज्ञवल्क्याला दर्शविलें; तिसऱ्यानें, तोच प्रश्न याज्ञवल्क्याला विचारला.

त्यांपैकीं पापकर्मानें स्वभावतः पुष्कळ दुःखांनीं भरलेल्या स्थावर जंगम स्वरूपांमध्यें नरकांत, पश्वादि योनींत, पिशाचयोनींत वगैरे ( प्राणी ) पुन्हा पुन्हा जन्मास येऊन व मरण पावून दुःख भोगितो, हा जणूं राजमार्गच आहे; असें सर्व लोकांस माहित झालें आहे. पण जें ' पुण्यकर्मानें पुण्यवान् होतो ' असें शास्त्रवचन आहे, त्या विषयींच वरील श्रुतीनें आदर दाखविला आहे. सर्व पुरुषार्थ प्राप्त करून घेण्यास पुण्यकर्म हेंच साधन आहे, असें सर्व श्रुति व स्मृति ह्मणतात. मोक्ष हा तरी पुरुषार्थ आहे, त्यावरून मोक्षही पुण्यकर्मानें मिळेल; असें प्राप्त झालें. जों जों पुण्याचा उत्कर्ष होईल तों तों उत्कृष्ट फलप्राप्ति होईल; यास्तव उत्तम पुण्योत्कर्षानें मोक्ष मिळेल अशी शंका येईल, ती दूर केली पाहिजे.

ज्ञानसहित उत्तम कर्माचा परिणाम इतका ( संसार उत्पन्न करण्यापुरताच ) आहे; कारण कर्म व त्याचें फल हें विविध प्रकट होणाऱ्या नामरूपांचें उत्पत्तिस्थान आहे. परंतु जें कार्य नव्हे, नित्य आहे, ज्याचे धर्म अव्याकृत ( अप्रकट ) आहेत, ज्याला नाम व रूप नाहीं, व क्रिया, क्रियासाधनें, व फलें यांपैकीं कोणाचाही स्वभाव ज्यामध्यें नाहीं, अशा( ब्रह्मा )वर कर्माचा अंमल चालत नाहीं. ज्यावर कर्माचा अंमल आहे, तो संसारच, हा अभिप्राय स्पष्टपणें दाखविण्याकरितां ( या ) ब्राह्मणाचा आरंभ आहे.

परंतु कांहीं लोक असें ह्मणतात कीं, ज्ञानसहित कर्म निष्काम असलें तर विष, दहीं वगैरे[१] पदार्थांप्रमाणें ( संसाररूपी नेहमीचें कार्य उत्पन्न न करितां ) अन्य-कार्य (मोक्ष) उत्पन्न करितें. तें ( ह्मणणें बरोबर ) नाहीं. कारण मोक्ष उत्पन्न होणारा नव्हे. बंधननाश हाच मोक्ष, तो कार्यरूप नाहीं. अविद्या हेंच बंधन, असें (पूर्वीं) आह्मीं सांगितलें. अविद्येचा कर्मानें नाश (होईल हें ह्मणणें) युक्त नाहीं. कर्माचें सामर्थ्य दृश्यवस्तूंवरच चालतें. उत्पन्न करणें, मिळविणें, विकारकरणें, संस्कार करणें, हे कर्मशक्तीचे विषय आहेत. उत्पन्न करणें, प्राप्त करून देणें, विकार आणि संस्कार करणें हें कर्माच्या आटोक्यांत आहे. (दुसरें) लोकांत प्रसिद्ध नाहीं ह्मणून याहून भिन्न गोष्ट कर्माच्या आटोक्यांत नाहीं. ( उत्पत्ति, प्राप्ति, विकार, व संस्कार ) या गोष्टींपैकीं मोक्ष आहे असें नाहीं. फक्त अविद्येच्या कारणानें ( अज्ञानामुळें मोक्ष ) दूर असतो असें आह्मीं ( पूर्वीं ) सांगितलें आहे.

खरें; केवळ कर्माचा हा स्वभाव असो; पण विद्यासहित निरभिलाष कर्माचा प्रकार उलट आहे. ज्यांची निराळी ( अपकार करण्याची ) शक्ति प्रसिद्ध आहे असे विष, दहीं आदि-करून ( पदार्थ ) विद्या ( वैद्यक ), मंत्र, शर्करा वगैरेशीं संयुक्त केले ह्मणजे त्यांचा निराळाच ( चांगला ) परिणाम होतो, असें पाहिलें आहे. त्याप्रमाणें ( विद्यायुक्त ) कर्माचाही प्रकार घ्यावा, असें ह्मटलें तर, नाहीं; कारण, तसें ह्मणण्याला प्रमाण नाहीं; कांतर कर्माची सत्ता वर सांगितलेलें विषय सोडून इतर विषयांवर असल्याबद्दल प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, अर्थापत्ति, शब्द, ( यां-पैकीं एकही ) प्रमाण नाहीं.

कोणी ह्मणेल कीं, ( कर्माचें संसारव्यतिरिक्त ) फल नाहीं, असें ह्मटलें असतां ( कर्मावि-षयींची ) चोदना ( विधिवाक्य ) अन्य रीतीनें उपयुक्त होणार नाहीं. हें ( अर्थापत्ति ) प्रमाण

---

१––नुसतें विष दहीं वगैरे, मृत्यु, ज्वर वगैरे आणणारें आहे तरी मंत्रसंस्कृत विष किंवा शर्करामि-श्रित दहीं केलें असतां शक्ति पुष्टि वगैरे देतें.

लागू आहे. ( संध्यावंदनादि ) नित्यकर्माचें फल विश्वजिन्न्यायानें आह्मीं कल्पित नाहीं. नित्यकर्माचें फल कोठें सांगितलेलें ही नाहीं. तीं ( नित्यकर्में ) करावीं अशी चोदना ( धर्माज्ञा ) आहे. तेव्हां पारिशेष्यन्यायानें मोक्ष हें त्यांचें फल असें (मीमांसावादी) समजतात; कारण नित्यकर्माला फल नाहीं असें मानलें तर ( नित्यकर्मांविषयीं कोणीच ) पुरुष प्रवृत्त होणार नाहींत.

( यावर सिद्धांती ) शंका घेतो कीं, मोक्षफल कल्पित घेतल्यामुळें विश्वजिन्न्यायच प्राप्त होतो. मोक्ष किंवा कांहीं अन्य फल ( नित्यकर्मापासून ) होतें अशी कल्पना न केली तर ( त्याविषयीं ) पुरुषप्रवृत्ति होणार नाहीं; ह्याकरितां ( नित्यकर्माचें ) फल मोक्ष आहे असें अर्थापत्तिप्रमाण घेऊन विश्वजित् यागामध्यें जशी ( फलाची कल्पना करितात, तशीच फलकल्पना करावयाची असें होईल. ) तशी कल्पना करून ही विश्वजिन्न्याय येत नाहीं हें कसें ह्मणतां ? फलाची कल्पना करण्यांत येते, आणि विश्वजिन्न्याय येत नाहीं, हें भाषण परस्पर विरुद्ध आहे. ( मोक्षही स्वरूपस्थिति आहे, उत्पन्न होणारी वस्तु नाहीं ). मोक्षाला फलरूपताच नाहीं, असें ह्मणूं लागाल तर ( तसें ह्मणतां येणार ) नाहीं; कारण, (तुह्मीं) आपली प्रतिज्ञा सोडिली असें होईल. ( तुमची ) प्रतिज्ञा अशी आहे कीं, कर्मापासून ( नेहमीचे कार्याहून ) अन्यकार्य विष दहीं वगैरे पदार्थापासून ( आयुर्वृद्धि पुष्टि वगैरे कार्य ) होतें, त्याप्रमाणें ( नित्य ) कर्माचें कार्य होत असतें. मोक्ष हा फलरूपच आहे असें ( ह्मणाल ) तरी ती प्रतिज्ञा मोडते; आणि (एक वेळ) मोक्ष हें कर्माचें कार्य आहे असें ह्मणाल तर मोक्षामध्यें आणि स्वर्गादिक फलांमध्यें फरक कोणता हें तुह्मीं सांगितलें पाहिजे.

आणखी नित्यकर्माचें फल मोक्ष आहे, तो कर्मकार्य नव्हे, ह्या तऱ्हेवाईक बोलण्याचा अर्थ काय हेंही सांगितलें पाहिजे. कार्य शब्द निराळा व फल शब्द निराळा, असें ह्मटल्यानें फरक होतो, असें कल्पितां येणार नाहीं. आणि, मोक्ष हा फल नव्हे; नित्यकर्मापासून उत्पन्न होतो; नित्यकर्माचें फल; कार्य नव्हे, असें ह्मणावयास लागाल तर, तुमचें भाषण अग्नि ( हा ) थंड आहे, असें ह्मटल्याप्रमाणें परस्परविरुद्ध ( असंबद्ध ) होईल.

ज्ञान ( मोक्षास अंतरायभूत अज्ञान दूर करून मोक्ष देतें ) तशीच ही गोष्ट आहे, आणि ज्ञान ( नवा ) मोक्ष उत्पन्न करितें असें नसून, मोक्ष ज्ञानाचें कार्य आहे असेंच ह्मणतात; त्याप्रमाणें तो नित्यकर्मांचें कार्य आहे असें ह्मणूं लागाल तर ( तें शोभणार ) नाहीं; कारण, ज्ञानाच्या अंगीं अज्ञान दूर करण्याचें सामर्थ्य आहे. अज्ञानरूपी पडदा ज्ञान दूर करितें त्यावरून मोक्ष ज्ञानकार्य आहे, असें आह्मी लक्षणेनें ह्मणतों; अज्ञान दूर करणें कर्माच्यानें होणार नाहीं. जो कर्मानें दूर केला जाईल असा अज्ञानाशिवाय मोक्षाला दुसरा कांहीं पडदा आहे, असें कल्पिणें शक्य नाहीं; कारण, मोक्ष नित्य आहे, व त्याची साधकाशीं एकरूपता आहे.

---

१—विश्वजित् ह्मणून सर्व पृथ्वी जिंकल्यावर याग करतात, तो रघुराजानें केला होता— पहा रघुवंश सर्ग ४. ज्या यज्ञाचें फल श्रुतिनिर्दिष्ट नाहीं त्या यज्ञाचें स्वर्ग हें फल समजावें असा मीमांसकांचा न्याय आहे, त्यावरून विश्वजित् यागाचें स्वर्ग हें फल घेतात, तसें नित्यकर्माचें स्वर्ग हें फल घेत नाहींत, असा वादीचा आशय आहे.

२—पारिशेष्यन्याय ह्मणजे ज्या कर्माला फल सांगितलें नाहीं, पण जें कर्म चुकवलें असतां दोष लागतो, त्याचें मोक्षासारखें उत्तम फल असलें पाहिजे.

( कर्मानें ) अज्ञान दूर होतें असें ह्मणाल तरी जुळत नाहीं; कारण (ज्ञानाहून कर्म) भिन्न स्वरूपाचें आहे. अज्ञान ह्मणजे अप्रकट असणें, ज्ञान ह्मणजे प्रकट असणें, या दोहोंचा विरोध आहे; पण कर्माचा आणि अज्ञानाचा विरोध आहे, असें नाहीं; त्यामुळें कर्म हें ज्ञानाहून भिन्न स्वरूपाचें आहे. ज्ञानाभाव, संशय, किंवा विपर्यय, यांपैकीं कोणतेंही एक प्रकारचें अज्ञान असलें, तर तें सर्व ज्ञानानेंच दूर होतें, कर्मानें होत नाहीं; कारण ( कर्माचा ) कोणत्याही प्रकारच्या अज्ञानाशीं विरोध नाहीं.

आतां असें ह्मणाल कीं, कर्माचे अंगीं अज्ञान दूर करण्याची अदृष्ट शक्ति कल्पावी, ( तरी जुळणार ) नाहीं. ज्ञानानें अज्ञानाची निवृत्ति होत असल्याचें दिसत आहे; तर ( कर्मानें होते अशी ) न दिसणारी निवृत्ति कल्पिणें योग्य नाहीं. साळी सडण्यानें जर त्यांचा कोंडा निघतो हें स्पष्ट दिसत आहे; तर अग्निहोत्र वगैरे नित्य कर्माचें कार्यरूपानें कोंडा निघण्याला अदृष्ट कारण आहे, अशी कोणी कल्पना करणार नाहीं. त्याप्रमाणें अज्ञान दूर करणें देखील नित्यकर्माचें न दिसणारें कार्य आहे, असें कल्पिणें योग्य नाहीं. ज्ञानाशीं कर्माचा विरोध आहे, असें आह्मीं अनेक वेळां प्रतिपादन केलें आहे. कर्माशीं ज्याचा विरोध नाहीं, असें ज्ञान घेतलें तर तें देवलोकप्राप्तीला कारण होतें, असें श्रुतीनें ह्मटलें आहे. "विद्येनें देवलोकः" असें ( मागें ह्याच ) श्रुतींत ह्मटलें आहे.

आणखी असें वेदविहित नित्यकर्माचें फल कल्पावयाचें आहे तर जें त्या कर्माशीं विरुद्ध आहे, द्रव्य, गुण, कर्म ह्या पदार्थांपासून उत्पन्न होणारें नव्हे, व ज्यावर कर्माचें सामर्थ्य दिसत नाहीं, तें कल्पावें; किंवा जें कार्य करण्यास कर्माचें सामर्थ्य आहे, आणि जें फल कर्मास विरुद्ध नाहीं तें कल्पावें ? पुरुषांची प्रवृत्ति उत्पन्न होण्याकरितां नित्यकर्माचें फल कल्पिलेंच पाहिजे असें असेल तर कर्मसदृशफलकल्पनेकडे अर्थापत्तीचा विनियोग झाल्यामुळें नित्य असलेला मोक्ष त्यांचें फल कल्पिणें शक्य नाहीं, किंवा त्याला ( मोक्षाला ) झांकणारे अज्ञानाची निवृत्ति ( कल्पिणें योग्य ) नाहीं; कारण ( अज्ञानाला ) कर्म विरुद्ध नाहीं, व हें दृष्टविषयक[१] आहे.

पारिशेष्यन्यायानें मोक्ष हेंच ( नित्यकर्माचें फल ह्मणून ) कल्पना केली पाहिजे असें ह्मणाल—सर्व कर्मांचीं ( च स्वर्गपशुपुत्रादिक ) सर्व फलें होत. इतर कर्मफलांच्या ( स्वर्गादिकांच्या ) अभावीं ( नित्यकर्माचें मोक्षाहून ) दुसरें फल कल्पितां येणार नाहीं; आणि ( अर्थात् ) मोक्ष शिलक राहतो, तोच ( नित्यकर्माचें ) फल समजावें, असें वेदवेत्त्यांस इष्ट आहे; ह्मणून ( नित्यकर्माचें फल ) मोक्ष कल्पावा असें ह्मणाल तर, ( तोही न्याय ) नाहीं. कर्माचीं फळें अनंत आहेत; ह्मणन पारिशेष्यन्याय लागू होत नाहीं.

पुरुषांना इष्ट असणारीं कर्मफलें अमुकच आहेत असें कोणत्याही अल्पज्ञ माणसाला निश्चयानें ह्मणतां येणार नाहीं; कारण पुरुषांच्या इच्छा किंवा फल प्राप्त करून घेण्याचीं साधनें, देश, काल, ह्या कारणांचा नियम नसतो; किंवा इच्छित फलाप्रमाणें इच्छा व साधनें बदलतात. आणि

१—उत्पत्ति, आप्ति, विकार, संस्कार, हीं कार्यें उत्पन्न करण्याचें कर्मामध्यें सामर्थ्य आहे, हें दृष्ट ह्मणजे सर्वांच्या पहाण्यांत आहे, ह्मणून कर्माचें सामर्थ्य त्यांहून निराळें जें अज्ञान तें दूर करण्याकडे चालत नाहीं. २.—बृ. १–५–१६.

प्रत्येक जीवाच्या इच्छा भिन्न भिन्न असल्यामुळें त्यांचीं फलें व त्यांचीं साधनें सहजीं अनंत होणार, आणि तीं असंख्य असल्याकारणानें, अमुकच होतील हें मनुष्यांनीं जाणण्यासारखें नाहीं; याप्रमाणें साधनें व फलें अमुकच आहेत हें कळत नाहीं, तर (पशुपुत्रस्वर्गादि फलांच्या यादीपैकीं नित्यकर्माकरतां) मोक्षच शिलक राहतो, असें कसें ह्मणतां येईल ?

कर्मफलांच्या जाती आहेत, त्यासंबंधानें पारिशेष्यन्याय येतो असें ह्मणाल. इच्छा, विषय, व साधनें अनंत आहेत, तरी सर्व कर्मफलांना फलजाति असणें सारखेंच लागू आहे, पण मोक्ष कर्माचें फल नसल्यामुळें शिलक राहील, (त्याची योजना कोठें तरी केली पाहिजे); ह्मणून पारिशेष्यन्यायानें तो (नित्य कर्माचें फल अशी) कल्पना करणें योग्य आहे. असें ह्मटलें तर, तें जुळत नाहीं. नित्यकर्माचें फल मोक्ष आहे, असा तुमचा पक्ष घेतला ह्मणजे तो इतर कर्मांच्या फलाच्या जातीसारखें एका जातीचें फल आहे, असें ह्मणावें लागेल; आणि परिशेषन्याय लागू होणार नाहीं, ह्मणून अन्यरीतीनें (श्रुत्यज्ञेचें फल) दाखवितां येत असल्यामुळें, (मोक्षाशिवाय नित्यकर्माचें दुसरें कांहीं तरी फल असेल इकडे) अर्थापत्तिप्रमाणाचा विनियोग झाला. नित्यकर्माचें फल उत्पत्ति, आप्ति, विकार, संस्कार यांपैकीं एकादें असलें पाहिजे, व तसें अनुमान करण्याकडे अर्थापत्ति खर्च झाली.

चाऱ्ही कर्मपरिणामांपैकींच मोक्ष एक परिणाम आहे, असें घ्यावें तर तो उत्पाद्य विषय नाहीं; (उत्पत्तिरूप परिणाम नव्हे); कां तर नित्य आहे. आणि नित्य असल्यामुळें तो विकृतिरूप परिणाम नव्हे; ह्याच कारणाकरितां संस्कार परिणामरूप नव्हे. साधन द्रव्यांना संस्काराची अपेक्षा असते; त्या द्रव्यांपैकीं मोक्ष नव्हे. साधनाला संस्कार करितात. तुपाच्या भांड्यावर प्रोक्षण वगैरे करून तें शुद्ध करितात. यज्ञस्तंभाला (तासून अष्टपैलू करून तेल लावून) संस्कार करितात. तसे संस्कार कांहींच मोक्षाला करावयाचे नसतात; व तो संस्कारांनीं उत्पन्न होणारा नव्हे. (मोक्षप्राप्ति होते असें ह्मणतात); परिशेष्यन्यायानें प्राप्तिरूप परिणाम मोक्ष आहे, असें ह्मणावें तर तो प्राप्य आहे असें नाहीं. मोक्ष हा आत्म्याचा स्वभाव आहे. (व एकाला दुसरें प्राप्त व्हावयाचें अशा दृष्टीनें आत्म्याला मोक्ष प्राप्त होतो, असें ह्मणावें तर), आत्मा एक आहे.

आतां नित्यकर्में इतर कर्मांहून भिन्न स्वरूपांचीं असल्यामुळें त्यांचें फल भिन्न असलें पाहिजे, असें ह्मणाल तर नाहीं. नित्यकर्में इतर कर्मांशीं कर्मपणानें सदृश आहेत तर, नित्यकर्मांचें फल इतर कर्मांच्या फलांशीं सदृश कां असूं नये ? इतर कर्मांहून निमित्त (हेतु) भिन्न असल्यामुळें नित्यकर्मांचीं फलें ही भिन्न असलीं पाहिजेत असें ह्मणाल तर, नाहीं, कारण क्षामवती आदिकरून इष्टीसारखीं आहेत—(त्या इष्टी अपघाताचे प्रायश्चित्ताकरितां असतात त्यामुळें नित्यकर्मांमध्यें व त्यांमध्यें निमित्तभेद आहे, तरी सादृश्य असतें;) तें असें कीं, घराला आग लागल्याचे वगैरे निमित्तांमुळें क्षामवती आदिकरून इष्टी करितात. (भिंतीला) तडे गेले तर, किंवा (घर) पडलें तर, होम करावा अशीं नैमित्तिक कर्में आहेत, पण त्यांचें फल मोक्ष कल्पीत नाहींत. त्यांशीं नित्यकर्मांचें साम्य आहे; कारण (ज्यास्त दिवस) जगण्याचें वगैरे निमित्त असलें ह्मणजे नित्यकर्में नैमित्तिकांप्रमाणेंच सांगण्यांत येतात, ह्यांवरून नित्यकर्मांचें फल मोक्ष नव्हे.

सूर्याचा उजेड सर्वांस रूपविषय पाहण्यास साधनीभूत होतो, पण घुबडें वगैरे त्या उजेडानें रूप पहात नाहींत, आणि इतर लोकांच्या डोळ्यांहून त्यांचे डोळे भिन्न आहेत, एवढ्यावरून घुबडांच्या डोळ्यांना रस वगैरे विषय समजतात, अशी कल्पना कोणी करीत नाहीं; कांतर रस वगैरे विषय ग्रहण करण्याचें सामर्थ्य डोळ्यांच्या अंगीं असल्याचें पाहिलें नाहीं. याप्रमाणें ( घुबडासारखें ) दूरचें उदाहरण घेतलें तरी ज्या विषयांवर इंद्रियांचें सामर्थ्य चालतें असें पाहिलें असेल, त्या विषयामध्येंच ( रूपविषय पाहण्यामध्येंच ) कांहीं भेद ( कमीजास्तपणा ) कल्पावा. ( विषयांतर करूं नये. )

आतां मागें ह्मटलें कीं, विष, दहीं वगैरे पदार्थांत, विद्या, मंत्र, शर्करा वगैरे पदार्थ मिश्रित केल्यानें फलांतर होते, ( त्याप्रमाणें नित्यकर्मांच्या जोडीला विद्या वगैरे असली तर ) त्यांचें इतर कर्मफलांहून कांहीं भिन्न फल ( मोक्ष ) होतें; आणि असें विशिष्ट कार्य होऊं लागलें तर तें इष्ट असल्यामुळें विरुद्ध नाहीं. निष्काम कर्म विद्यासंयुक्त असल्यास त्यापासून भिन्न कार्य झालें तर कांहीं विरुद्ध नाहीं. देवांपासून फल मिळण्याकरितां होम करणारा व आत्मयाग करणारा या दोघांमध्यें निष्काम आत्मयाजी श्रेष्ठ असतो, अशा श्रुति आहेत. ' देवयाजीपेक्षा आत्मयाजी श्रेष्ठ ' अशी श्रुति आहे; व ' विद्यासहित जें जें कर्म करितो ( तें तें श्रेष्ठ ) अशीही श्रुति आहे.

परंतु जो परमात्मदर्शनाच्या संबंधानें मनूनें आत्मयाजी शब्द वापरला आहे, ( तो नित्यकर्म करणाराचा दर्शक नाहीं. ) समदृष्टि ठेवणारा आत्मयाजी, असें ह्मटलें आहे, त्या स्थळीं आत्मयाग करणारा समदृष्टि असतो असा ( मनूंचा ) अभिप्राय आहे. अथवा पूर्वी जी स्थिति प्राप्त झाली असेल, त्या स्थितीच्या संबंधानें ( आत्मयाजी शब्द वापरला आहे, ) तो आपल्या शरीरावर संस्कार करण्याकरितां नित्यकर्म करीत असतो. " या कर्मानें हें माझें अंग संस्कृत होतें, " अशी श्रुति आहे. अथवा गर्भसंबंधाचे होम ( केल्यानें किंवा मौंजीबंधन वगैरे कर्मांनीं बीजदोष जातात, ) त्या प्रकरणांत क्रियासाहित्यरूप जीं नित्यकर्मांचीं अंगें तीं संस्कृत करण्याकरितां नित्यकर्मांची आवश्यकता आहे. याप्रमाणें जो आत्मयाजी संस्कृत होतो तो त्या ( नित्य ) कर्मांनीं समदृष्टि ठेवण्यास योग्य होतो. त्यास इहजन्मीं किंवा जन्मांतरीं समदृष्टि प्राप्त होते. समदर्शी झाला ह्मणजे स्वाराज्याचा अधिकारी होतो असा अभिप्राय आहे. ( यावरून ) आत्मयाजी शब्द पूर्वसिद्ध स्थितीला अनुलक्षून आहे. ज्ञानयुक्त नित्यकर्म ज्ञानोत्पत्तीला साधनीभूत होतात, असें श्रुतीवरून दिसतें.

आणखी असें आहे कीं, " ब्रह्मदेव, विश्वस्रष्टा, धर्म, महान, आणि अव्यक्त यांचें पदाला प्राप्त होणें ही शेवटची सत्वगुणात्मक स्थिति मनीषीला (महात्म्याला) प्राप्त होतें, " असें ह्मणतात.

---

१—ह्यावरून विशिष्ट नित्यकर्मांचें विशिष्टफल ( मोक्ष ) आहे.

२—सर्वभूतेषु चात्मानं सर्वभूतानि चात्मनि । संपश्यन्नात्मयाजी वै स्वाराज्यमधिगच्छति ॥

अर्थ—सर्व भूतांचे ठायीं आत्मा पाहतो, व सर्व भूतें आत्म्याचे ठिकाणीं पाहतो, ( आपण तींच सर्वभूतें व सर्वभूतें तींच आपण असें पाहतो ) याप्रमाणें उत्कृष्ट पाहणारा आत्मयाजी खचित स्वाराज्याप्रत पावतो. मनुस्मृति.

यावरून देवतेच सादृश्य व ऐश्वर्य ( काम्यकर्मपक्षीं प्राप्त होतें, तें न प्राप्त होतां पंचमहाभूतांमध्यें मनुष्यांचा लय होतो. ‘ पंचभूतांप्रत खचीत जातो. ’ पंचभूतांच्या ‘ पलीकडे जातो ’ असा पाठ कांहीं लोक घेतात, त्या लोकांची वेदाविषयीं बुद्धि कोती असल्यामुळें ( उपनिषदांचें रहस्य कळण्या जोगी व्यापक नसल्यानें ) त्यांनीं तसा पाठ घेण्यास हरकत नाहीं.

मनूचा ( एकंदर ) अध्याय ब्रह्मदेवापर्यंत कर्मफलें सांगणारा व त्याहून भिन्न आत्मज्ञान सांगणाराही आहे, तो अर्थवादरूप नाहीं, आणि कर्मकाण्ड व उपनिषत्काण्ड हीं दोन्हीं सांगण्याचा त्यांत हेतु आहे, असें ह्मणूं नये; कां तर, अमुक कर्मैं केलीं पाहिजेत अशी वेदाज्ञा आहे, तीं न केलीं, किंवा अमुक कर्मैं करूं नयेत असा शास्त्रीय निषेध असतो तीं केलीं तर, झाडें, कुत्रीं, त्याप्रमाणेंच ओकून टाकलेलें अन्न खाणारीं पिशाचें वगैरे ह्यांच्या योनींत जन्मास आल्याचीं उदाहरणें दिसतात; डुकरें, वगैरेंचा जन्म प्राप्त झाल्याचीं उदाहरणें दिसतात.

विहित किंवा प्रतिषिद्ध जेवढीं कर्मैं आहेत त्याबद्दल श्रुतिस्मृतींमध्यें विधि व प्रतिषेध आहेतच. त्याशिवाय विहित किंवा प्रतिषिद्ध कर्मैं असतील अशी कल्पना करितां येणार नाहीं. जीं कर्मैं न केलीं, किंवा ( जीं न करावीं तीं ) केलीं तर पिशाचें, कुत्रीं, डुकरें, झाडें, वगैरे योनी प्राप्त होतात, हें प्रत्यक्ष किंवा अनुमानप्रमाणानें सिद्ध आहे. हे नीच जन्म नैष्कर्म्याचें फल आहेत असें कोणाला कबूल नाहीं. ह्मणून विहित कर्मैं न केल्यानें व प्रतिषिद्ध कर्मैं केल्यानें कर्मविपाकानें पिशाचें, पशु, स्थावर, वगैरे नीच जन्म प्राप्त होतात, त्याप्रमाणेंच उत्कृष्ट कर्म केलें असतां ब्रह्मादिक देवयोनी कर्मविपाकानेंच प्राप्त होतात असें समजावें. वायुदेवानें आपली वपा सोलून काढली व मोठ्यानें रुदन केलें, असे मंत्र आहेत ते केवळ अर्थवादस्वरूप अलंकारिक आहेत ( हें खरें ); पण सगळे विधिनिषेध अलंकारिक ( न घडणाऱ्या गोष्टींचीं वर्णनें ) आहेत, असें ह्मणतां येणार नाहीं.

वायुदेवतेचे सदरचे मंत्र देखील अलंकारिक नव्हेत, खऱ्या अर्थाचे आहेत, असें घेऊं लागाल तर तसें कां होईना ! परंतु तसें ह्मटल्यानें आमचा न्याय बिघडत नाहीं, व आमचा पक्ष दूषित होत नाहीं. ब्रह्मदेव, विश्वस्रष्टा वगैरे स्वरूपें काम्य कर्मांचीं फलें आहेत, असें कोणी ह्मणूं लागेल तर, तसें ह्मणणें शक्य नाहीं. त्या काम्य कर्मांपासून देवासारखें ऐश्वर्य प्राप्त होतें असें वेदात ह्मटलें आहे. या कारणाकरितां सकाम नित्यकर्मैं व सर्वमेध, अश्वमेध, वगैरे त्या कर्मांचें फल ब्रह्मादिक देवपणा प्राप्त होणें असें ह्मटलें पाहिजे.

ज्या कांहीं विद्वानांच्या मतें नित्यकर्मैं करण्यांत फलाशा मुळींच नाहीं, आत्मा संस्कृत व्हावा ह्मणून करण्यांत येतात; त्यांच्या दृष्टीचें ज्ञान उत्पन्न होणें हें नित्यकर्मांचें फल आहे. ‘हा देह ज्ञानयुक्त होतो, ’ असें स्मृतींत ह्मटलें आहे. मोक्ष प्राप्त होण्याला नित्यकर्मैं अगदीं जवळचीं साधनें आहेत असें ह्मटलें तर, आमच्या ह्मणण्याला बाध येत नाहीं. याविषयीं खुलासा सहावे अध्यायांत जनकाची गोष्ट संपविण्याचें वेळीं आह्मी सांगूं. आतां विषद्व्याचे कांहीं परिणाम भिन्न प्रकारचे होतात, हें ह्मणणें प्रत्यक्ष व अनुमान प्रमाणावर अवलंबून आहे, ह्मणून विरुद्ध नाहीं. ज्या ठिकाणीं केवळ शब्दप्रमाणानें एकादी गोष्ट सिद्ध करावयाची असते, त्या ठिकाणीं ती गोष्ट सिद्ध करणारें श्रुतिवाक्य नसेल तर, विषद्व्याचें वगैरे उदाहरण घेऊन त्याशीं सादृश्य आहे अशी उगीच कल्पना करितां येणार नाहीं.

इतर प्रमाणांनां विरुद्ध जी गोष्ट आहे ती केवळ श्रुतीनें सिद्ध करितां यावयाची नाहीं. अग्नि थंड असून आपणास भिजवितो असें श्रुतीनें ह्मटलें, तर तें प्रमाण मानितां यावयाचें नाहीं. श्रुतिवाक्यांत वस्तुवर्णन असेल तर तेथें प्रमाणांतर खोटें पडते. काजवा अग्नि आहे, आकाश निळें आहे, असेंच मुलांना प्रत्यक्ष दिसतें; परंतु काजवा अग्नि नव्हे, आकाश निळें नव्हे, असें अन्य प्रमाणांनीं आपलें मनांत ठसविलें, ह्मणजे मुलांस प्रत्यक्ष जी गोष्ट निश्चयात्मक वाटते ती खोटी ठरते.

यारून वस्तुस्वरूप वर्णन करण्याचे कामीं वेदांचें प्रामाण्य निरर्थक होत नसल्यामुळें वेद-वाक्य खरें होईल. मनुष्यांच्या बुद्धिकौशल्यानें वर्णिलेली गोष्ट खरी असत नाहीं. कोणी मोठ्या चातुर्यानें सूर्याचा प्रकाश मुळींच नाहीं असें सिद्ध करील तर सूर्य प्रकाशणार नाहीं असें होणार नाहीं. याप्रमाणेंच वेदवाक्यांवर नवाच अर्थ स्थापित करतां येणार नाहीं. तात्पर्य ( अर्थापत्तीनें, किंवा पारिशेष्यन्यायानें, किंवा विषदह्याच्या उदाहरणानें ) कर्मापासून मोक्षफल होत नाहीं, हें सिद्ध झालें. कर्मफलें संसारांत पाडणारीं आहेत, हें दाखविण्यांत ह्या ब्राह्मणाचा आरंभ आहे.

ऋगर्थप्रकाशकभाष्य—' अथ ' ह्मणजे जारत्कारव आर्तभाग स्तब्ध झाल्यावर, लह्याचा पुत्र लाह्य, त्याचा पुत्र लाह्यायनी, भुज्यु नांवांच्या ऋषीनें प्रश्न केला. याज्ञवल्क्या, अशी हाक मारून भाषण केलें.

अश्वमेधविद्या प्रथम सांगितली. अश्वमेध यज्ञाचें फल समष्टिरूप आहे व व्यष्टिरूपही आहे. तो ज्ञानसहितकर्ममार्गानें केला, किंवा केवळ ज्ञानमार्गानेंच केला तर सर्व कर्मांमध्यें उत्तम कोटी-चा आहे. भ्रूणहत्ये पलीकडे ( गर्भहत्ये पलीकडे ) दुसरें महापाप किंवा अश्वमेधापलीकडे दुसरें महापुण्य नाहीं, असें स्मृति ह्मणतात; ह्मणून अश्वमेधानें समष्टिरूपाप्रत व व्यष्टिरूपाप्रत ( अश्वमेध-याजी ) जातो. पैकीं ब्रह्मांडाच्या पोटांत सर्वांस ठाऊक आहेत, अशा ज्या व्यष्टिरूप देवता आहेत, तद्रूपता अश्वमेध यागानें येते. " ह्याचा ( सर्वफलरूप समष्टि देवतेचा ) आत्मा आहे, " ( मृत्यु हा ) " देवतां पैकीं एक आहे, " असें सांगितलें.

आणि मृत्यु ह्मटला ह्मणजे क्षुधारूप, सूत्रात्मा, समष्टि, प्रथम उत्पन्न झालेला, प्राणवायु, सत्यरूप, हिरण्यगर्भ (ब्रह्मदेव) होय. तो सर्व द्वैतजगताचा आत्मा असून, त्यानें सर्व पदार्थ प्रकट केले आहेत. त्यानें जगाला एकपणा आला असून, तो सर्व भूतांचा अंतरात्मा ( अंतर्यामी ) लिंगस्वरूप, अमर्त ( जडदेहधारी नव्हे असा ) रसरूप आहे. सर्व भूतांचीं कर्में त्याच्या आश्र-यानें राहतात. कर्मांचें व कर्मसंबंधी सर्व विज्ञानांचें तो शेवटचें फल आहे, तोच सर्वांची शेवटची गति ( स्थान ) आहे. त्याला कोणते विषय ज्ञात आहेत, व सर्व ब्रह्मांडाला वेष्टून राहणारी त्याची व्याप्ति किती आहे, हें सांगितलें पाहिजे. ती व्याप्ति सांगितली ह्मणजे बंध-स्वरूप सर्व संसार सांगितल्यासारखा होईल. तो समष्टीचा व सर्व व्यष्टींचा आत्मा आहे; त्याचें दर्शन अलौकिक फल आहे, हें दाखविण्याकरितां ( लाह्यायनी भुज्यु ) आपल्यास घडून आलेली गोष्ट सांगतो. आणि ती गोष्ट ऐकवली ह्मणजे ( याज्ञवल्क्यासारख्या ) प्रतिवादीचें बुद्धीस व्यामोहांत घालीन अशी त्याची समजूत होती.

मद्र ( मद्रास ) नावाचा देश आहे. त्या देशांत अध्ययन करण्याकरितां व्रताचरण करणारे ह्मणून, किंवा अध्वर्यु ( श्रौती ) ह्मणून, चरक–पर्यटन करीत होतों; ते आह्मी फिरत फिरत कपिगोत्री पतंचल नांवाच्या ऋषीच्या घरीं गेलों. त्याची कन्या अमानुष ( मानुष पिशाच वगैरे नव्हे )अशा गंधर्वानें झडपलेली होती; किंवा तो गंधर्वविशेष विज्ञानी असल्याकारणानें ऋत्विजांची देवता गृह्याग्नि असावा असें घेतात; कारण साधारण पिशाचाला ( त्या कन्येनें दाखवलें ) इतकें विज्ञान असण्याचा संभव नाहीं. ( असो ), त्या ( कन्येच्या अंगांतील गंधर्वा ) ला आह्मीं सर्वांनीं, (दुसरें) निषेध करीत होते तरी विचारलें, तूं कोण आहेस ?—तुझें नांव काय आहे, व तुझें सामर्थ्य ( शहाणपण ) काय आहे ? त्यानें उत्तर दिलें, मी आंगिरस गोत्रापैकीं सुधन्वा नांवाचा गंधर्व आहे. त्याला जेव्हां लोकांची शेवटची हद्द विचारली, तेव्हां त्याला आह्मीं ह्मणालों–, ( एकंदर ) भुवनांच्या समुदायाचें परिमाण ( लांबीरुंदी ) जाणावें, अशी सर्वांस इच्छा झाली; व आपली प्रतिष्ठाही कळावी ह्मणून आह्मीं त्याला प्रश्न केला. कसा तर, पारिक्षित कोठें आहेत ? आणि त्या गन्धर्वानें सगळें आह्मांस सांगितलें. याप्रकारें माझें ज्ञान देवापासून आलेलें आहे. तसें ज्ञान, हे याज्ञवल्क्या, तुला नाहीं, आतां तूं सांपडलास, असा भुज्यूच्या भाषणाचा अभिप्राय आहे. ( त्याचें ह्मणणें ) गंधर्वापासून माहिती मिळविलेला विद्यासंपन्न मी आहें, आणि मी तुला प्रश्न करितों आहें; तर पारिक्षित कोठें आहेत, हें जाणतोस काय ? याज्ञवल्क्या, सांग. मी विचारतो, पारिक्षित कोठें आहेत ?

ऋचा २—तो ( याज्ञवल्क्य ) ह्मणाला, तो ( कन्येच्या अगांतील गंन्धर्व ) असेंच ह्मणाला कीं, ज्या ठिकाणीं अश्वमेध याग करणारे जातात, त्या ठिकाणींच ते गेले. अश्वमेध याग करणारे कोठें जातात ? तो लोक सूर्यरथाचे एक फेऱ्याची जी लांबी होईल तिचे बत्तीसपट लांबीचे वर्तुळाइतका आहे. त्या लोकाभोंवतीं त्याच्या दुप्पट विस्ताराची पृथ्वी पसरली आहे. त्यापृथ्वीभोंवतीं तिच्या दुप्पट विस्ताराचा समुद्र फैलावला आहे. ( त्याच्या व ब्रह्माण्डाच्या वरच्या शकलाच्या ) दरम्यान चाकूची धार जितकी बारीक असते किंवा माशीचा पंख जितका बारीक असतो तितकें ( सूक्ष्म ) अंतर आहे. तेथें पारिक्षित ( अश्वमेध याग करणारे ) ह्यांस इन्द्र पक्षिरूप धारण करून वायूच्या हवालीं करतो. मग वायु त्यांस आपल्या स्वरूपांत घेऊन जेथें ( पूर्वकाळचे ) अश्वमेधयाजी असतात, तेथें पोहोंचवितो. ह्याप्रमाणें त्या ( कन्येच्या अंगांतील ) गन्धर्वानें वायूची प्रशंसा करून ( पारिक्षितांची गति सांगितली आहे. ) ह्यावरून वायु हा विविध ठिकाणीं व्यापून राहणारा ( व्यष्टि ) आहे. त्याप्रमाणेंच सर्वत्र जाणारा ( समष्टि ) आहे, ( आणि तो मृत्यूला जिंकितो. ) ज्या पुरुषाला असें ज्ञान असेल तोही मृत्यूला जिंकितो. इतकें ऐकून लाह्यायनी भुज्यु स्तब्ध झाला.

भाष्य—'तो याज्ञवल्क्य ह्मणाला, असेंच (तो) ह्मणाला.' 'असेंच' ( वै ) हा शब्द (गंधर्वापासून मिळालेल्या ज्ञानाचें ) स्मरण देण्याकरितां आहे. तो गन्धर्व तुला असेंच ह्मणाला

( कीं, ) ते पारिक्षित त्या ठिकाणीं जातात. कोठें ? तर, ज्या ठिकाणीं अश्वमेधयाजी ( पारिक्षित ) जातात तेथें. प्रश्नाचें उत्तर झाल्यावर ( पुन्हा प्रश्न केला कीं, ) अश्वमेधयाग करणारें कोठें जातात ? त्यांची गति सांगण्याकरितां ( प्रथम उत्पन्न केलेल्या ) भुवनविस्ताराचें परिमाण ( याज्ञवल्क्य ) सांगतो. बत्तीसच ( ह्मणजे ) दोन अधिक तीस. बत्तीस देवरथान्ह्यें ह्मणजे सूर्याच्या रथाच्या गतीनें ( ह्मणजे एके ) दिवशीं जितका देश मोजला जातो त्याच्या बत्तीसपट विस्ताराचा हा लोक, लोकालोक पर्वतानें वेढलेला आहे. या ठिकाणीं परमात्म्याचें विराट शरीर आहे, आणि येथेंच प्राण्यांस आपआपल्या कर्मांचीं फळें भोगावीं लागतात. हा लोक इतक्या विस्ताराचा आहे ह्मणून परम लोक ह्मणावा. त्या लोकाचे भोंवतीं त्याच्या विस्ताराची पृथ्वी पसरली आहे. त्या पृथ्वीचे भोंवतीं त्याप्रमाणेंच दुप्पट परिमाणाचा समुद्र फैलावला आहे. त्या समुद्राला पौराणिक लोक 'घनोद' ( मोठ्या उदकाचा ) ह्मणतात. त्यांत ब्रह्मांडाच्या कपालाच्या ( अर्ध्या अर्ध्या भागांच्या ) दरम्यानच्या छिद्राचें परिमाण सांगितलें आहे. त्या छिद्राच्या मार्गानें ब्रह्माण्डाच्या बाहेर निघून जाणारे अश्वमेधयाजी त्यांतून जातात. त्या छिद्राची रुंदी चाकूच्या धारेचें अग्र असतें तितकी किंवा माशीचा पंख अति सूक्ष्म असतो तितकी आहे. त्यांतून ह्मणजे ब्रह्मांडकपालांच्या दरम्यानच्या छिद्रांत जें आकाश असतें त्या आकाशाच्या मार्गानें ते जातात. ते पारिक्षित ह्मणजे अश्वमेधयाजी त्या ठिकाणीं पोहोंचल्यावर, इंद्र ह्मणजे साक्षात् परमेश्वर अश्वमेधामध्यें अग्निरूपानें पूजिला जातो, तो 'सुपर्ण'–त्याचें स्वरूप असें सांगितलें आहे कीं, त्याची पूर्व दिशा हें शिर आहे वगैरे–तो 'सुपर्ण' ह्मणजे पक्षी होऊन–पंख, पुच्छ वगैरे अवयवांनीं युक्त असा पक्षी होऊन त्या पारिक्षितांस वायूच्या हवालीं करतो. त्याचें स्वतःचें स्वरूप मूर्त ( देहयुक्त ) असल्यानें त्याची ( सुपर्णाची ) त्या छिद्रांत गति नाहीं. त्या पारिक्षितांस वायु आपल्या स्वरूपांत मिळवून, स्वस्वरूपी करून त्या छिद्रांतून घालवितो. कोठें ? तर, ज्या ठिकाणीं पूर्वींचे पारिक्षित अश्वमेधयाजी असतात, त्या ठिकाणीं पोहोंचवितो. ह्या प्रमाणेंच त्या गंधर्वानें वायूची प्रशंसा करून पारिक्षिताची गति सांगितली. गोष्ट संपली.

ह्या गोष्टींत तात्पर्यानें वर्णिलेला अर्थ बाजूस ठेवून ( याज्ञवल्क्यानें ) आपल्या श्रुतिरूप वाणीनें आपणा सर्वांस असें सांगितलें आहे कीं, ज्या अर्थीं वायु स्थावरजंगम प्राण्यांचा अन्तर्यामी असून बाहेरही तोच संचार करीत आहे, त्या अर्थीं अध्यात्म, अधिभूत, अधिदैवत-स्वरूपानें त्याची सर्वत्र भिन्न भिन्न व्याप्ति ( अष्टि ) आहे. तसाच तो समष्टि केवळ सूत्रात्म-स्वरूपानें आहे. जो हें जाणतो तो समष्टि, व्यष्टिरूपानें वायुरूपाप्रत पावतो. याचें फल काय ह्मणाल तर याज्ञवल्क्य सांगतो कीं, एकवेळ मृत्यूचा जय करून प्राणी पुन्हां मरत नाहीं-याप्रमाणें लाह्यायनि भुज्यूच्या प्रश्नाचा निर्णय झाल्यावरून तो स्तब्ध राहिला.

**अध्याय ३, ब्राह्मण ३, समाप्त.**

# उषस्तब्राह्मण.

## सर्वांतर आत्मा.

## अध्याय ३, ब्राह्मण ४,

ऋचा १—मग त्याला उषस्त चाक्रायणानें याज्ञवल्क्या, अशी हाक मारून ह्मटलें. जें प्रत्यक्ष व समक्ष ब्रह्म आहे, जो सर्वांतर आत्मा आहे, तो मला सांग? (उत्तर) तो हा तुझा आत्मा सर्वान्तर. (प्रश्न) याज्ञवल्क्या, कोणता तो सर्वान्तर? (उत्तर) जो प्राणरूपानें प्राणचेष्टा (हालचाल) करतो, तो तुझा आत्मा सर्वान्तर. जो अपानरूपानें अपानव्यापार करतो, तो तुझा आत्मा सर्वान्तर. जो व्यानरूपानें व्यानव्यवहार करतो, तो तुझा आत्मा सर्वान्तर. जो उदानरूपानें ऊर्ध्वचेष्टा करितो, तो तुझा आत्मा सर्वान्तर. हा तुझा सर्वान्तर आत्मा.

भाष्य—मग त्याला उषस्तानें प्रश्न केला. पुण्यपापाच्या कारणानें प्राप्त जालेले ग्रह व अतिग्रह यांनीं व्याप्त झालेला आत्मा वारंवार ग्रहातिग्रहांस टाकतो व घेतो, (आणि अशा रीतीनें) संसार करीत असतो, असें (मागें) सांगितलें. पुण्याचा परम उत्कर्ष ह्मटला ह्मणजे (नामरूपांनीं) प्रकट जालेल्या (हिरण्यगर्भस्वरूपांत) समष्टिव्यष्टिरूपानें द्वैताशीं एकरूप असणारा आत्मा प्राप्त होतो असें सांगितलें; परंतु जो आत्मा ग्रहातिग्रहांनीं ग्रस्त होऊन संसार करतो, तो आहे कीं नाहीं? असल्यास त्याचें लक्षण काय? याप्रमाणें आत्म्याचेंच विवेकानें स्वरूप समजण्याकरितां श्रुतीनें उषस्तप्रश्नाचा आरंभ केला आहे. तो आत्मा उपाधिरहितस्वरूपाचा, व क्रिया आणि क्रियासाधनें ह्यांत सर्वदा अलिप्त राहणाऱ्या स्वभावाचा आहे. असें समजलें ह्मणजे सदरीं सांगितलेल्या बंधनांतून व त्यांच्या मूळ कारणांतून (कर्मांतन) मुक्त होतो. ही गोष्ट कोणत्या संबंधानें आली हें पुन्हां सांगावयास नको.

याज्ञवल्क्य (जनकसभेंत उभा आहे) त्याला चक्रपुत्र चाक्रायण उषस्त नांवाचा ऋषि यानें प्रश्न केला. जें ब्रह्म प्रत्यक्ष, ह्मणजे कोणत्याही पडद्यानें झांकलेलें नव्हें असें, पाहणारास अपरोक्ष ह्मणजे समक्ष (असल्यामुळें) गौण (ह्मणजे कल्पित, किंवा श्रुत) नव्हे श्रोत्र ब्रह्म होय, (मन ब्रह्म होय) ह्मणतात, तसल्या ब्रह्माप्रमाणें नव्हे, तें ब्रह्म कोणतें? तो आत्मा आत्मासंज्ञेनें प्रत्यगात्मा घ्यावयाचा; कां तर, आत्मा शब्द प्रत्यगात्मा ह्या अर्थानें प्रसिद्ध आहे, सर्वांच्या अभ्यंतरीं आहे; ह्मणून सर्वान्तर ज्याला ह्मणतात, तो ब्रह्म. 'जें जो' असे शब्द आले आहेत, त्यावरून प्रसिद्ध आत्मा ब्रह्म असें समजावें. तो आत्मा मला सांग, असा प्रश्न करून जशी एखादी गाय शिंगाला धरून स्पष्ट दाखवावयाची, तसा दाखीव, तो हा, असें सांग, असा (उषस्तप्रश्नाचा अभिप्राय आहे.

( उषस्तानें ) असें भाषण केलें, त्यास याज्ञवल्क्य उत्तर देतो. हा तुझा आत्मा तो सर्वान्तर ह्मणजे सर्वांच्या अभ्यंतरीं आहे. सर्व विशेषणांचा संग्रह व्हावा ह्मणूनच ( प्रश्नामध्यें ) सर्वान्तर हें विशेषण दिलें आहे. जें प्रत्यक्ष ह्मणजे कोणत्याही पडद्यानें झांकलेलें नव्हे, अपरोक्ष ह्मणजे गौण नव्हे, ब्रह्म ह्मणजे अतिविस्तृत, सर्वांचा आत्मा, सर्वांच्या अभ्यन्तरीं असणारा, या सर्व गुणांनीं युक्त असा हा आत्मा आहे. तो तुझा आत्मा कोणता तर, जो हा तुझा कार्यकारणसमुदाय ( देह ) ज्याच्यायोगें आत्मयुक्त आहे, तोच हा तुझा आत्मा, कार्यकारणसमुदायाचा आत्मा असें लक्षांत ठेवावें. आतां पिण्ड ( देह ) एक आहे, त्याच्या अन्तर्भागीं लिंगदेह इंद्रियसमुदायरूप आहे असा ज्याविषयीं भास होतो तो एक आहे, तिसरा हल्लीं ज्याविषयीं वाद आहे तो, यांपैकीं माझा सर्वान्तर आत्मा तूं कोणता सांगणार ? असें ( उषस्तानें ) ह्मटल्यावर इतर ( याज्ञवल्क्य ) उत्तर देतो. जो मुख, नासिका, ह्यांमध्यें संचार करणाऱ्या प्राणाच्या द्वारें प्राणव्यापार करतो, ज्याच्या प्रेरणेनें प्राणवायु क्रियायुक्त होतो; जो प्राणाचें प्रणयन ( प्रगति ) करणारा तो, कार्यकारणसमुदायरूप जो तूं, त्या तुझा विज्ञानस्वरूप आत्मा होय. बाकी उत्तरांचा ( 'अपानेनापानीति' इत्यादि उत्तरांचा ) ह्याप्रमाणेंच अर्थ करावा. 'अपानी, व्यानी,' ह्यांतील ( नीचा ) दीर्घ ईकार आर्ष आहे. कार्यकारणसमुदायांतील ( देहांतील ) प्राणाचे वगैरे व्यापार, लांकडी यंत्र चालवावें त्याप्रमाणें, तो करितो; कां तर, नियंत्रण करणारा कोणी सचेतन असल्याशिवाय लांकडी यंत्राप्रमाणें प्राणाचे चलनवलनादि व्यापार होणार नाहींत: ह्मणूनच विज्ञानमय स्वतंत्र आत्म्याचे देखरेखीखालीं प्राणादिक वायु व्यापार करूं लागतात; व ह्मणूनच कार्यकारणसमुदायाहून भिन्न आत्मा जो चलनवलनादि व्यापार उत्पन्न करितो तो आहेच.

**ऋचा २—मग पुन्हा त्या उषस्त चाक्रायणानें ह्मटलें कीं, जसें ही गाय, हा घोडा, असें दाखवून ( ही चालते आहे ती गाय, धावतो आहे तो घोडा ) असें एखादा ( अन्य शद्बांनीं ) सांगतों, त्याप्रमाणेंच हें ( ब्रह्म ) तूं सांगितलेंस. पण जें प्रत्यक्ष व समक्ष ब्रह्म होय, जो सर्वान्तर आत्मा होय, तो मला दाखीव. ( उत्तर ) तो हा तुझा आत्मा सर्वान्तर. ( प्रश्न ) हे याज्ञवल्क्या, तो सर्वान्तर कोणता ? ( उत्तर ) दृष्टीचा द्रष्टा तुला पाहतां येणार नाहीं; श्रवणाचा श्रोता ऐकतां येणार नाहीं; मनाचा मन्ता मनन करतां येणार नाहीं; विज्ञानाचा विज्ञाता जाणतां येणार नाहीं; तो हा तुझा आत्मा सर्वान्तर. त्याहून इतर ( सर्व ) आर्त ह्मणजे विनाशी आहे. हें ऐकून उषस्त चाक्रायण स्तब्ध झाला.**

भाष्य—त्या उषस्त चाक्रायणानें ह्मटलें, जसा कोणी मनुष्य प्रथम अन्यथा प्रतिज्ञा करून अडविला ह्मणजे अन्यथा बोलूं लागतो. ही गाय, हा घोडा, असें ह्मणतो; (व तें काय असें विचारलें ह्मणजे ) जी चालते ( गौर्गच्छति ), जो धावतो ( अश्व—आशुगंता ) तो, असें ह्मणतो. प्रत्यक्ष दाखवितों अशी प्रतिज्ञा करून मागून चालणें, धावणें, वगैरे खुणांच्या मिषानें वर्णन करतो, त्याप्रमाणेंच हें ब्रह्म तूं प्राणव्यापारादि खुणांनीं वर्णन केलें. फार कशाला ? हें गाय नांव पडण्याचें निमित्त सांगण्याचें कपट सोडून देऊन, जें प्रत्यक्ष व समक्ष ब्रह्म, ( व ) जो सर्वान्तर आत्मा तो मला सांग. दुसरा ( याज्ञवल्क्य ) उत्तर देतो. जशी मी प्रथम प्रतिज्ञा केली कीं,

तुझ्या आत्म्याचीं लक्षणें अमुक आहेत, ती प्रतिज्ञा संभाळूनच बोलत आहें. तें ( लक्षण ) मी जसें सांगितलें तसेंच आहे.

पण जें तूं ह्मणाला होतास कीं, तो आत्मा घटादिक पदार्थांप्रमाणें प्रत्यक्ष दाखव, तें अशक्य असल्यामुळें करितां येत नाहीं. पण तें अशक्य कां? असें ह्मणशील तर सांगतों कीं, त्या वस्तूचा स्वभावच असा आहे. त्या वस्तूचा स्वभाव कसा आहे ह्मणशील तर, दृष्टीचा द्रष्टृपणा त्या वस्तूंत आहे. दृष्टि दोन तऱ्हेची असते. ( एक ) लौकिकी दृष्टि, व एक पारमार्थिक दृष्टि होय. त्यांपैकीं लौकिकी दृष्टि ह्मणजे चक्षूंशीं संयुक्त झालेल्या अंतःकरणाची वृत्ति. ती बनवावी लागते ह्मणून उत्पन्न होते, व नाश पावते; पण आत्म्याची जी दृष्टि आहे, ती अग्नीच्या उष्णता, प्रकाश वगैरे धर्मांप्रमाणें द्रष्टा ( आत्मा ) याचें स्वरूप असल्यामुळें उत्पन्न होत नाहीं, व नष्ट होत नाहीं. ती आत्म्याची दृष्टि, चक्षुरिंद्रियाची उत्पन्न होणारी उपाधिरूप दृष्टि असते तिच्याशीं संसृष्ट ह्मणजे जणूं मिश्रित अशी असल्यानें तिला द्रष्टा असें ह्मणतात; व द्रष्टा निराळा व दृष्टि निराळी, असेंही ह्मणण्यांत येतें. जी ही लौकिकी दृष्टि चक्षुर्द्वारा रूपविषयावर अनुरक्त होते, व उत्पन्न झाल्याबरोबर, नित्य जी आत्मदृष्टि तिच्याशीं जणूं संसृष्ट होते, ती आत्मदृष्टाची पडछाया आहेः व ती आत्मदृष्टीनें व्याप्तच असते. ती उत्पन्न होते व नाश पावते; त्यावरूनच द्रष्टा नेहमींचा पाहणारा असून कधीं पाहतो, कधीं पाहत नाहीं, असें औपचारिक रीतीनें ह्मणतात; ( परंतु दृष्टीच्या द्रष्ट्याला उत्पत्ति व विनाश नाहीं ). द्रष्ट्याहून दृष्टीला निराळेपणा नाहीं, असें पुढें सहाव्या अध्यायांत सांगेल. " द्रष्टा जणूं ध्यान करीत असतो, जणूं चलनवलन करीत असतो " अशी श्रुति आहे. " द्रष्ट्याच्या दृष्टीचा लोप होत नाहीं " अशीही श्रुति आहे.

( एकंदरींत याज्ञवल्क्य ) असा अर्थ सांगतो कीं, लौकिकी दृष्टिरूप विषयाचा जो द्रष्टा आहे; व जो स्वतःच्या नित्य दृष्टीनें लौकिकी दृष्टीला व्याप्त करतो, तो तुला दिसणार नाहीं. दर्शनक्रियेचें कर्म जे विषय, तद्रूप लौकिकी दृष्टि रूपविषयावर अनुरक्त असून, रूप दाखविणारी आहे. तिला व्यापून असणाऱ्या प्रत्यगात्म्याला ती व्यापीत नाहीं; ह्मणून दृष्टीचा द्रष्टा जो प्रत्यगात्मा, तो तुला दिसणार नाहीं. त्याप्रमाणें श्रवणाचा श्रोता तुला ऐकूं येणार नाहीं. तसाच मननाचा ह्मणजे केवळ मनोवृत्तीला व्यापून असणारा आत्मा त्याचें तुला मनन करितां येणार नाहीं. तसेंच केवळ बुद्धिवृत्ति जें विज्ञान त्याला व्यापून राहणारा आत्मा, ह्याचें विज्ञान तुला होणार नाहीं. हा वस्तूचा ( आत्म्याचा ) स्वभाव आहे; ह्मणून ती वस्तु गाय वगैरेप्रमाणें दाखवितां येणार नाहीं.

दृष्टीच्या द्रष्ट्याला ( पाहतां येणार ) नाहीं, वगैरे शब्दांचा कांहीं लोक निराळ्या तऱ्हेनें अर्थ करितात. ( तो असा ) "दृष्टीच्या द्रष्ट्याला ह्मणजे दृष्टीच्या कर्त्याला ( अर्थात् ) यावत् दृष्टीच्या कर्त्याला आपली दृष्टि न बदलतां ( एतद्भिन्न दृष्टि न घेतां ) तूं पाहूं शकणार नाहींस." ' दृष्टीच्या ' ही कर्मबोधक षष्ठी घ्यावी; कां तर, दृष्टि उत्पन्न केली, ह्मणजे ती, कुलाल घट उत्पन्न करितो त्याप्रमाणें, उत्पत्तिक्रियेचें कर्म होते. द्रष्टृ शब्द ' तृ ' प्रत्यान्त आहे, त्यावरून द्रष्टा ह्मणजे दृष्टि उत्पन्न करणारा असें ह्मणतात. एकंदरींत, दृष्टीचा द्रष्टा ह्मणजे दृष्टिकर्म करणारा कर्ता असा अर्थ होतो, असा त्या लोकांचा अभिप्राय आहे.

---

१—' ध्यायतीव लेलायतीव ' बृ. ४–३–७. २—' न हि द्रष्टुर्दृष्टेर्विपरिलोपः ' बृ. ४–३–२३.

पण तसें घेतलें असतां ' दृष्टीचा ह्या षष्ट्यन्त पदानें दृष्टि हा अर्थ घेणें व्यर्थ होईल, जास्त होतें. हा दोष त्यांस दिसत नाहीं. हा पुनरुक्ति दोष दिसत असला तर, ' दृष्टेर्द्रष्टारं ' यांतील पुनरुक्ति महत्वाची नाहीं किंवा चुकीची आहे, असें मानून दुर्लक्ष करीत असावे, ( असें ह्मटलें पाहिजे ). ' दृष्टेः ' हें पद अधिक कसें ? तृ प्रत्ययान्त ' द्रष्टा ' शब्दानें दृष्टीचा कर्ता असा अर्थ होतोच; ह्मणून ' दृष्टेः ' हें पद व्यर्थ अधिक आहे. मग ' द्रष्टारं न पश्येत् ' इतकेंच ह्मणावयास पाहिजे; कां तर ' द्रष्टा ' शब्दामध्यें दृश् धातूच्यापुढें तृ प्रत्यय श्रुतींत आहे; आणि धातुनिर्दिष्ट अर्थाचा कर्ता असें तृ प्रत्ययानें होतें, अशी ( पाणिनि ) स्मृति[1] आहे. गन्त्याला किंवा भेत्त्याला नेतो अशीं वाक्यें लिहितात; पण गतीच्या गन्त्याला, भेदाच्या भेत्त्याला असें कांहीं अर्थविशेष दाखवावयाचा नसल्यास लिहीत नाहींत. श्रुतींतील ' दृष्टेर्द्रष्टारं ' ह्या पाठाचा अर्थ इतर रीतीनें होत असल्यास अर्थवाद ह्मणून दृष्टि शब्द वगळूं नये; किंवा तो चुकीचा पाठ आहे असें ह्मणूं नये; कारण ( काण्व, माध्यंदिन वगैरे ) सर्वांचे ( पाठ ) अविगीत ( अनिंद्य ) आहेत. यावरून ( सदरचें ) व्याख्यान करणारांचीच बुद्धि दुर्बल आहे. अध्ययन करणाऱ्यांनीं ( वेद ह्मणणाऱ्यांनीं ) प्रामादिक पाठ घातला आहे असें नाहीं.

पण ज्याप्रमाणें लौकिक दृष्टि भिन्न करून नित्य दृष्टियुक्त आत्मा दाखवावा, असा आह्मीं अर्थ केला, त्या तऱ्हेनें मूळांतील दृष्टि शब्द एक वेळ कर्त्याला लागू, व एक वेळ कर्माला लागू, अशा विशेष अर्थांनीं दोनदां घातला आहे हें ह्मणणें ठीक बसतें; ही योजना आत्मस्वरूपाचा निश्चय करण्याकरितां आहे. ' द्रष्ट्याच्या दृष्टीचा[2] ' असें अन्यठिकाणीं वाक्य आहे, त्या वाक्याशीं योग्य एकवाक्यता होते. आणि त्याप्रमाणें ' चक्षूस पाहतो,[3] ' ' हें श्रवणेंद्रिय ऐकिलें[4] ' अशा अन्य श्रुति आहेत, त्यांशींहि एकवाक्यता होते, आणि न्यायपद्धति अशीच आहे; कांतर, आत्म्याला विकार होत नाहीं ह्मणून त्याचें नित्यत्व सिद्ध होतें. ज्यास विकार होतो तें नित्य असें ह्मटलें असतां असंबद्ध भाषण होईल. आत्मा जणूं ध्यान करितो, जणूं चलनवलन करितो, द्रष्ट्याच्या दृष्टीचा लोप होत नाहीं, असें ब्राह्मणा( ब्रह्मा )चें महत्व आहे, अशा अन्य श्रुती आहेत, त्या इतर रीतीनें बसणार नाहींत.

द्रष्टा, श्रोता, मन्ता, विज्ञाता, हीं विशेषणें आत्मा अविक्रिय आहे, असें मानलें तर लागूं पडत नाहींत, असें ह्मणशील तर नाहीं; कारण, हीं विशेषणें लोकवादाला अनुसरून आत्म्याला प्राप्त झालीं आहेत. आत्म्याचा मूळस्वभाव निश्चित करण्यास तीं विशेषणें दिलीं आहेत, असें नाहीं. दृष्टीचा द्रष्टा वगैरे विशेषणांचा दुसरा ( दृष्टिचा कर्ता असा ) अर्थ संभवत नाहीं. ह्मणून आह्मी सांगितलेल्या अर्थाचीच ( ही श्रुति ) आहे असें वाटतें; ह्मणून ( तुला ) समजेनासें झाल्यामुळेंच ' दृष्टीचा ' ह्या द्रष्ट्याचे विशेषणाकडे तूं दुर्लक्ष्य केलें आहेस.

हा तुझा आत्मा सर्व विशेषणांनीं युक्त आहे. या आत्म्याहून अन्य सर्व वस्तु आर्त ह्मणजे कार्यरूप शरीर किंवा करणरूप लिंगदेह आहेत. हें ( ब्रह्म ) एकटेंच कूटस्थ अनार्त—अविनाशी आहे. इतकें ऐकून उषस्तचाक्रायण स्तब्ध झाला.

## अध्याय ३, ब्राह्मण ४, समाप्त.

१—' कर्तरितृच '　२—' न हि द्रष्टुर्दृष्टेः ' बृ. ४–३–२३.　३—' चक्षूंषि पश्यति.केन ६.
४—' श्रोत्रमिदं श्रुतं ' केन ७.

# कहोल ब्राह्मण.

## सर्वांतरज्ञानांगत्वें एषणात्याग.

## अध्याय ३, ब्राह्मण ५.

ऋचा १—मग त्या ( याज्ञवल्क्या ) ला कुषीतक पुत्र कहोल ऋषीनें प्रश्न केला. ‘ हे याज्ञवल्क्या ’ अशी हाक मारून ह्मणाला. जें प्रत्यक्ष व समक्ष ब्रह्म आहे, व जो सर्वान्तर आत्मा आहे तो मला सांग. (उत्तर) हा तुझा आत्मा सर्वान्तर. ( प्रश्न ) हे याज्ञवल्क्या, तो सर्वान्तर कोणता ? ( उत्तर ) जो भूक, तहान, शोक, मोह, जरा, व मृत्यु यांच्या पलीकडे आहे, व हाच तो आत्मा असें जाणून, ब्राह्मण पुत्रैषणेपासून, वित्तैषणेपासून व लोकैषणेपासून निवृत्त होऊन भिक्षावृत्ति धरतात. जी पुत्रैषणा तीच वित्तैषणा, जी वित्तैषणा तीच लोकैषणा. मिळून ह्या दोनच एषणा होत. म्हणून ब्राह्मणानें पूर्ण ज्ञान करून घेऊन बाल्य[1]भावानें राहण्याची इच्छा करावी. बाल्यभाव आणि पूर्ण ज्ञानीपणा संपादन करून मग मननशील असावें. मग मौनाभाव व मौन ह्मणजे काय हें पूर्ण जाणून ब्राम्हणत्व पावतो, त्या ब्राम्हणानें कोणत्या वृत्तीनें रहावें ? कोणत्याहि वृत्तीनें राहिला तरी तो असाच राहतो. त्या ( ब्राह्मणा )हून भिन्न ( एषणायुक्त जें राहणें तें ) आर्तियुक्त ( पीडायुक्त किंवा नश्वर ) असतें. इतकें ऐकून कुषीतकपुत्र कहोल ऋषि स्तब्ध झाला.

भाष्य—( पूर्वी ) संसारबन्धन व त्याचें कारण सांगितलें. जो बद्ध आहे त्याचें अस्तित्व समजलें, व तो ( देहाहून ) भिन्न आहे हें ही समजलें. त्या बद्धाची आतां बन्धांतून मुक्तता होण्यास साधनीभूत संन्याससहित आत्मज्ञान सांगावयाचें आहे, ह्मणून कहोल प्रश्नाचा आरंभ आहे. ‘ मग त्या याज्ञवल्क्याला कुषीतकाचा पुत्र कौषीतकेय कहोल नांवाच्या ऋषीनें प्रश्न केला. ‘ याज्ञवल्क्या, अशी हाक मारून ह्मणाला ’ वगैरे पूर्वीप्रमाणें. जें प्रत्यक्ष व अपरोक्ष ब्रह्म आहे, व

१—बाल्य ह्मणजे बलभाव, बलयुक्त असणें, असा आचार्यांनीं अर्थ केला आहे. त्याचें वस्तुतः बाल्यावस्थेशीं साम्य नाहीं; परंतु बाल्यावस्थेमध्यें जें बाह्यस्वरूप मनुष्याला असतें, तेंच बाह्यस्वरूप पंडिताला असतें; व त्याचा गुप्तपणें श्रुतीनें उल्लेख केला असावा, असें वाटल्यावरून बाल्यभावानें राहण्याची इच्छा करावी, असें व्द्यर्थी भाषांतर केलें आहे. “ तस्माद्ब्राह्मणः पाण्डित्यं निर्विद्य बाल्येन तिष्ठासेत् ” ह्या वाक्याचा अर्थ, ह्मणून ब्रह्मनिष्ठानें पाण्डित्याची गरज न ठेवितां बालस्वभावानें राहण्याची इच्छा ठेवावी, असा प्रथम दर्शनीं दिसतो.

जो सर्वान्तर आत्मा आहे तो मला सांग? जो जाणला असतां (जीव) बंधमुक्त होईल तो सांग. याज्ञवल्क्य उत्तर देतो, 'तो हा तुझा आत्मा.'

(आतां) उषस्तऋषीनें व कहोलऋषीनें एकच आत्मा विचारला, किंवा समान लक्षणाचे भिन्न भिन्न आत्मे विचारले? भिन्न भिन्न आत्मे विचारले, असें ह्मणणें योग्य आहे; कांतर, दोन्हीं प्रश्नांत पुनरुक्ति दोषाचा अभाव असला पाहिजे. जर उषस्त व कहोल ह्यांच्या प्रश्नांत एका आत्म्याविषयीं बोलावयाचें आहे, असें धरलें तर, एकाच प्रश्नानें ज्ञान होत असल्यामुळें त्याविषयीं दुसरा प्रश्न व्यर्थ होणार. (दुसरा प्रश्न) अर्थवादरूप वाक्य आहे असेंही ह्मणतां येत नाहीं. तस्मात् हे आत्मे भिन्न भिन्न आहेत, व एक क्षेत्रज्ञ (जीव) व दुसरा परमात्मा (ईश्वर) असावा अशी कोणी व्याख्या करितात.

(पण) तसें नाहीं. कारण,'तुझा' असें स्पष्टपणें ह्मण्टलें आहे, व हा तुझा आत्मा असेंच उत्तर वाक्यांत स्पष्ट ह्मण्टलें आहे. एका कार्यकारणसमुदायाला (देहाला) दोन आत्मे आहेत, असें म्हणतां येत नाहीं. एक कार्यकारणसमुदाय एका आत्म्यानें आत्मयुक्त होतो. उषस्ताच्या आत्म्याची व कहोलाच्या आत्म्याची जात निराळी नाहीं. ती (एकसमयावच्छेदानें) मुख्य आत्मपणायुक्त व सर्वान्तरपणायुक्त होणार नाहींत. जर दोहोंपैकीं एक अगौण (मुख्य) ब्रह्म घेतला, तर दुसरा अवश्यमेव गौण असला पाहिजे. असेंच आत्मत्व व सर्वान्तरत्व (दोन ठिकाणीं) असणार नाहीं. (एकाला आत्मपणा असला तर दुसरा अनात्मा होईल).|(भिन्न) पदार्थ विरुद्ध (स्वभावाचे) असतात. जर एक सर्वान्तर ब्रह्मरूप, मुख्य, आत्मा धरिला, तर दुसरा अवश्यमेव सर्वान्तर नव्हे, आत्मा नव्हे, व मुख्य नव्हे. ह्मणून एकच आत्मा श्रुतीनें दोन वेळ (त्यांतील कांहीं) कांहीं विशेष (लक्षणें) दाखविण्याकरितां सांगितला आहे.

पण दुसऱ्या प्रश्नांत पूर्वीं सांगितलेला जो भाग समान आहे, तो मात्र पूर्वींच्याचाच अनुवाद असून, त्याचाच कांहीं न सांगितलेला विशेष सांगावयाचा आहे, असें (घ्यावें.) तो विशेष कोणता ह्मणाल तर सांगतों. पूर्वींच्या प्रश्नांत ज्या आत्म्याला कारणसहित बंध सांगितलेला आहे, तो आत्मा (देहाहून) भिन्न आहे, असें आहे; आणि दुसऱ्या प्रश्नांत त्याच आत्म्याचा भक, तहान, वगैरे संसार धर्मापासून दूर असणें, हें विशेष लक्षण सांगितलें आहे; व ती विशेष गोष्ट पूर्णपणें जाणून संन्यास केला असतां, पूर्वीं सांगितलेल्या बंधनांतून (मनुष्य) मुक्त होतो. याकरितां दोन्हीं प्रश्न व उत्तरें ह्यामध्यें, हा तुझा आत्मा, या शब्दांपर्यंत सारखेपणाच आहे.

एकाच आत्म्याला भूक वगैरे नसणें, व असणें, असे विरुद्ध धर्म कसे लागूं होतील? या शंकेचा परिहार केला असल्यामुळें (तशी शंका येत) नाहीं. नामरूपांचा विकार जो कार्यकारणसमुदाय (देह) तीच भिन्न उपाधि. तिच्या संपर्कापासून (मी खाणारा वगैरे) भ्रान्ति उत्पन्न होते. हाच संसारीपणा, असें आह्मी वारंवार सांगितलें आहे. आणि एकास एक विरुद्ध असणाऱ्या श्रुतींचें व्याख्यान करतांना हीच गोष्ट सांगितली. उदाहरण—दोरी, शिंप, आकाश

१—मधुब्राह्मणाचे शेवटीं परस्परविरुद्ध भासणाऱ्या श्रुतींचे व्याख्यानाचे वेळीं संसारीपणा खोटा आहे असें दाखविलें आहे–(पहा अ. २–ब्रा, ५)

वगैरे पदार्थांवर साप, रुपें, मलिनपणा यांचा लोक आरोप करीत असतात; पण, ते पदार्थ स्वतः केवळ दोरी, शिंप, आकाशच असतात. या तऱ्हेनें विरुद्ध धर्म एके ठिकाणीं आले ( भासले ) तरी पदार्थांत विरोध येत नाहीं.

नाम, रूप, उपाधि आहेत ह्मटलें, तर, 'एकच द्वितीयरहित आहे,' 'या ठिकाणीं भिन्न भिन्न कांहीं नाहीं,' या श्रुतींना बाध येईल असें ह्मणाल तर, ( तसा बाध येत ) नाहीं. उदक व फेस ह्या दृष्टांतानें ( उदकाचें एकत्व न ढळतां ) भेद शंका दूर केली आहे. माती ( व तिच्या घडलेल्या वस्तु ) इत्यादि दृष्टांतांनींही ( भेदशंकेचा परिहार केला आहे. ) पण जेव्हां 'एकच द्वितीयरहित आहे. ह्या ठिकाणीं भिन्न भिन्न कांहीं नाहीं." या श्रुतींना अनुसरणाऱ्या लोकांनीं परमात्मतत्वाहून भिन्नत्वानें वर्णिलेलीं नामरूपें, घट, फेस, वगैरे मृत्तिका, उदक वगैरेहून वस्तुतः भिन्न नसतात, त्याप्रमाणें वस्तुदृष्ट्या भिन्न नाहींत, असें घेतलें असेल तेव्हां परमात्मतत्वाच्या संबंधानें "एकच अद्वितीय आहे,' 'येथें भिन्न भिन्न कांहीं नाहीं" वगैरे श्रुति खरें तत्त्व सांगणाऱ्या आहेत असें ठरतें.

पण जेव्हां स्वभावसिद्ध अविद्येच्या कारणानें, ब्रह्मस्वरूप मात्र दोरी, शिंप, आकाश या वस्तूंच्या स्वरूपांप्रमाणें खरें असून, कोणत्याही उपाधीचा त्याला स्पर्श होत नाहीं, असें असतांही नामरूपांनीं उत्पन्न केलेल्या, कार्यें ( देह ) व करणें ( इंद्रियें ) ह्या उपाधींपासून ( ब्रह्म ) निराळें आहे, असा निश्चय होत नाहीं; व नामरूपात्मक उपाधि ( सत्य ) आहे, असें स्वभावतः वाटत असतें; तेव्हां ब्रह्माहून इतर वस्तु आहेत अशी भाषा ( बोलण्याचा प्रघात ) असते. ही भेदबुद्धि-जनित खोटी भाषा ब्रह्मतत्वाहून उपाधि भिन्न आहेत,व भिन्न नाहींत, असें ह्मणणाऱ्या दोघांच्याही बोलण्यांत राहतेच.

परंतु खरा अर्थ सांगणारे लोक श्रुतीला अनुसरून वस्तुविचार करूं लागले ह्मणजे तत्वतः खरें काय आहे, व खरें नाहीं काय ? ( असा विचार करतानां ) ब्रह्म एकच द्वितीयरहित असून सर्व व्यवहाररहित आहे, असा निश्चय करितात; त्यामुळें कोणताच विरोध नाहीं. कारण अत्यंत खऱ्या अर्थाविषयीं निश्चय होऊन निष्ठा बसली ह्मणजे ( ब्रह्माहून ) अन्य वस्तु नाहीं; असें 'एकच द्वितीयरहित,' 'आंत नाहीं बाहेर नाहीं,' ह्या श्रुती वरून समजूत करून घेतों. नामरूपाचा व्यवहार चालवीत असतांना अविवेकी लोकांमध्यें क्रिया, क्रियासाधनें, व त्यांचीं फलें वगैरे व्यवहार ( भेदव्यवहार ) नाहीं, असें आह्मीं ह्मणत नाहीं. एकंदरींत ज्ञान व अज्ञान यांच्या दृष्टीनें शास्त्रीय व लौकिक व्यवहार होत असतो; ह्मणून ( प्रत्यक्ष गोष्टींत व शास्त्रीय गोष्टींत ) विरोधाची शंका नाहीं. वाद करणारे सर्व ज्ञानी लोकांना पारमार्थिक ( मोक्षावस्थेंत भेद नाहीं ) असा व्यवहार, व ( संसारदशेंत ) भेदव्यवहार टाळतां येत नाहीं.

त्यामध्यें ( ह्मणजे कल्पित व पारमार्थिक आत्म्यांमध्यें ) पारमार्थिक आत्म्यास अनुलक्षून पुन्हा 'याज्ञवल्क्या, कोणता सर्वांतर' असा ( कहोलाचा ) प्रश्न आहे. दुसरा ( याज्ञवल्क्य )

---

१—'एकमेवाद्वितीयं' छां. ६–२–१. २—'नेह नानाऽस्ति किंचन' बृ. ४–४–१९; कठ ४, ११. ३—'अनन्तरमबाह्यम्' बृ. २–५–१९; ३–८–८.

उत्तर देतो कीं, ' अशनायापिपासा ' ( वगैरे ). अशनाया ह्मणजे अशनाची (खाण्याची) इच्छा, पिपासा ह्मणजे पिण्याची इच्छा. ती अशनाया व पिपासा जो पुरुष उल्लंघन करितो, असा पुढच्याशीं ( अत्येतिपदाशीं ) अन्वय घ्यावा. अज्ञानी लोकांना, आकाशाला जणूं पृष्ठभाग व निळा रंग आहे असें वाटतें; पण तेंच आकाश पृष्ठभाग व मळ ह्यांस सोडून पलीकडे आहे; कारण वस्तुतः आकाशाचा त्यांशीं संबंध नाहीं. त्याप्रमाणेंच भूक, तहान इत्यादिकांनीं ब्रह्म युक्त आहे, असें मूढ समजतात, व मला भूक लागली आहे, मी तान्हेलों आहें, असें ह्मणतात. त्या अशनाया व पिपासा यांच्या पलीकडे ब्रह्म आहे; कारण परमार्थतः त्यांच्याशीं ब्रह्म संबद्ध नाहीं; कारण " बाहेर असणारा ( असंग आत्मा ) लोकदुःखानें लिप्त होत नाहीं, " अशी श्रुति आहे. अविद्वान् लोकांनीं भ्रांतीनें मानलेले दुःखानें, असा ' लोकदुःखेन ' ह्याचा अर्थ करावा. अशनायापिपासा हा द्वन्द्व समास दोन्ही एका प्राणाचे धर्म आहेत ह्मणून केला आहे. शोक ह्मणजे इच्छा समजावी. इष्ट वस्तु प्राप्त व्हावी ह्मणून चिंता करणाराला जें दुःख होतें, तें तृष्णेनें व्याप्त झालेल्या पुरुषाचें ठिकाणीं इच्छेचें बीज होऊन बसतें. त्यामुळें इच्छा प्रदीप्त होते ( तीच शोक ). मोह ह्मणजे खोट्या ज्ञानापासून उत्पन्न होणारा अविवेक ह्मणजे भ्रम. मोह हीच अविद्या; ती सर्व अनर्थोत्पत्तीला बीज आहे. शोकाचा परिणाम व मोहाचा परिणाम भिन्न असल्याकारणानें त्यांचा द्वंद्वसमास केला नाहीं. मनाच्या ठिकाणीं राहणारीं हीं दोन, व जरा आणि मृत्यु शरीरांत राहणारीं, त्यांपासून ( ब्रह्मज्ञानी ) दूर राहतो. जरा ह्मणजे शरीरेंद्रियसमुदायाचे भिन्न भिन्न परिणाम, वळ्या, पांढरे केस वगैरे रूपांनीं दिसून येतात ते; मृत्यु ह्मणजे शरीरेंद्रियाचा बिघाड; भिन्न भिन्न परिणामांचे शेवटीं होतो. जरा, मृत्यु, हीं दोन्हीं शरीरांत राहणारीं आहेत, त्यांच्या पलीकडे ( ब्रह्मज्ञानी ) राहतो.

अशनाया वगैरे, प्राण, मन, व शरीर यांच्या आश्रयानें, जीवांच्या ठिकाणीं सतत दिवसरात्रींप्रमाणें व समुद्राच्या लाटाप्रमाणें एकामागून एक येत असतात. त्यानांच प्राण्यांचा संसार असें ह्मणतात. जो हा दृष्टीचा पाहणारा वगैरे विशेषणांनीं युक्त आत्मा, प्रत्यक्ष ह्मणजे कशानेंही न झांकलेला, व अपरोक्ष ह्मणजे गौण ब्रह्म नव्हे असा, मुख्य सर्वान्तर आत्मा, तो ब्रह्मदेवापासून तृणापर्यंत स्थावर जंगम प्राण्यांच्या अशनाया पिपासा वगैरे संसारधर्मांनीं कधींच स्पृष्ट होत नाहीं. मळप वगैरेनीं आकाश मलिन होत नाहीं, त्याप्रमाणें ( हा सर्वदा निर्मल असतो ). त्या ह्या आत्म्याला ह्मणजे आपले तत्वाला जाणून हा (आत्मा) मी आहे, सर्वकाळ सर्व संसारापासून मुक्त व नित्यतृप्त असें परब्रह्म मी आहे, असें जाणून ब्राह्मण—संसारांतून उठून जाण्याचा अधिकार ब्राह्मणांनांच आहे ह्मणून ब्राह्मण शब्द घातला आहे—' व्युत्थाय ' ह्मणजे तिटकाऱ्यानें उठून (जातो.) कोठून ह्मणाल तर श्रुति सांगते कीं, पुत्रैषणा ह्मणजे पुत्र व्हावा अशी इच्छा, पुत्र झाला ह्मणजे इहलोकीं जय होईल, असा लोकजय करण्याचें साधन जो पुत्र त्याविषयीं इच्छा, ह्मणजे विवाह करणें, तो विवाह न करतां राहतो, असें समजावें. वित्तैषणेमुळें कर्माचें साधन गायी वगैरे घेणें, व त्या साधनानें ( यज्ञादि ) कर्म करून पितृलोक जिंकीन, किंवा ज्ञानसंयुक्त कर्मकरून देवलोक जिंकीन, किंवा केवळ हिरण्यगर्भविद्यारूप दैव वित्तानें देवलोक जिंकीन, ( ह्या इच्छेला वित्तैषणा ह्मणावें. )

---

१—' न लिप्यते लोकदुःखेन बाह्यः' ५, ११.

दैववित्तांतून उठणें होतच नाहीं, असें कांहीं ह्मणतात; कारण, दैववित्ताचें बळ घेऊनच उठणें होतें. पण हें ( ह्मणणें ) खरें नव्हे; कारण, दैववित्त झालें तरी त्याचा एषणेमध्यें संग्रह आहे. "येथपर्यंत कामचें आहे" असें श्रुतीनें ह्मटलें आहे हिरण्यगर्भ वगैरे देवतांविषयीं वर्णन करणारी विद्या वित्तच ह्मटली जाते; कारण ते विद्यारूप वित्त देवलोकप्राप्तीला कारण होतें. निरुपाधिक उत्तम ज्ञानस्वरूप ( परमात्मा ) वर्णन करणारी ब्रह्मविद्या देवलोकप्राप्तीचें कारण नाहीं. "त्यापासून तें सर्व उत्पन्न झालें," "तो ह्यांचा आत्माच आहे" अशी श्रुति आहे. तिच्या (ब्रह्मविद्येच्या) बलानें उठणें होतें; कारण, 'ह्या त्या आत्म्यालाच जाणून,' ( एषणांपासन उठतो ) असें विशेष रीतीनें येथें ह्मटलें आहे, त्यावरून ह्या तिन्ही अनात्म ( जड ) लोकप्राप्तीला कारणीभूत एषणाविषयांतून उठतो. "येथपर्यंत काम" या श्रुतीवरून एषणा ह्मणजे काम ह्या त्रिविध ब्रह्मबाह्यलोकप्राप्तीच्या साधनाविषयीं कामना न ठेवितां ( उठतो ) हें तात्पर्य आहे.

साधनेच्छा ती सगळी फलेच्छाच होय. ह्मणून श्रुति इच्छा तेथून एकच आहे अशी व्याख्या करिते. कशी ह्मणाल तर जी पुत्रैषणा तीच वित्तैषणा. दोन्हीमध्यें दृष्टफलें प्राप्त करून देण्याचा धर्म सारखाच आहे. जी वित्तैषणा तीच लोकैषणा. फलप्राप्तीकरितांच वित्तैषणा असते. सर्व लोक फलप्राप्तीकरितां साधनांचा स्वीकार करितात. जी लोकैषणा ती तरी साधनाशिवाय सिद्ध करणें शक्य नाहीं; ह्मणून एषणा तेथून एकच. साध्यसाधनभेदानें ह्या दोन एषणाच आहेत; ह्मणूनच ब्रह्मवेत्त्याला कर्म नाहीं व कर्मसाधनही नाहीं.

ह्मणून जे त्यांतून ( कर्माच्या ) पलीकडे गेलेले ब्राह्मण ( आहेत ते ) सर्व कर्में व कर्मसाधनें ह्मणजे देव, पितर, मनुष्यें, यांच्या निमित्तानें जीं यज्ञोपवीतादि साधनें आहेत, (तीं बाळगीत नाहींत.) यज्ञोपवीत वगैरे घालून दैव, पित्र्य, व मानुष कर्में करण्यांत येतात. "मनुष्याच्या कर्मांत निवीति" इत्यादि श्रुति आहे; ह्मणून पूर्वींचे ब्रह्मवेत्ते ब्राह्मण कर्मांतून व कर्मसाधनांतून ह्मणजे यज्ञोपवीतादिकांतून उठून, परमहंस परिव्राट ( संन्याशी ) होऊन, भिक्षाचार (भिक्षावृत्ति) ह्मणजे भिक्षेकरितां फिरण्याचा नियम पाळून असत. स्मृत्युपदिष्ट चिन्हें केवळ आश्रम घेणाऱ्या लोकांचीं पारिव्राज्य ( संन्याशीपणा ) सुचवणारीं पोट भरण्याचीं साधनें टाकून देत असत. विद्वान् नेहमीं चिन्हरहित असतो; कारण चिन्हरहित राहून, धर्मज्ञान करून घेऊन, स्पष्ट चिन्हें न बाळगतां किंवा स्पष्ट आचार न दाखवितां राहतो, अशा स्मृति आहेत. "मग संन्याश्यानें बिनरंगीं वस्त्रें नेसून, मुंडण करून, परिग्रहरहित असावें" इत्यादि श्रुति आहे. "शेंडी व केस काढून यज्ञोपवीत टाकून देऊन असावें" अशीही श्रुति आहे.

---

१—'एतावान् वै कामः,' बृ. १–४–१७. २—'तस्मात्तत्सर्वमभवत्,' बृ. १–४–१०.
३—'आत्मा ह्येषां स भवति,' बृ. १–४–१०. ४—बृ. १, ४, १७.
५—पुत्रैषणा व वित्तैषणा साधनरूप आहेत, आणि लोकैषणा साध्यरूप आहे. संतति व संपत्ति हींच लौकिक कृतार्थतेचीं साधनें आहेत. ६—'निवीतं मनुष्याणाम्.' देवांच्या कर्मांत डाव्या खांद्यावरून उजवीकडे जानवें करितात, त्याला उपवीति ह्मणतात. मनुष्यांच्या कर्मांत गळ्यावरून जानवें लोंबतें ठेवितात त्याला निवीति ह्मणतात. पितरांच्या कर्मांत उजव्या खांद्यावरून डावीकडे असतें, त्याला प्राचीनावीति ह्मणतात. ७—'अथ परिव्राड्विवर्णवासा मुण्डोऽपरिग्रहः' जाबाल.

पूर्वपक्ष—( कर्मांतून वगैरे ) उठून भिक्षावृत्ति पाळितात, असें वर्तमानकालवाचक क्रियापद घातल्यामुळें वरील श्रुति अर्थवादरूप आहे. लिङ् ( विधिवाचक ), लोट् ( आज्ञावाचक ), किंवा तव्य ( आवें-रीतिवाचक ) यांपैकीं कोणताही विधान करणारा प्रत्यय ( क्रियापदांत ) नाहीं; ह्मणून केवळ अर्थवादरूप श्रुतीनें श्रुतिस्मृतिविहित यज्ञोपवीतादि साधनें टाकविणें शक्य नाहीं. 'यज्ञोपवीत असेल त्यानेंच अध्ययन, यजन किंवा याजन करावें' ( अशी आज्ञा आहे. ) संन्यासाश्रमामध्यें तर अध्ययन विहित आहे. 'वेद टाकून दिला तर शूद्र होतो ह्मणून वेद टाकूं नये,' असें ( वचन आहे, ) आणि वार्णीना 'वेदाध्ययनांतच लावतो,' असें आपस्तम्ब (ऋषि) ह्मणतो. "वेदत्याग, वेदनिंदा, खोटी साक्ष, मित्रहत्या, निंद्यान्नभक्षण, निंद्यपान हीं सहा सुरापानाप्रमाणें आहेत," असा वेदत्यागाचा दोष सांगितला आहे. गुरूंची, वृद्धांची, किंवा अतिथींची उपासना करितांना, होम, जप, जेवण, आचमन, आणि वेदाध्ययन हीं करितांना, यज्ञोपवीतयुक्त असावें, असें ( वचन आहे; ) व संन्याश्याच्या धर्मांत गुरूपासना, वेदाध्ययन, जेवण, आचमन वगैरें कर्में श्रुतिस्मृतींत कर्तव्यरूपानें विहित आहेत; ह्मणून गुरूपासनावगैरेचें अंग ह्मणून यज्ञोपवीत आवश्यक आहे; ह्मणून त्याचा त्याग मनांत सुद्धां आणणें शक्य नाहीं. जरी एषणांपासून उठावें, अशी आज्ञा आहे; तरी पुत्रैषणा वगैरे तीनच एषणांपासून उठणें ( सांगितलें आहे ); पण सर्व कर्मांतून आणि कर्मसाधनांतून उठून जाणें ( सांगितलें ) नाहीं. सर्वांचा परित्याग केला, तर जें श्रुति सांगत नाहीं, तें केल्यासारखें होईल; आणि यज्ञोपवीतादिक श्रुतींत सांगितलें आहे, तें टाकल्यासारखें होईल; तसें केल्यानें विहित कर्म न करणें, व प्रतिषिद्ध कर्म करणें, हा मोठा अपराध केलासा होईल; ह्मणून यज्ञोपवीतादिक चिन्हें टाकणें, ही केवळ अंधपरंपराच आहे.

उत्तरपक्ष—( हें ह्मणणें बरोबर ) नाहीं; कारण, 'यज्ञोपवीत आणि वेद सर्व कांहीं संन्याश्यानें वर्ज करावें,' अशी श्रुति आहे. शिवाय ( ह्या ) सर्व उपनिषदाज्ञा आत्मज्ञानविषयक आहेत. "आत्मा पहावा, ऐकावा, ( व त्याचें ) मनन करावें," असें सांगण्याचा मुख्यत्वें आरंभ आहे; आणि तो आत्मा प्रत्यक्ष, समक्ष, सर्वांतर, व अशनायादिक संसारधर्मांपासून निराळा आहे, असा जाणावा, हें तर प्रसिद्ध आहे. हें एकंदर उपनिषद् अशा अर्थाचें असल्यामुळें, तें अन्य विधींचें अंग नाहीं, ह्मणून तें अर्थवादरूप नाहीं; कारण आत्मज्ञान कर्तव्य आहे, आणि आत्मा अशनायादिकांनीं युक्त नव्हे ह्मणून साधनें व फलें ह्यांहून भिन्न आहे, असें जाणावें. ह्मणून ( कर्में, साधनें, व फलें ह्यांशीं ) आत्मा एकरूप आहे असें समजणें, ही अविद्या होय. 'तो निराळा व मी निराळा आहें,'[2] 'तो जाणत नाहीं,' '( एका ) मृत्यूंतून ( दुसऱ्या ) मृत्यूंत प्राप्त होतो[3],' जो इहलोकीं वस्तु पृथक् पृथक् असल्याप्रमाणें पाहतो,[4] 'एकरूपानेंच पहावें,'[5] 'एकच अद्वितीय,'[6] 'तें तूं आहेस,'[7] इत्यादि श्रुतींवरून क्रिया, फल, आणि

---

१—'यज्ञोपवीतं वेदांश्च सर्वं तद्वर्जयेद्यतिः' कठश्रुति ४. २—'अन्योऽसौ अन्योऽहमस्मीति' 'न स वेद' १-४-१० ३—'मृत्योः स मृत्युमाप्नोति.' ४-४-१९ ४—'य इह नानेव पश्यति.' ४-४-१९ ५—'एकधैवानुद्रष्टव्यम्,' ४-४-२० ६—'एकमेवाद्वितीयं. छां.' ६-२-१ ७—'तत्वमसि. छां.' ६-८-७; ६-९-४; ६-१०-३. वगैरे.

साधन हीं अशनायादिक संसारधर्मांपलीकडे असणाऱ्या आत्म्याहून भिन्न असून अविद्येपैकीं आहेत, ( असें सिद्ध होतें ). 'जेव्हां द्वैत भासतें,' 'तो निराळा व मी निराळा आहे,' ( ह्मणतो ) 'तो जाणत नाहीं,' 'पण याहून भिन्न रीतीनें जे जाणतात' अशा शेकडों श्रुतीवरून ( ही साधनफलानां अविद्याविषयत्व आहे. )

विद्या व अविद्या ( ज्ञान व अज्ञान ) एका पुरुषाला एके वेळीं असत नाहींत; कां तर, त्यांचा अंधार आणि प्रकाश ह्यांप्रमाणें ( परस्पर ) विरोध आहे; ह्मणून अविद्येपैकीं क्रिया, साधनें, व फलें वगैरेंचा आत्मज्ञान्याला अधिकार नाहीं, असें समजावें. कर्में करणारा "तो मृत्युंतून मृत्यप्रत जातो" इत्यादि श्रुतींनीं ( कर्माची ) निंदा केली आहे. सर्व क्रिया, साधनें, व फलें हीं अविद्येपैकीं आहेत. त्यांशीं आत्मविद्येचा विरोध असल्यानें तीं टाकणें इष्ट आहे. यज्ञोपवीतादिक साधनेंही अविद्येपैकींच आहेत; ह्मणून साधनफलरूप आत्मा नसल्यानें अविद्येपैकीं ( आत्म्याहून ) भिन्न असलेल्या एषणा त्यास विरुद्ध आहेत. साधनें व फलें हीं दोन्हीं एषणारूपच आहेत. यज्ञोपवीतादिक व त्यांनीं साधणारीं कर्में हीं ( फलांचीं ) साधनेंच आहेत. '( साधनें व फलें ) हीं दोन्हीं एषणारूपच आहेत' या हेतुदर्शक वाक्यावरून हाच निश्चय होतो कीं, यज्ञोपवीतादि साधनें व तत्साध्य कर्में अविद्याविषय असल्यानें, एषणारूप असल्यानें, आणि ह्मणून टाकून देण्याजोगीं असल्यानें, त्यांपासून उठण्याचा विधि सांगणें इष्टच आहे.

( हें ) उपनिषद्, आत्मज्ञानाविषयीं उठून जाण्याबद्दलची श्रुति, (आत्मज्ञानाच्या) स्तुती ऐवजीं घ्यावी, आज्ञार्थी घेऊं नये, ( असें ह्मणतां येत ) नाहीं. कारण विज्ञानविधि व व्युत्थानविधि एकाच कर्त्याला सांगितला आहे. जी गोष्ट करावयाची नाहीं ती, व जी गोष्ट करावयाची ती, ह्या दोहोंचा कर्ता एक असें वेदांमध्यें कधींही असण्याचा संभव नाहीं. सोमरस काढणें, होम करणें, खाणें, हीं कर्तव्यें सांगतांना जसें 'सोमाचा रस काढून होम करून खातात' असें वाक्य वेदांत येतें, त्याप्रमाणेंच आत्मज्ञान, एषणांतून उठून जाणें, भिक्षावृत्ति अवलंबिणें, या कर्तव्यांचाच श्रुतिमध्यें एक कर्ता संभवेल.

( यज्ञोपवीतादिक ) अविद्येपैकीं आहेत, व एषणारूप आहेत, आणि आत्मज्ञान विहित आहे; त्यावरून यज्ञोपवीतादिकांचा त्याग अर्थप्राप्त होतो, पण विहित नाहीं, असें ह्मणाल तर तसें नाहीं; का तर, यज्ञोपवीतादिकाचा त्याग आत्मज्ञान विधीबरोबरच एका कर्त्याला सांगितलेला आहे, त्यामुळें ( यज्ञोपवीतादित्यागांचें ) चांगलें दृढीकरण होतें. तसेंच भिक्षाचर्यचेंही दृढीकरण होतें.

( भिक्षावृत्ति धरितात असें ) वर्तमानकाळीं क्रियापद घातल्यानें तो फक्त अर्थवाद (स्तुति) आहे, असें जें तुह्मीं ह्मटलें, तें योग्य नाहीं. उंबराच्या झाडाचा यूप ( यज्ञस्तंभ ) असतो वगैरे विधीप्रमाणेंच हाही विधि असल्यामुळें येथें वर्तमानकाळ घातला आहे, तो दोष नाहीं.

---

१—'यत्र हि द्वैतमिव भवति.' २–४–१४ २—'अथ येऽन्यथाऽतो विदुः' ३—"मृत्योः स मृत्युमाप्नोति" बृ. ४–४–१९.

( एषणांतून ) उठून भिक्षावृत्ति धरतात, या वाक्यानें संन्यास सांगितला आहे, व संन्यासाश्रमामध्यें यज्ञोपवीतादि साधनें व चिन्हें श्रुतींनीं आणि स्मृतींनीं विधिरूपानें सांगितलीं आहेत, ह्मणून तीं एषणारूप असलीं तरी वगळून इतर एषणांतून उठावें, असें ह्मणालें, तर तसें नाहीं. एकाच कर्त्यानें आत्मज्ञान मिळविणें, व एषणांतून उठून जाणें, ह्या संन्यासाहून निराळा ( आश्रम ) संन्यास असावा, असें ह्मणणें योग्य होईल; कारण, एषणांतून उठून जाण्याचा जो संन्यास, तो आत्मज्ञानांगभूत आहे. तो आत्मज्ञानाला विरुद्ध असलेल्या एषणा टाकण्याच्या स्वरूपाचा आहे, व एषणा अविद्यामय आहेत. ह्या ( आत्मज्ञानांगसंन्यासा ) हून निराळा आश्रम-संन्यास आहेच. ( तो ) ब्रह्मलोकादि फळें प्राप्त करून देण्यास साधनीभूत होतो, आणि त्या संन्यासाच्या संबंधानें यज्ञोपवीतादि साधनें, व ( त्रिदण्डादि ) चिन्हें धारण करणें ( श्रुति-स्मृतींनीं ) सांगितलेलें आहे.

एषणारूप साधनांचा स्वीकार निराळ्या आश्रमसंन्यासात संभवत असतां, सर्व उपनिषदांनीं आज्ञापिलेल्या आत्मज्ञानाला बाध आणणें ( हेंही ) योग्य नाहीं. अविद्यामय एषणारूप यज्ञोपवीतादि साधनें घेण्याची इच्छा ठेविली असतां, जो साधनरूप नव्हे अशा, व अशनायादि संसारधर्म ज्यांस नाहींत अशा ( आत्म्या ) चें, मी ब्रह्म आहे, असें जें ज्ञान, त्यास खचित बाध येईल; आणि त्या आत्मज्ञानाला बाध आणणें योग्य नाहीं; कां तर, सर्व उपनिषदें ( आत्मज्ञान-रूप ) पुरुषार्थपर आहेत.

' भिक्षावृत्ति धरितात ' ही श्रुति ( निदान भिक्षावृत्तीपुरती ) एषणा गळ्यांत बांधिते, त्यावरून स्वतःच बाध आणते, असें ह्मणाल तर; आणि एषणांतून उठावें असें सांगून पुन्हा एषणे-पैकीं एक ( भिक्षावृत्ति हा ) अंश ठेवावा असें सांगणारी श्रुति, त्या ( भिक्षावृत्तीशीं ) संबंध असलेलें दुसरेंही ( यज्ञोपवीतादिक ) घ्या ह्मणतेच, असें ह्मणाल तर, तसें नाहीं. होम केल्या-नंतरचें ( शिलकी पुरोडाशाचें ) ( नवा पुरोडाश तयार करण्याला कारण होत नाहीं, ) त्या प्रमाणें भिक्षावृत्ति यज्ञोपवीतादिकाला कारणीभूत होत नाहीं. तें ( होमशेषभक्षण किंवा भिक्षा-वृत्ति ) उरलेल्याची ( होमद्रव्याची किंवा आयुष्याची ) व्यवस्था लावण्यासाठीं आहे; ह्मणून ( यज्ञोपवीतादिकांस ) कारणीभूत होत नाहीं; आणि ( भिक्षावृत्तीपासून कर्त्यावर ) कांहीं संस्कार होत नाहीं. भक्षणापासून पुरुषावर कांहीं संस्कार तरी होईल, पण भिक्षावृत्तीपासून ( कांहींच संस्कार होत नाहीं. ) भिक्षावृत्तीच्या नियमापासून त्याचें कांहीं अदृष्ट फल ( पुण्य ) असलें तरी त्या फलाची ब्रह्मवेत्त्याला इच्छा नसते.

भिक्षावृत्तीच्या नियमाच्या अदृष्ट फलाची त्याला इच्छा नाहीं तर भिक्षावृत्ति कशाला १ असें ह्मणाल तर ( तें ह्मणणें योग्य ) नाहीं; कारण ( अविद्येपैकीं ) दुसऱ्या ( सर्व ) साधना-पासून उठावें, असें सांगितलें आहे. ( भिक्षावृत्तीविषयीं आज्ञा आहे ) ती तरी काय ह्मणून १ असें ह्मणाल तर, त्याशिवाय चालेल तर ठीक आहे. तें आह्मांस कबूल आहे.

---

१—हा पक्ष शंकराचार्यांच्या मंडळीपैकींच कोणाचा तरी आहे.

२—आत्मज्ञानानें सर्व गोष्टींची निवृत्ति होते, भिक्षा मागण्याचेंहि कारण नाहीं, हें आह्मास कबूल आहे; असें ह्मणण्याचा आचार्यांचा अभिप्राय आहे.

संन्याससंबंधानें ' यज्ञोपवीत धारण करून स्वाध्याय करावा, ' वगैरे जीं वचनें सांगितलीं आहेत, तीं अविद्वानानें केवळ आश्रमसंन्यास कसा करावयाचा ह्याविषयीं आहेत, असें ( घेतलें ह्मणजे तीं वचनें आत्मज्ञानांगभूत संन्यासाविषयीं ) नाहींत. असें न घ्यावें तर आत्मज्ञानाला बाध येईल असें सांगितलें.

" ज्याला कांहीं इच्छा नाहीं, जो कोणताच उद्योग करीत नाहीं, जो नमस्कार करीत नाहीं, स्तुति करीत नाहीं, ज्याचीं कर्मे सुटलीं आहेत, पण जो क्षीण नसतो, देव त्याला ब्राह्मण समजतात, " हें स्मृतिवचन विद्वानाला कोणतेंच कर्म नसतें असें दाखवितें. " विद्वान् चिन्हरहित असतो. " " तो धर्मज्ञ, त्यामुळें खुणारहित असतो." असेंही आहे. याकरितां ( एषणांतून ) उठणें ज्यांत आहे असा परमहंस संन्यास आत्मवेत्त्यानें घ्यावा, ह्मणजे त्यांत सर्व कर्मे व साधनें ह्यांचा परित्याग होतो.

ज्या अर्थी पूर्वीचे ब्राह्मण साधनें व फळें ज्याला नाहींत अशा आत्म्याला जाणून सर्व साधनफलरूप एषणारूप ( संसारांतून ) उठून भिक्षावृत्ति धरीत असत, व दृष्टफल देणारीं व अदृष्ट फल देणारीं कर्मे व त्यांचीं साधनें टाकून ( देत असत ); त्या अर्थी हल्लीं सुद्धां ब्रह्मवेत्त्या ब्राह्मणानें पांडित्य ह्मणजे आत्मज्ञानरूपी पंडितपणा पूर्णपणें जाणून, समग्र आत्मज्ञान संपादन करून, आचार्योपदेश घेऊन, व श्रुतिस्मृतिज्ञानानें एषणांपासून उठून (जावें). एषणेंतून उठून जाईल, तेव्हां पांडित्याचा कळस होतो; कां तर, तें एषणांशीं विरुद्ध असल्यामुळें एषणांचा तिरस्कार केल्यापासून उत्पन्न होतें. एषणांचा तिरस्कार न केला तर आत्म्याच्या संबंधानें पांडित्य उत्पन्न होत नाहीं. यावरून एषणांतून उठून जाणें आत्मज्ञानपूर्वक विहित आहे. आत्मज्ञानाचा ( व उठण्याचा ) कर्ता एकच हें दाखविणारा ' त्वा ' ( ऊन ) प्रत्यय घेणाऱ्या श्रुतीवरून ( सर्व एषणांतून उठणें ) निश्चित झालें.

करितां एषणांतून उठून बाल्य ह्मणजे ज्ञानाचे बलाचा स्वभाव घेऊन राहण्याची इच्छा करावी. आत्मज्ञानवेत्त्यांहून इतरांना साधनाचा व फलांचा आश्रय करणें हें बल असतें; तें बल टाकून विद्वानानें ज्यांत साधनें नाहींत व फळें नाहींत, असें जें आत्मज्ञानरूप बळ त्याच्या सत्तेचाच आश्रय करावा. त्या बलसत्तेचा आश्रय केला ह्मणजे त्याला इंद्रियें (आत्मज्ञानांतून) काढून एषणाविषयांत घालण्यास समर्थ होत नाहींत. ज्याला ज्ञानबळ नाहीं अशा मूढालाच ज्यांचीं फळें कांहीं दृष्ट व कांहीं अदृष्ट आहेत अशा एषणांमध्यें इंद्रियें घालतात. बल ह्मणजे आत्मविद्येनें एकंदर विषयावर दृष्टि असते, ती लुप्त करून टाकणें. ह्मणून बलसत्तेनें ( बाल्यानें ) राहण्याची इच्छा करावी. अशा अर्थी "आत्म्याच्या योगें बळ प्राप्त होतें" अशी अन्य श्रुति आहे. आणि ' हा आत्मा बलहीनाला मिळत नाहीं. ' ( अशी श्रुति आहे. )

बाल्य व पांडित्य पूर्णपणें संपादन करून मग मनन केल्यानें मुनि ह्मणजे योगी होतो. आणखी हें जें सर्व अनात्मज्ञान लुप्त करणें तें साधून कृतकृत्य योगी व्हावयाचें असतें तेवढेंच ब्राह्मणानें करावें.

---

१—" आत्मना विन्दते वीर्यम् " केन १२.

२—" नायमात्मा बलहीनेन लभ्यः " मुण्ड. ३–२–४.

मौनाभाव ह्मणजे आत्मज्ञानोदय व अनात्मज्ञानाचा लोप यांनाच पांडित्य व बाल्य अशीं अनुक्रमानें नांवें आहेत. तो मौनाभाव पूर्णपणें संपादन करून—व मौन ह्मणजे अनात्मज्ञानाचा पूर्ण लोप करण्याचें फळ तें मौनही पूर्णपणें जाणून—ब्राह्मण कृतकृत्य होतो. सर्व ब्रह्मच आहे असें ज्ञान होतें. तो ब्राह्मण कृतकृत्य झाला ह्मणून ( खरा ) ब्राह्मण ह्मणावा.

त्याला त्या वेळीं औपचारिक ब्राह्मण्य असत नाहीं, ह्मणून ( श्रुति ) ह्मणते कीं, ' तो ब्राह्मण कसा राहतो, कोणता आचार पाळितो ? ' जो आचार ( कोणता तरी आचार ) पाळीत असेल त्या आचारानें तो जसानातसाच, ह्मणजे कोणत्याही आचारानें असला तरी जसानातसाच, ह्मणजे वर सांगितलेल्या लक्षणांनीं युक्त असाच ब्राह्मण होतो. कोणत्याही आचारानें असें स्तुतिकरितां ह्मटलें आहे. वर जी ब्राह्मण्यावस्था सांगितली, तिची स्तुति केली आहे. आचाराविषयीं आदर नाहीं असें नाहीं.

ह्मणून या अशनायादिकांच्या पलीकडे असलेल्या नित्यतृप्त अशा आत्मस्वरूप ब्राह्मण्यावस्थेहून निराळें जें एषणारूप अविद्याविषय अन्य वस्तु आहे, तें आर्त ह्मणजे विनाशी, आर्तीनीं ( पीडांनीं ) व्याप्त, स्वप्नांतील किंवा गारुडांतील वस्तूंप्रमाणें किंवा मृगजळाप्रमाणें असार ह्मणजे मिथ्या आहे. एक शुद्ध आत्मा मात्र नित्यमुक्त आहे, असें ( याज्ञवल्क्यानें ह्मटलें ). नंतर कुषीतकपुत्र कहोल स्तब्ध राहिला.

**अध्याय ३, ब्राह्मण ५ समाप्त.**



# गार्गीब्राह्मण.

## अक्षर ( क्षय न पावणारें तत्व )

## अध्याय ३, ब्राह्मण ६.

**ऋचा १—मग त्या ( याज्ञवल्क्याला ) वाचक्नवी गार्गीनें प्रश्न केला. हे याज्ञवल्क्या, अशी हाक मारून म्हणाली. जें सर्व उदकामध्यें ( आडवें उभें ) ओंवलेलें व भरलेलें आहे, ( तें ) काय ? पण उदक कोणत्या वस्तूमध्यें ( आडवें उभें ) गोंवलेलें आहे ? हे गार्गी, वायूमध्यें. वायु कशांत ( आडवा उभा ) गोंवलेला आहे ? गार्गी, अंतरिक्षलोकांत. अन्तरिक्ष लोक कशांत गोंवले आहेत ? गार्गी, गन्धर्वलोकांत. गन्धर्वलोक कशांत गोंवलेले आहेत ? गार्गी, आदित्यलोकांमध्यें. आदित्यलोक कशांत गोंवलेले आहेत ? गार्गी, चंद्रलोकांमध्यें. चंद्रलोक कशांमध्यें गोंवलेले आहेत ? गार्गी, नक्षत्रलोकांत. नक्षत्र लोक कशांत गोंवलेले आहेत ? गार्गी, देवलोकांत. देवलोक कशांमध्यें गोंवलेले आहेत ? गार्गी, इंद्रलोकांत. इंद्रलोक कशांत गोंवलेले आहेत ? गार्गी, प्रजापतिलोकांत. प्रजापतिलोक कशांत गोंवलेले आहेत ? गार्गी, ब्रह्मलोकांत. ब्रह्मलोक कशांत गोंवलेले आहेत ? याज्ञवल्क्य ह्मणाला, हे गार्गी, जास्ती विचारूं नकोस. तुझा मस्तक तुटून न पडो. ज्या देवतेविषयीं जास्ती प्रश्न विचारूं नये, त्या देवतेविषयीं जास्ती विचारतेस. गार्गी जास्ती प्रश्न करूं नकोस. मग गार्गी वाचक्नवी स्तब्ध झाली.**

भाष्य—तें ब्रह्म प्रत्यक्ष व समक्ष असून सर्वांतर आत्मा होय, असें सांगितलें, त्या सर्वान्तर आत्म्याच्या स्वरूपज्ञानाकरितां शाकल्यब्राह्मणापर्यंत ग्रंथ आहे. पृथिवी आदिकरून आकाशापर्यंत भूतें आहेत तीं आंतलें बाहेरचें ह्या स्वरूपानें ठेविलेलीं आहेत, त्यांपैकीं बाहेरचें बाहेरचें जाणून, तें दूर करून पाहणाराचा प्रत्यक्ष सर्वान्तर मुख्य आत्मा सर्व संसारधर्मांपासून पूर्ण मुक्त झालेला दाखवावयाचा आहे, ह्मणून ( या ब्राह्मणाचा ) आरंभ केला आहे.

मग त्या ( याज्ञवल्क्या ) ला गार्गी नांवाची वचक्नूची कन्या इनें प्रश्न केला. 'याज्ञवल्क्या,' अशी हाक मारून बोलली. हें जडधातुरूप सर्व पृथिवीमय ( जगत् ) उदकामध्यें ' ओत " ह्मणजे कापडाच्या लांब ( उभ्या ) दोऱ्याप्रमाणें ओंवलेलें, आणि ' प्रोत " ह्मणजे आडव्या दोऱ्याप्रमाणें भरलेलें आहे; किंवा ( त्या शब्दांचा ) ह्याच्या उलट ( अर्थ घ्यावा ). चोहोंकडून आंतबाहेर असलेल्या उदकांनीं व्याप्त केलेलें आहे. असा ( ओतप्रोत यांचा ) अर्थ समजावा. असें नसतें तर सातूच्या ( मूठभर ) पिठाप्रमाणें उधळून गेलें असतें. हें ( गार्गीचें विचारणें

---

१—गार्गीब्राह्मण, उद्दालक ब्राह्मण, व दुसरें गार्गीब्राह्मण या तीन ब्राह्मणांनंतर शाकल्य ब्राह्मण आहे. गार्गी स्त्री असून तिची मोठ्या आचार्यांत गणती होत आहे.

व याज्ञवल्क्याचें सांगणें ) अनुमान ( वाक्य ) मांडावें तसें आहे. जें कांहीं ( जगामध्यें ) कार्यरूप परिछिन्न (मर्यादित), स्थूल असतें तें ( क्रमानें ) कारणरूप, अपरिच्छिन्न (अमर्यादित), सूक्ष्म पदार्थ यांनीं व्याप्त असतें, असें पाहिलें आहे; उदाहरण पृथिवी उदकानें व्याप्त आहे. याप्रमाणें ( वरील ब्राह्मणांतील ) पूर्व पूर्व वस्तु पुढच्या पुढच्या व्यापक वस्तूनें (व्याप्त) असली पाहिजे. हा ( सिद्धांत ) सर्वान्तर आत्म्यापर्यंत लागू आहे असा (गार्गीच्या) प्रश्नाचा अर्थ आहे.

त्यांत ( असा अर्थ घेतला ह्मणजे ) पंचमहाभूतेंच पुढील पुढील ( गंधर्व लोकादिक ) सूक्ष्म, व्यापक, व कारणरूपानें व्याप्त होऊन एकत्र असतात, ( हें सहज ध्यानांत येईल ). आणि परमात्म्याच्या अलीकडे परमात्मव्यतिरिक्त इतर वस्तु असते असें नाहीं; कां तर "सत्यांचें सत्य (तो आहे)" अशी श्रुति आहे. भूतपंचक हें सत्य; त्या सत्याचें सत्य परमात्मा आहे.

'उदक कोणत्या वस्तूंमध्यें गोंवलेलें आहे ?' उदक हें कार्यरूप स्थूल व परिच्छिन्न (मर्यादित ) असल्यामुळें कोठें तरी गोंवलेलें असलें पाहिजे, तें कोठें गोंवलेलें आहे. याप्रमाणेंच पुढील पुढील प्रश्नांचें उपपादन करावें. 'हे गार्गी, वायूमध्यें' हें काय ? अग्नींत ( गोविलें ) आहे असें ह्मणावयाला पाहिजे होतें. पण ह्यांत दोष नाहीं; कांतर, अग्नीला पार्थिव किंवा उदकमय धातूमध्यें ( साकार पदार्थांमध्यें ) आश्रय करून रहावें लागतें; इतर भूतांप्रमाणें अग्नि स्वतंत्रपणें विद्यमान नसतो; ह्मणून त्यांत कांहीं गोंविलें आहे, असें सांगितलें नाहीं.

'वायु कशांत गोंवलेला आहे ? गार्गी, अंतरिक्षलोकांत.' पंचमहाभूतें एकत्र होऊन अंतरिक्षलोक झाले. तींच भूतें गंधर्वलोकांत; गंधर्वलोक, आदित्यलोकांत; आदित्यलोक चंद्रलोकांत; चंद्रलोक नक्षत्रलोकांत; नक्षत्रलोक देवलोकांत; देवलोक इंद्रलोकांत; इंद्रलोक विराट्शरीराला कारण जीं भूतें तद्रूप प्रजापतिलोक त्यांत ;प्रजापतिलोक, ब्रह्मलोकांत; ब्रह्मलोक ह्मणजे ब्रह्मांडाला आरंभ करणारीं ( सूक्ष्म ) भूतें सर्व ठिकाणीं एकापेक्षांएक अधिक सूक्ष्म अशा क्रमानें प्राण्यांच्या उपभोगाला आश्रयरूप झालेलीं ( महा ) भूतेंच एकत्र झालीं आहेत. आणि तींच पांच आहेत ह्मणून प्रत्येक लोकाचें बहुवचन घेऊन वर्णिलीं आहेत.

ब्रह्मलोक कशांत गोंवलेले आहेत ? याज्ञवल्क्य ह्मणाला, हे गार्गी, जास्ती विचारूं नकोस. न्यायसरणीच्या पलीकडे जाऊन ज्या देवतेविषयीं ( केवळ ) श्रुतिप्रमाण विचारावयाचें, त्या देवतेविषयीं अनुमानपद्धतीनें विचारूं नकोस, असा ( याज्ञवल्क्याचा ) अभिप्राय समजावा. ( तूं ही गोष्ट अशा रीतीनें ) विचारशील तर तुझा मस्तक प्रत्यक्ष पडेल. गार्गीनें देवतेविषयीं प्रश्न केला तो श्रुतीनेंच कळणारा आहे. ( गार्गीच्या ) प्रश्नसरणीपलीकडचा तो गार्गीचा प्रश्न होय. कांतर, त्याला आनुमानिक स्वरूप दिलें. ( शेवटला ) तो प्रश्न ज्या देवतेच्या संबंधानें होता ती देवता, अतिप्रश्न्या ( जास्ती प्रश्नाला योग्य ) नव्हे, अनतिप्रश्न्या ( ह्मणजे अनुमानानें प्रश्न करण्यास योग्य नव्हे ); श्रुतीनेंच प्रश्न करण्याजोगी; केवळ श्रुतीनेंच समजण्याजोगी होय--असा अभिप्राय समजावा. त्या अनतिप्रश्न्य देवतेबद्दल तूं अतिप्रश्न करतेस, ह्या करितां हे गार्गी, तुला मरण्याची इच्छा नसेल तर असा अतिप्रश्न करूं नकोस, असें ह्मटल्यावरून वाचक्नवी गार्गी स्तब्ध झाली.

**अध्याय ३ ब्राह्मण ६ समास.**

१—आपला लोक पंचमहाभूतात्मक आहे. गंधर्वादिलोक पञ्चमहाभूतांहून भिन्न आहेत, असा अल्पज्ञांस भास होतो तो खोटा आहे. २—'सत्यस्य सत्यं' बृह.२-१-२० मैत्री. ६-३२.

# उद्दालक ब्राह्मण.

## अन्तर्यामी.

## अध्याय ३, ब्राह्मण ७.

ऋचा १—त्यानंतर त्याला आरुणी उद्दालकानें प्रश्न केला. हे याज्ञवल्क्या, अशी हाक मारून ह्मणाला. आम्ही मद्रदेशांत कपिगोत्री पतञ्चलऋषीच्या घरीं यज्ञ ( विधीचें ) अध्ययन करून रहात होतों. त्या ऋषीची बायको गन्धर्वानें झडपलेली होती. त्या गन्धर्वाला आम्हीं प्रश्न केला कीं, तूं कोण आहेस ? तो म्हणाला मी अथर्वणाचा पुत्र कबंध आहे. तो काप्य पतञ्चलाला व आम्हा याज्ञिकांस ह्मणाला, काप्या, ज्या सूत्रानें हा लोक व परलोक आणि सर्व भूतें बांधलेलीं आहेत, तें सूत्र तूं जाणतोस काय ? काप्य पतञ्चलानें उत्तर दिलें, हे मान्य पुरुषा, मी तें जाणत नाहीं. त्यानें काप्य पतञ्चलाला व याज्ञिकांना भाषण केलें कीं, अरे, काप्या, तूं जो अन्तर्यामी पुरुष ह्या लोकांचे व परलोकांचे व सर्वभूतांचे आंत राहून नियंत्रण करितो, त्याला जाणतोस काय ? काप्य पतञ्चलानें उत्तर दिलें, हे मान्य पुरुषा, मी त्याला जाणत नाहीं. त्यानें काप्य पतञ्चलाला व आह्मां याज्ञिकांना ( पुनः ) असें ह्मटलें कीं, हे काप्या, जो कोणी तें सूत्र व तो अन्तर्यामी जाणील तो ब्रह्मवेत्ता, लोकवेत्ता, देवज्ञानी, वेदज्ञ, तो भूतज्ञ, आत्मज्ञानी तो सर्वज्ञ असें त्यांना ( गन्धर्वानें ) सांगितलें, तें ( सूत्र वगैरे ) मी जाणतों. याज्ञवल्क्या, तूं तें सूत्र जाणत नसल्यास व तो अन्तर्यामी जाणत नसतां ब्राह्मणांच्या गायी नेत असलास, तर तुझा मस्तक पडेल. याज्ञवल्क्यानें उत्तर दिलें, गौतमा, मी तें सूत्र व तो अन्तर्यामी खचित जाणत आहे. ( गौतम ह्मणतो ) हें मी जाणतों जाणतों असें कोणीही ह्मणेल ? जसें जाणत असशील, तसें सांग.

भाष्य—आतां ब्रह्मलोकांच्या अगदीं आंत असणारें सूत्र सांगावयाचें आहे; त्याकरितां ( पुढील ग्रंथाचा ) आरंभ आहे. तें श्रुतिरूपानेंच विचारावयाचें ह्मणून इतिहासरूपानें श्रुतीचा आरंभ केला आहे. 'त्यानंतर त्याला' अरुणाचा पुत्र 'आरुणी उद्दालक' नांवाच्या ( ऋषीनें ) प्रश्न केला. याज्ञवल्क्या, अशी हांक मारून ह्मणाला, मद्रदेशामध्यें आह्मीं रहात होतों. कपिगोत्री पतञ्चल नांवाच्या ऋषीच्या घरीं यज्ञशास्त्र अध्ययन करीत होतों. 'त्या ऋषीची बायको गन्धर्वानें झडपलेली होती.' ( तिच्या अंगांत येणाऱ्या ) त्या गन्धर्वाला आह्मीं प्रश्न केला कीं, तूं कोण आहेस ? तो ह्मणाला मी अथर्वणाचा पुत्र आथर्वण कबन्ध नांवाचा आहे.

---

१—मद्रास व त्या इलाख्यांतील कांहीं भागाला मद्रदेश ह्मणत असत.

'तो' गंधर्व 'काप्य पतंचलाला आणि आह्मां याज्ञिकांस' त्याच्या शिष्यांस 'ह्मणाला'—
—अरे काप्या, तें सूत्र तूं जाणतोस काय? तें कोणतें? ज्या सूत्रानें हा लोक ह्मणजे हा जन्म, व परलोक ह्मणजे अन्य जन्म, पुढें मिळवावयाचा तो, व ब्रह्मापासून तृणापर्यंत सर्व भूतें बांधलेलीं, ह्मणजे एक ठिकाणीं दोऱ्यानें माळ गुंफलेली असते त्याप्रमाणें, गुंफलेलीं (ह्मणून) स्थिर राहणारीं आहेत, तें सूत्र तूं जाणतोस काय? हा प्रश्न केल्यावरून त्या काप्यानें उत्तर दिलें कीं, 'हे मान्य पुरुषा,' 'मी तें' सूत्र 'जाणत नाहीं.' पूज्य पुरुषा, असें मोठ्या आदरानें ह्मटलें.

मग तो गन्धर्व काप्य गुरूला व आह्मांस ह्मणाला, अरे काप्या, तूं तो अन्तर्यामी जाणतोस काय? अन्तर्यामी (शब्दाचा) विशेष खुलासा असा केला कीं, जो ह्या लोकास व परलोकास व सर्व भूतांस आंत राहून नियंत्रण करितो तो; लांकडी यंत्राप्रमाणें फिरवितो तो; व ज्याचा त्याजकडून आपआपला योग्य व्यापार करवितो तो; याप्रमाणें प्रश्न केला, तेव्हां काप्य पतंचल परमादरानें महाराज, असें ह्मणून, मला ठाऊक नाहीं असें ह्मणाला.

त्यानंतर गन्धर्वानें भाषण केलें (तें), सूत्र व तदंतर्गत अन्तर्यामी यांच्या ज्ञानाच्या स्तुतीदाखल आहे. जो कोणी, हे काप्या, तें सूत्र जाणील व सूत्रान्तर्गत त्या सूत्राचें नियमन करणारा अन्तर्यामी आहे त्यास जाणील,—तशा प्रकारानें जो (कोणी) जाणील—तो ब्रह्मज्ञानी ह्मणजे परमात्मज्ञानी. तो पृथिवी आदिकरून (जे) लोक अन्तर्यामीनें नियंत्रित केले आहेत, त्यांस जाणतो; तो देवांस ह्मणजे त्या त्या लोकांत राहणारे अग्न्यादिक देवांस जाणतो; सर्वांस प्रमाणभूत जे वेद ते जाणतो; ब्रह्मादिक भूतें सूत्रानें धरलेलीं आहेत; व सूत्रान्तर्गत अन्तर्यामीनें नियंत्रित झालीं आहेत, तीं जाणतो; तो कर्तृत्वभोक्तृत्वगुणयुक्त आत्म्याला त्याच अंतर्यामी आत्म्यानें नियंत्रित केलें आहे, असें जाणतो; सर्व जग तसेंच नियंत्रित झालेलें आहे, असें जाणतो. ह्याप्रमाणें स्तविलेल्या सूत्र व अन्तर्यामी यांच्या ज्ञानाविषयीं अत्यंत लोभ उत्पन्न होऊन काप्य व आह्मीं त्या गंन्धर्वाच्या समोर बसलों; तेव्हां गंन्धर्वानें सूत्र व अन्तर्यामी (ह्यांचें स्वरूप) आह्मांस सांगितलें. तें सूत्र आणि अन्तर्यामी यांचें ज्ञान गंन्धर्वाच्या सांगण्यावरून मला झालें आहे.

याज्ञवल्क्या, तें सूत्र व तो अन्तर्यामी तूं जाणत नसलास तर, व ब्रह्मवेत्ता नसून ब्रह्मवेत्त्याकरितां ठेवलेल्या गायी अन्यायानें नेत असलास तर, त्या अन्यायाकरितां माझ्या शापानें तुझें भस्म होऊन, तुझें मस्तक देखत देखत खालीं पडेल. असें बोलल्यावरून याज्ञवल्क्य उत्तर देतो कीं, हे गौतमगोत्रोत्पन्ना, जें गन्धर्वानें तुह्मांस सांगितलें तें सूत्र, आणि ज्या अंतर्यामी पुरुषाचें ज्ञान गन्धर्वापासून तुह्मांस झालें तो अंतर्यामी, मी जाणतों. असें ह्मटल्यावर गौतमानें प्रत्युत्तर केलें कीं, आत्मश्लाघा करणारा कोणीही अज्ञानी मनुष्य तूं ह्मटल्याप्रमाणें ह्मणेल; कसें तर, मी जाणतों, जाणतों. ती बडबड ऐकून काय करावयाचें? (कृतीनें) दाखीव. तुला जसें ठाऊक असेल तसें बोलून दाखीव.

ऋचा २—त्यानें उत्तर दिलें, गौतमा, वायूच तें सूत्र होय. गौतमा, वायुरूप सूत्रानेंच हा लोक, परलोक, व सर्व भूतें संग्रथित आहेत. त्या करितांच गौतमा, (वायु

**निघून गेल्यावर ) पुरुषाला प्रेत ( गेला ) ह्मणतात. त्याचीं अंगें अस्ताव्यस्त ( ढिलीं ) होतात; कारण, गौतमा, वायुरूपसूत्रानें ( अंगें ) बांधलेलीं असतात. याज्ञवल्क्या, असेंच हें. ( आतां ) अंतर्यामी सांग.**

भाष्य—त्या याज्ञवल्क्यानें उत्तर दिलें. ह्लीं जशी उदकांत पृथिवी गोंवलेली आहे, त्याप्रमाणें ज्यांत ब्रह्मलोक गोंवलेले आहेत, तें श्रुतीनें कळणारें सूत्र सांगावयाचें आहे त्यासाठीं निराळा प्रश्न केला. ह्मणून त्याचा निर्णय करण्याकरितां ( याज्ञवल्क्य ) ह्मणतो, गौतमा, तें सूत्र वायूच होय; दुसरें कांहीं नाहीं. वायु ह्मणजे–आकाश ज्याप्रमाणें पृथिव्यादिकांस धरून आहे त्याप्रमाणें. एक सूक्ष्म तत्व आहे. आणि तद्रूप सतरा[1] प्रकारांचा लिंग ( देह असतो ). त्यांत प्राण्यांच्या कर्मवासना राहतात, असें जें समष्टिव्यष्टिरूप आहे, त्याचे बाह्यात्कारी भेद समुद्राचे लाटांप्रमाणें–एकूणपन्नास मरुद्गण आहेत. त्या वायुरूप तत्वाला सूत्र ह्मटलें आहे.

गौतमा ( प्राण ) वायुरूप सूत्रानेंच हा लोक, परलोक, व सर्व भूतें संग्रथित आहेत, ही गोष्ट प्रसिद्ध आहे; आणि लोकांत प्रसिद्धि कशी आहे तर, ज्या अर्थीं वायु सूत्र आहे आणि वायूनें सर्व धरलें आहे, त्या अर्थीं ( च ) गौतमा, पुरुषाला प्रेत ( गेला ) ह्मणतात; ( कारण त्यावेळीं ) त्याचीं सर्व अंगें विस्रस्त ह्मणजे शिथिल ( गळ्हाटलेलीं ) असतात. ( माळेंतील ) दोरा काढला ह्मणजे मणी वगैरे सर्व वस्तु ओंवलेल्या असतात, त्या गळून पडतात, हें पाहिलेंच आहे. त्याप्रमाणें वायु हा दोरा असन त्यांत मण्याप्रमाणें पुरुषाचीं अंगें ओंवलेलीं असतील तर वायु निघून गेला ह्मणजे अंगें शिथिल होणें योग्यच आहे. ह्मणून गौतमा वायुरूप सूत्रानें अंगें बांधलेलीं असतात असा सिद्धांत ( श्रुति ) सांगते.

' याज्ञवल्क्या असेंच हें; ' सूत्र बरोबर सांगितलेंस. आतां त्या सूत्राचेही आंत, त्या सूत्राचें नियमन करणारा अन्तर्यामी आहे तो सांग, असें ह्मटल्यावरून याज्ञवल्क्य सांगतो.

## अंतर्यामीपैकीं आधिदैवत काण्ड.

**ऋचा ३—जो पृथ्वीमध्यें राहतो, पृथ्वीच्या आंत आहे; ज्याला पृथ्वी जाणत नाहीं, ज्याचें पृथ्वी शरीर आहे, जो आंत राहून पृथ्वीचें नियमन करतो; तो हा तुझा अविनाशी आत्मा अन्तर्यामी होय.**

भाष्य—' जो पृथ्वीमध्यें राहतो ' तो अन्तर्यामी. सर्व कांहीं पृथ्वीवर राहतें ह्यामुळें सर्व वस्तूंना अन्तर्यामी शब्द न लागावा ह्मणून ( पुढील ) स्पष्टता केली आहे. पृथ्वीच्या आंत आहे असें ह्मटलें तरी ( पृथ्वीच्या आंत असणारी ) पृथ्वी देवताच अन्तर्यामी, असें होईल, ह्मणून श्रुति ह्मणते—' ज्या ' अन्तर्यामीला ' पृथ्वी ' देवता देखील, मजमध्यें दुसरा कोणी आहे,

---

१—वेदांतसार—पांच प्राण, पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें, मन, व बुद्धि मिळून सतरा तत्वांचा, लिंगदेह बनतो.

आनंदगिरि—पंचभूतें, दहा बाह्येंद्रियें, प्राण, व अंतःकरण.

असें ‘ जाणत नाहीं, ’ ‘ ज्याचें पृथ्वी शरीर ’ ह्मणजे पृथ्वी हेंच शरीर आहे, दुसरें नाहीं. पृथ्वी देवतेचें जें शरीर तेंच ज्याचें शरीर. शरीर शब्द दिग्दर्शनाकरितां आहे–ह्मणजे, पृथ्वीचीं जीं इंद्रियें तींच त्याचीं इंद्रियें; पृथ्वी देवतेचें जें शरीर व जीं इंद्रियें तीं पृथ्वीच्या कर्माचीं फळें आहेत; तींच ह्याचीं ( अंतर्यामीचीं ); कां तर, अन्तर्यामी स्वतः अक्रिय ( कर्म न करणारा ) नित्यमुक्त आहे. इतरांचें हित करावें असा त्याचा स्वभाव आहे, ह्मणून इतरांचें जें शरीर व इंद्रियें तींच त्याचीं. त्याला स्वतःचें नाहीं त्यावरून ( श्रुति ) ह्मणते—‘ ज्याचें पृथ्वी शरीर आहे. ’ देवतांचीं शरीरें व इंद्रियें यांच्या क्रिया ईश्वराचें फक्त साक्षित्वेंकरून सान्निध्य असल्यामुळें नियमानें चालू किंवा बंद असतात. असा जो नारायण नांवाचा ईश्वर ( तो ) पृथ्वीला ह्मणजे पृथ्वी देवतेला तिच्या पोटांत राहून तिच्या स्वतःच्या क्रियांकडे लावितो. जो तूं अन्तर्यामी विचारलास ‘ तो हा तुझा आत्मा. ’ हें ह्मणणें–तुझा, माझा, सर्वभूतांचा–अशा दिग्दर्शनाकरितां आहे. अमृत ह्मणजे सर्व संसारधर्मरहित ( अविनाशी ) असा.

ऋचा ४—जो पाण्यांत राहून पाण्याच्या आंत आहे; ज्याला पाणी जाणत नाहीं, ज्याचें पाणी हें शरीर आहे; जो पाण्याच्या आंत राहून पाण्याचें नियमन करितो; तो हा तुझा आत्मा अविनाशी अन्तर्यामी.

ऋचा ५—जो अग्नींत राहून अग्नीच्या आंत असतो; ज्याला अग्नि जाणत नाहीं; ज्याचें अग्नि हें शरीर आहे; व जो अग्नीच्या आंत राहून त्याचें नियमन करितो; तो हा तुझा अविनाशी अन्तर्यामी आत्मा.

ऋचा ६—जो अन्तरिक्षांत राहत असून अंतरिक्षाच्या अभ्यंतरीं आहे; ज्याला अंतरिक्ष जाणत नाहीं; अन्तरिक्ष ज्याचें शरीर आहे, व जो अन्तरिक्षाच्याही आंत राहून त्याचें नियमन करितो; तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत आहे.

ऋचा ७—जो वायूंत राहून वायूच्या अन्तर्भागीं आहे; ज्याला वायु जाणत नाहीं; ज्याचे वायु हें शरीर आहे, व जो वायूच्या अगदीं आंत राहून वायूचें नियमन करितो; तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत आहे.

ऋचा ८—जो द्युलोकांत ( गन्धर्वलोकांत ) राहून द्युलोकाच्या मध्यबिंदूंत आहे; ज्याला द्युलोक जाणत नाहीं; ज्याचें द्युलोक शरीर आहे, व जो द्युलोकाच्या पोटांत राहून त्याचें नियंत्रण करितो; तो हा तुझा अविनाशी आत्मा अन्तर्यामी ह्मणावा.

ऋचा ९—जो आदित्यांत राहणारा, आदित्याच्या आंत असणारा; ज्याला आदित्य जाणत नाहीं; आदित्य ज्याचें शरीर आहे; व जो आदित्याच्या आंत राहून त्याचें नियमन करितो; तो हा तुझा अमृत अन्तर्यामी आत्मा होय.

ऋचा १०––जो दिशांत राहून दिशांच्या पोटांत आहे, ज्याला दिशा ओळखीत नाहींत, ज्याचें दिशा शरीर आहे; जो दिशांच्या आंत राहून दिशांचेंही नियमन करितो तो तुझा अमृत आत्मा अन्तर्यामी.

ऋचा ११––जो चंद्रतारकांत राहून चन्द्रतारकांच्या अन्तर्भागीं आहे; ज्याला चंद्रतारका जाणत नाहींत; ज्याचें चंद्रतारका शरीर आहे; व जो चंद्रतारकांच्या अन्तर्भागीं; राहून त्यांस ( नियमित कक्षा ) नेमून देतो; तो तुझा अविनाशी आत्मा अन्तर्यामी होय.

ऋचा १२—जो आकाशांत राहून आकाशाच्याही पोटांत आहे; आकाश ज्याला जाणत नाहीं; आकाश ज्याचें शरीर आहे, व जो आकाशाच्याही अभ्यन्तरीं राहून आकाशाचें नियमन करितो; तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत होय.

१३––जो अन्धकारांत रहात असून अंधकाराच्याही अन्तर्भागीं आहे; ज्याला अन्धकार जाणत नाहीं; अन्धकार ज्याचें शरीर आहे, व अन्धकारांत राहून त्याचें नियमन करितो; तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत.

ऋचा १४.—जो तेजांत राहतो व तेजाचें अन्तर्भागीं आहे, जो तेजाला अविदित आहे; तेज ज्याचें शरीर आहे; जो तेजांत राहून त्याचें नियमन करितो; तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत. येथपर्यंत आधिदैवत ह्मणजे देवतासंबंधानें झालें.

भाष्य—इतर ( तिसरे ऋचे ) सारखें. जो उदकांत, अग्नींत, अंतरिक्षांत, वायूंत, द्युलोकांत, आदित्यांत, दिशांत, चंद्रतारकांत, आकाशांत, अंधकारांत ह्मणजे जो बाह्य अंधकार ( दृष्टींचें ) आच्छादन करितो त्यांत, तेजांत ह्मणजे अंधकाराला उलट बाह्य जो जो प्रकाश आहे त्यांत राहतो, असें आधिदैवत ह्मणजे देवतांमध्यें अन्तर्यामी आहे, असें वर्णन झालें.

## अन्तर्यामीपैकीं आधिभौतिक काण्ड.

आतां अधिभत ह्मणजे भूताच्या संबंधानें.

ऋचा १५—जो सर्वभूतांमध्यें राहून सर्व भतांच्या अभ्यंतरांत आहे; पण ज्याची सर्व भतांना ओळख नाहीं; सर्व भूतें ज्याचें शरीर आहे, जो सर्व भूतांत राहून त्यांचा नियन्ता आहे; तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत. हें अधिभूत प्रकरण झालें.

भाष्य-–'आतां अधिभूत'—अधिभत ह्मणजेब्रह्मादि तृणापर्यंत भूतांमध्यें अन्तर्यामी पहाणें हें अधिभूत.

## अन्तर्यामीपैकीं अध्यात्मिक काण्ड.

आतां अध्यात्म ह्मणजे शरीराविषयी.

ऋचा १६.—जो प्राणांत राहून प्राणाच्या पोटांत आहे; ज्याला प्राण जाणत नाहीं; प्राण हें ज्याचें शरीर आहे; जो प्राणाचे अन्तर्यामीं राहून त्याचें नियमन करितो; तो तुझा आत्मा अंतर्यामी अमृत.

ऋचा १७—जो वाणींत राहून वाणीच्या अंतर्भागीं आहे; ज्याची वाचेला ओळख नाहीं; वाणी हें ज्याचें शरीर आहे; व जो वाणीला आंत राहून नियंत्रित करितो; तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत.

ऋचा १८—जो डोळ्यांत राहून डोळ्यांच्या आंत आहे; ज्याला डोळा जाणत नाहीं, ज्याचा डोळा हें शरीर आहे; व जो डोळ्याच्या आंत राहून त्याचें नियमन करितो; तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत.

ऋचा १९—जो कानांत राहून कानाच्या आंत आहे; कान ज्याला जाणत नाहीं; कान ज्याचें शरीर आहे; व जो कानाच्या आंत राहून कानांचें नियमन करितो; तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत.

ऋचा २०—जो मनांत राहून मनाच्याही आंत आहे; ज्याची मनाला ओळख नाहीं; मन हें ज्याचें शरीर आहे; व जो मनांत राहून मनाचें नियमन करितो; तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत.

ऋचा २१—जो त्वचेंत राहून त्वचेच्या आंत आहे. त्वचा ज्याला जाणत नाहीं; व त्वचा ज्याचें शरीर आहे; जो आंत राहून त्वचेचें नियमन करितो; तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत आहे.

ऋचा २२—जो विज्ञा[१]नांत राहतो, व विज्ञानाच्या अंतर्भागीं आहे; विज्ञान त्याला जाणत नाहीं; विज्ञान ज्याचें शरीर आहे; जो विज्ञानाच्या आंत राहून विज्ञानाचें नियमन करितो; तो हा तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत.

ऋचा २३—जो रेतांत राहून रेताच्या अन्तर्भागीं आहे; रेत ज्याला जाणत नाहीं; रेत ज्याचें शरीर आहे; जो रेताच्या आंत राहून रेताचें नियमन करितो; तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत.

भाष्य—आतां अध्यात्म—जो प्राणांत ह्मणजे प्राणवायुसहित नाकांत, जो वाणींत, डोळ्यांत, कानांत, मनांत, त्वचेंत, विज्ञानांत ह्मणजे बुद्धीमध्यें, व रेतांमध्यें ह्मणजे उत्पादक बीजांमध्यें ( अन्तर्यामी राहतो ) असें वर्णन झालें.

## उपसंहार.

ऋचा[२] २४—अदृष्ट ( न पाहिलेला ), द्रष्टा ( पाहणारा ), अश्रुत ( न ऐकलेला ), श्रोता ( ऐकणारा ), अमत ( कोणी मनन न केलेला ), मन्ता ( मनन करणारा ), अवि-

---

१—माध्यंदिन शाखेंत विज्ञानाऐवजीं आत्मा ( जीवात्मा ) घातला आहे.

२—ही ऋचा संस्कृत पोथ्यांतून ऋचा २३ चें पोटांत घातलेली आहे; पण विषय निराळा असल्यामुळें निराळ्या ऋचेचा जास्त आकडा घालणें विशेष सोयीचें आहे.

**ज्ञात ( न जाणलेला ), विज्ञाता ( जाणणारा ). याहून दुसरा द्रष्टा नाहीं, याहून दुसरा श्रोता नाहीं, याहून दुसरा मन्ता नाहीं, याहून दुसरा विज्ञाता नाहीं. तो हा तुझा आत्मा अन्तर्यामी मरणधर्मरहित आहे. त्याहून भिन्न सर्व गोष्टी आर्त ( विनाशी ) आहेत. हें ऐकून आरुणी उद्दालक स्तब्ध झाला.**

भाष्य—पृथ्वी आदिकरून मोठ्या समर्थ देवता असून, त्या देखील मनुष्यादिकांप्रमाणें त्यांचे ठिकाणीं राहणारा व त्यांचें नियमन करणारा अंतर्यामी जाणत नाहींत, असें कां, तें श्रुति ह्मणते—अदृष्ट ह्मणजे न पाहिलेला–कोणाच्याही डोळ्यांना गोचर होत नाहीं, परंतु स्वतः अगदीं डोळ्यांत जवळ असल्यामुळें दृष्टिस्वरूप अत एव द्रष्टा आहे. त्याचप्रमाणें अश्रुत ह्मणजे कोणाच्याही कानाला गोचर होत नाहीं; पण त्याचें स्वतःचें ऐकण्याचे शक्तीचा लोप होत नाहीं, व सर्वांच्या कानांत सन्निध असल्यामुळें तो श्रोता. तसेंच अमत ह्मणजे ( कोणाचेही ) मनाचे संकल्पांत येत नाहीं; सर्व मनुष्यें पाहिलेल्या व ऐकलेल्या गोष्टींचा संकल्प करितात. हा पाहिलेला व ऐकलेला नसल्यामुळें अमत होय; पण त्याची मनन शक्ति लुप्त होत नाहीं; व सर्व मनांना तो जवळच आहे ह्मणून त्याला मन्ता ह्मटलें आहे. तसेंच अविज्ञात ह्मणजे रूप, सुख इत्यादिकां-प्रमाणें ज्याच्याविषयीं निश्चय होत नाहीं; तरी त्याची स्वतःची विज्ञानशक्ति लुप्त होत नसल्यामुळें व तो विज्ञानाला ( आत्म्याला ) जवळ असल्यामुळें त्याला विज्ञाता ह्मणावें.

आतां ज्याला पृथ्वी जाणत नाहीं, व ज्याला सर्व भूतें जाणत नाहींत, या ह्मणण्यावरून नियमन करण्यास योग्य असे दुसरे विज्ञाते आहेत, व नियमन करणारा अन्तर्यामी पृथक् आहे, असें आलें. ( हीं दोन्ही ) पृथक् पृथक् असल्याची शंका दूर व्हावी ह्मणून श्रुति ह्मणते—याहून ह्मणजे अन्तर्यामीहून पृथक् द्रष्टा नाहीं. तसेंच त्याहून दुसरा श्रोता नाहीं. त्याहून दुसरा मन्ता नाहीं. त्याहून दुसरा विज्ञाता नाहीं. ज्याहून दुसरा द्रष्टा, श्रोता, मन्ता, विज्ञाता नाहीं, व जो अदृष्ट, द्रष्टा; अश्रुत, श्रोता; अमत, मन्ता; अविज्ञात, विज्ञाता; अमृत ह्मणजे सर्व संसारधर्म-रहित; सर्व संसारी जनांच्या कर्मांच्या फलांची वांटणी करणारा आहे; तो हा तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत होय. या ईश्वर परमात्म्याहून भिन्न जें कांहीं आहे तें आर्त ( विनाशी ) आहे. इतकें ऐकून आरुणि उद्दालक स्वस्थ बसला.

**अध्याय ३, ब्राह्मण ७, समाप्त.**

# दुसरें गार्गीब्राह्मण.

## प्रशास्तृ–अक्षर.

## अध्याय ३, ब्राह्मण ८.

**ऋचा १—मग वाचक्नवी बोलली कीं, पूज्य ब्राह्मणांनों, आपला रुकार असेल तर मी त्या याज्ञवल्क्याला दोन प्रश्न विचारीन. त्यांचीं उत्तरें तो मला देईल तर तुमच्यापैकीं कोणीही कधींही त्या ब्रह्मप्रतिपादकाला जिंकण्याला समर्थ होणार नाहीं. ( इतरांनीं उत्तर दिलें ), गार्गी, विचार.**

भाष्य—ह्या नंतर अशनायादिकांपासून मुक्त असलेलें, उपाधिरहित, प्रत्यक्ष, व समक्ष सर्वांतर ब्रह्म ( अक्षर स्वरूप ) सांगावयाचें आहे, ह्मणून ( या ब्राह्मणाचा ) आरंभ आहे—' मग वाचक्नवी बोलली '. याज्ञवल्क्यानें पूर्वीं जिचा निषेध केला होता, व जी शिरःपातभयानें स्तब्ध झाली होती, ती पुनः प्रश्न करण्याविषयीं ब्राह्मणांची परवानगी मागते. हे पूज्य ब्राह्मणांनो माझें भाषण ऐका. मी या याज्ञवल्क्याला, तुमची परवानगी असेल तर दोन प्रश्न विचारितें. कसेंही करून त्यांचीं उत्तरें तो मला देईल तर, तुमच्यापैकीं कोणीही कधींही या ब्रह्मवादी याज्ञवल्क्याला जिंकील असें होणार नाहीं. याप्रमाणें भाषण केल्यावर ' गार्गी विचार ' अशी ब्राह्मणांनीं अनुज्ञा दिली.

**ऋचा २—ती ह्मणाली, याज्ञवल्क्या, जसा काशी देशांतील किंवा विदेह देशांतील ( राजाचा ) शूर पुत्र दोरी नसलेल्या धनुष्याला दोरी चढवून, ज्या बाणांनां ( बांसाचीं टोंकें ) लाविलेलीं असतात, असे शत्रुविघातक दोन ( बाणवंत ) बाण हातांत घेऊन अंगावर येतो, त्याप्रमाणें मी दोन प्रश्न घेऊन तुझे अग्रभागीं उभी आहें. ते दोन प्रश्न मला सांग. गार्गी, विचार.**

भाष्य—परवानगी मिळाल्यावर तिनें याज्ञवल्क्याला ह्मटलें कीं मी तुला ' दोन प्रश्न विचारीन ' हे मागील ( ऋचेंतील शब्द ) घ्यावे. ते दोन प्रश्न कोणते, हें जाणण्याची इच्छा ( याज्ञवल्क्याला ) झाली आहे, असें पाहून त्या प्रश्नांचीं उत्तरें देणें कठीण आहे, हें ( आगाऊ ) जाणविण्याकरितां, दृष्टांत देऊन ते प्रश्न विचारते. हे याज्ञवल्क्या, ज्याप्रमाणें लोकांमध्यें काशी देशांतील काश्य–( क्षत्रिय कुमारांचें ) शौर्य प्रसिद्ध आहे–किंवा विदेह देशांतील राजाचा (कोणी) शूर पुत्र, ज्याची दोरी काढली आहे अशा धनुष्याला पुनः दोरी चढवून ' दोन बाणवंत ' बाणशब्दानें बाणाच्या शेवटीं टोंक जोडतात ( तें समजावें ); टोंक न जोडतांही शर होतो, ( तो नव्हे ), ह्मणून बाणवंत असें विशेषण दिलें आहे. ' दोन बाणवंत शर ' यांचेंच शत्रुविघातक–शत्रूला

पीडा करणारें–हें विशेषण आहे–हातांत घेऊन अंगावर धांवत येतो, त्याप्रमाणेंच मीं बाणाऐवजीं दोन प्रश्न घेऊन तुजजवळ उभी राहिल्यें आहें. तूं ब्रह्मज्ञानी असलास तर त्यांचीं उत्तरें दे. याज्ञवल्क्यानें उत्तर दिलें; गार्गी, विचार.

**ऋचा ३—ती ह्मणाली, याज्ञवल्क्या, जें द्युलोकाच्या उर्ध्वभागीं आहे, जें पृथ्वीच्या अधोभागीं आहे, जें द्युलोक आणि पृथ्वी यांच्या मध्यभागीं आहे, आणि द्यावापृथ्वी हीं दोन्हीं तेंच, व ज्याला भूत, वर्तमान, भविष्य ह्मणतात तें कशांत गोंवलेलें आहे ?**

भाष्य—'ती ह्मणाली' द्युलोकाच्या ऊर्ध्वभागीं ह्मणजे ब्रह्मांडाच्या वरच्या शकलाच्या वर जें आहे, आणि जें पृथ्वीच्या ह्मणजे ब्रह्माण्डाच्या खालच्या शकलाच्या खालीं आहे, जें द्यावापृथ्वी यांच्या मध्यभागीं आहे, आणि जें द्यावापृथ्वी हीं दोन्हीं, आणि जें भूत ह्मणजे झालेलें, वर्तमान ह्मणजे स्वतःचा व्यापार चालू ठेवणारें, भविष्य ह्मणजे वर्तमानाच्या पुढच्या काळीं होणाऱ्या चिन्हां वरून कळणारें;—जें हें सर्वश्रुतीवरून सांगण्यांत येतें—तो सर्व द्वैतसमुदाय ज्या ( सूत्रा ) मध्यें एक होतो—असें तात्पर्यानें घ्यावें– तें पूर्वीं ( ब्रा. ७ ऋ. १ ) सांगितलेलें सूत्र, उदकांत जशी पृथ्वी गोंवलेली असतें, तसें कोणत्या वस्तूंत गोंवलेलें आहे ?

**ऋचा ४—तो ह्मणाला, हे गार्गी, जें द्युलोकाच्या वर, पृथ्वीच्या खालीं, व दोहोंच्या दरम्यान असतें, व द्यावापृथिवी हीं दोन्हीं तेंच, आणि ज्याला भूत, वर्तमान, भविष्य असें ह्मणतात, तें आकाशांत गोंवलेलें आहे.**

भाष्य—तो दुसरा ( याज्ञवल्क्य ) ह्मणाला–हे गार्गी, जें तूं द्युलोकाच्या वर इत्यादि ह्मणतेस तें सर्व ह्मणजे ज्याला सूत्रात्मा ह्मणतात, तें सूत्र आकाशांत सर्वत्र ओंवलेलें आहे. जें हें व्यक्त झालेलें सूत्ररूप जगत् अव्यक्त आकाशांमध्यें, ज्याप्रमाणें पृथ्वी तिन्हीं काळीं ह्मणजे उत्पन्न होतांना, वर्तमानकाळीं, व लयकाळीं उदकांत व्यापलेली असते, त्याप्रमाणें गोंवलेलें आहे.

**ऋचा ५—ती ह्मणाली—याज्ञवल्क्या, ज्या अर्थीं तूं मला हा प्रश्न सांगितलास, त्या अर्थीं तुला नमस्कार असो. आतां दुसरा प्रश्न ऐकण्यास तयार हो. गार्गी, विचार.**

भाष्य—पुनः ती ह्मणाली 'तुला नमस्कार असो' वगैरे वाक्य प्रश्न फार कठीण होता असें दाखविण्याकरितां आहे. ज्या अर्थीं तूं माझा हा प्रश्न चांगला सांगितलास, त्या अर्थीं तूं मजवर उपकार केला आहेस. हा प्रश्न सांगणें कठीण होतें, याचें कारण सूत्रच आधीं दुसऱ्यास समजणें कठीण, व सांगणें कठीण; तर मग तें सूत्र अमुकांत गोंवलेलें आहे, हें सांगणें किती कठीण आहे ? मी तुला नमस्कार करिते. दुसरा प्रश्न ऐकण्यास चांगला तयार हो असें ( ह्मणण्याचा गार्गीचा ) आशय आहे. दुसऱ्या बाजूनें याज्ञवल्क्यानें हे गार्गी, प्रश्न कर, असें ह्मटलें.

---

१—मध्यभागीं जें अन्तरिक्ष आहे त्याचाहि ऋचेनें संग्रह केला आहे. अन्तरिक्षाचा संग्रह नाहीं असें मॉक्समुल्लरास ( Max Muller ) कां वाटतें तें कळत नाहीं.

**ऋचा ६—ती ह्मणाली, याज्ञवल्क्या, जें द्युलोकाच्यावर आहे, जें पृथ्वीच्या खालीं आहे, दोहोंच्या दरम्यान आहे, आणि द्यावापृथ्वी हीं दोन्हीं तेंच, व ज्यास भूत, वर्तमान, व भविष्य असें ह्मणतात, तें कशांत गोंवलेलें आहे ?**

**ऋचा ७—तो ह्मणाला, हे गार्गी, जे द्युलोकाच्यावर, पृथ्वीच्या खालीं, दोहोंच्या दरम्यान, व जें द्यावापृथिवी हीं दोन्हीं, आणि ज्याला भूत, वर्तमान, भविष्य असें ह्मणतात, तें आकाशांतच गोवलेलें आहे. आकाश कशांत गोवलेलें आहे ?**

भाष्य—बाकी व्याख्यान ( तिसऱ्या व चवथ्या ऋचेवर ) झालें. ती ह्मणाली, 'याज्ञवल्क्या,' जें वर, वगैरे. (गार्गीचा) प्रश्न व याज्ञवल्क्याचें उत्तर हीं पूर्वीं झालीं. त्यांत सांगितलेला आशय पक्का ध्यानांत राहण्याकरितां तीं पुनः आलीं आहेत. ह्यांत नवें कांहीं सांगितलेलें नाहीं. गार्गीनें ह्मटलेलें जसेंच्या तसें उच्चारून पूर्वीं दिलेलें उत्तरच याज्ञवल्क्यानें निश्चयपूर्वक 'आकाशामध्येंच' असें सांगून दिलें.

गार्गी ह्मणते—'आकाश कशांत गोवलेलें आहे;' अव्यक्त आकाशच अगोदर कालत्रयापलीकडे असल्यामुळें तें सांगणें कठीण आहे. ज्यांत आकाश गोंवलेलें आहे तें अक्षर तर त्याहून ज्यास्त दुर्बोध आहे; त्यामुळें तें शब्दप्रतिपाद्य नाहीं. या कारणामुळें तें समजत नाहीं; ( ह्मणून अप्रतिपत्ति दोष येतो ). ती अप्रतिपत्ति ( अनवगम्यता ) न्यायशास्त्रांत निग्रहस्थान ( वादीला अडविण्याची जागा ) आहे. आतां अवाच्य वस्तु ही याज्ञवल्क्य सांगेल तर विप्रतिपत्तिनामक दोष येईल. विप्रतिपत्ति ह्मणजे विरुद्ध प्रतिपादन. अवाच्य असून सांगणें ( ही विप्रतिपत्ति होते ); ह्मणून ( आपला ) प्रश्न सांगणें फार कठीण आहे असें गार्गी समजत होती.

**ऋचा ८—तो ह्मणाला, गार्गी, त्याला ब्राह्मण अक्षर ह्मणतात. तें स्थूल नाहीं, अणुरूप नाहीं; ऱ्हस्व ( आंखूड ) नाहीं, दीर्घ ( लांब ) नाहीं, आरक्तता नव्हे, स्निग्धता नव्हे, छायारूप नव्हे, अंधकार नव्हे; वायु नव्हे, आकाश नव्हे; असंग आहे, रस नव्हे, गन्ध नव्हे, डोळस नव्हे, कर्णयुक्त नव्हे, वाणी नव्हे, मन नव्हे; तेजयुक्त नव्हे, प्राण नव्हे; त्याला मुख नाहीं, परिमाण नाहीं; त्याला अभ्यन्तर नाहीं, बहिर्भाग नाहीं; तें कांहीं खात नाहीं, व त्याला कोणी खात नाहीं.**

भाष्य—( अप्रतिपत्ति व विप्रातिपत्ति ) हे दोन्हीं दोष दूर करण्याच्या इच्छेनें (याज्ञवल्क्य) ह्मणतो—तो याज्ञवल्क्य ह्मणाला, आकाश कशामध्यें गोवलेलें आहे असें तूं विचारलेंस, तें हेंच. तें कायतर, अक्षर. अक्षर ह्मणजे जें कधीं क्षय किंवा क्षरण पावत नाहीं. हे गार्गी, त्याला ब्राह्मण ह्मणजे ब्रह्मज्ञानी अक्षर ह्मणतात. ब्राह्मणांचें ह्मणणें सांगून मी अवाच्य वस्तु सांगणार नाहीं, किंवा न समजतां सांगणारा नाहीं, हें सुचवून ( अप्रतिपत्ति व विप्रतिपत्ति ) दोन्हीं दोष याज्ञवल्क्यानें उडविले. अशा प्रकारें प्रश्नाचें उत्तर झाल्यावर—जें ब्राह्मण सांगतात तें अक्षर कोणतें तें सांग–असा गार्गीचा पोटप्रश्न कल्पावा. तो प्रश्न आल्यावरून ( याज्ञवल्क्य ) उत्तर देतो—तें

स्थूल नाहीं, ह्मणजे स्थूलाहून भिन्न आहे. असें आहे तर अणुरूप ( असेल ). 'अणुरूप नाहीं.' तर मग ऱ्हस्व ( आंखूड ) असेल. ' ऱ्हस्व नाहीं. ' तदभावीं दीर्घ ( लांब ) असावें तर ' दीर्घ नाहीं. ' ह्या चारी परिमाणांचा निषेध केल्यानें द्रव्यधर्माचा निषेध केला ह्मणून तें अक्षर द्रव्य नव्हे असें निष्पन्न होतें. द्रव्य नव्हे तर, आरक्तता गुण असेल ( ह्मणावें तर ) त्याहूनही निराळें आहे. ' आरक्तता नव्हे. ' आरक्तता अग्नीचा गुण आहे. तर उदकांतील स्निग्धता असेल. नाहीं. ' स्निग्धता नव्हे; ' तर छाया ( प्रतिबिंब ) ह्मणूं. पण ब्रह्माचा मुळींच ( अंगुलि )निर्देश करितां येत नाहीं; ह्मणून छायेहूनही तें निराळें आहे. ' छायारूप नव्हे ' तर अंधकार घ्या, "अंधकार नव्हे." वायु म्हणावा तर ' वायु नव्हे. ' आकाश ह्मणावें तर ' आकाश नव्हे. ' लाखेप्रमाणें संगमनधर्मविशिष्ट तरी असेल. नाहीं. ' असंग आहे. ' रस असें ( म्हणावें ) तर ' रस नव्हे;' आणि गन्ध असें ( म्हणावें ) तर ' गन्ध नव्हे. ' डोळा असें ( ह्मणावें ) तर ' डोळस नव्हे; ' कारण, त्याला नेत्रेन्द्रिय नाहीं. ' डोळे नसून पाहतो[1] ' अशी श्रुति आहे. " तो कान नसून ऐकतो[2] " ह्या श्रुतीवरून " कर्णयुक्त नव्हे. " वाणी असेल, ( ह्मणावें ) तर " वाणी त्याला नाहीं. " तसेंच ' त्याला मन नाहीं;' आणि त्याला तेज नाहीं; तें ' तेजरहित' कारण अग्न्यादिकांना प्रकाश असतो, तसा प्रकाश त्याला नाहीं. ' त्याला प्राण नाहीं. ' प्राण[3] नाहीं या शब्दांनीं शारीरिक वायूचा निषेध केला आहे. मुखद्वार असेल ( ह्मणावें ) तर त्याला ' मुख नाहीं.' ' परिमाण नाहीं. ' ज्यानें मोजलें जातें तें परिमाण, तद्रूप तें नाहीं; व त्यानें कांहीं मोजलें जात नाहीं. पोकळीप्रमाणें आहे म्हणावें तर 'त्याला अभ्यन्तर नाहीं.' त्याला बहिर्भाग असेल ह्मणावें तर ' त्याला बाहिर्भाग नाहीं.' तें खाणारें असेल ( म्हणावें ) तर तें कांहींच खात नाहीं. कोणाचें तरी खाद्य असेल ह्मणावें तर त्याला कोणी खात नाहीं. त्याला कोणतेंच विशेषण देतां येत नाहीं, असा अभिप्राय आहे; कारण एकच द्वितीयरहित आहे तर तें कोणत्या विशेषणानें विशिष्ट करितां येणार ?

**ऋचा ९—गार्गी, ह्या अक्षराच्याच आज्ञेमध्यें सूर्य, चंद्र विधृत ( पूर्ण बांधलेले ) राहतात. गार्गी, ह्या अक्षराच्याच नियन्त्रणानें द्यावापृथिवी विधृत राहतात. गार्गी, ह्या अक्षराच्याच नियमनानें मेषोन्मेष, मुहूर्त[4], दिवस, रात्र, पक्ष, मास, ऋतु, संवत्सर हे विधृत राहतात. गार्गी, ह्या अक्षराच्याच नियमनानें श्वेतपर्वतांपासून निघून कांहीं नद्या पूर्वेकडे, कांहीं पश्चिमेकडे, आणि दुसऱ्या ज्या ज्या दिशेकडे गेल्या असतील तिकडे तिकडेंच, वाहत आहेत. गार्गी ह्या अक्षराच्याच नियमनानें मनुष्यें दान करणारांची, देव यज्ञ करणारांची, पितर दर्वी ( पळी ) ची पाठ धरून प्रशंसा करितात.**

भाष्य—अनेक विशेषणें घेऊन तीं त्याला लावितां येत नाहींत. असें प्रयासानें दाखवून अक्षराचें अस्तित्व तर श्रुतीवरून जाणविलें. तथापि लोकदृष्टीनें ज्या अर्थी शंका घेतली आहे, त्या अर्थी अक्षराचें अस्तित्व सिद्ध करण्याकरितां अनुमानप्रमाणाचा आरंभ आहे—' ह्या अक्षरा-

---

१—' पश्यत्यचक्षुः ' श्वे.–३–१९. २—' स शृणोत्यकर्णः ' श्वे. ३–१९

३—पूर्वी वायूचा निषेध केला आहे; तर प्राणही वायु असल्यामुळें त्याचा पुनः निषेध कां केला अशी शंका येईल ह्मणून हें भाष्य आहे. ४—दोन घटिकांनां मुहूर्त ह्मणतात.

ण्याच '-जें हें अक्षर सर्वान्तर प्रत्यक्ष व समक्ष ब्रह्म, अशनायादि धर्मोपलीकडील आत्मा असें जाणलें,-त्या अक्षराच्याच आज्ञेमध्यें, जसें राजाच्या आज्ञेमध्यें राज्य फुटून न जातां आकळलेलें असतें, तसें या अक्षराच्याच हुकमानें, हे गार्गी, सूर्यचंद्र दिवसां व रात्रीं लोकांनां दिव्यासारखे (उपयोगी पडत आहेत), व त्या (उपयोगाकरितां) त्यांजपासून (हें) लोककार्य होईल असें जाण-णाऱ्या नियन्त्यानें सर्व साधारण प्राणिमात्रांस प्रकाशद्वारा उपयोगी असल्यामुळें, लौकिक दि-व्याप्रमाणें निर्माण केलेले असावेत; ह्मणून तें ( अक्षर ) आहे, आणि त्या अक्षरानें ( ते सूर्यचंद्र ) ऐश्वर्ययुक्त व स्वतंत्र आहेत तरी, बांधलेले राहतील असे केले आहेत. नेमका काल ( गतिकाल ) देश ( कक्षा ), निमित्त ( अदृष्ट ), उदय, अस्त, वृद्धि, क्षय हे त्यांस आहेत; यावरून त्यांचें प्रशा-सन करणारें अक्षर, दिवे ( असले ह्मणजे त्यांचा ) लावणारा व सांभाळणारा ( असतो त्या ) प्रमाणें, आहेच. ' गार्गी, ह्या अक्षराच्याच नियमनानें द्यावापृथिवी ' (हीं बांधलेलीं आहेत). द्युलोक आणि पृथिवी अवयवघटित असल्यामुळें फुटून जाण्याच्या स्वभावाचीं, जड असल्यामुळें पतन पावणारीं, संयुक्त असल्यामुळें वियोगास पात्र, आणि सचेतन अभिमानी देवतांनीं युक्त असल्या-मुळें स्वतंत्र आहेत, तरी त्या अक्षराच्या आज्ञेंत ' विधृत ( बांधलेलीं ) राहतात. '

हें अक्षर सर्वांच्या व्यवस्थेचें बंधन ( सेतु ) ह्मणजे सर्वांस मर्यादेंत ठेवणारें आहे; ह्मणून ह्या अक्षराची आज्ञा द्यावापृथिवी उल्लंघन करीत नाहींत. ह्यावरून अक्षराचें अस्तित्व सिद्ध झालें. ( द्यावापृथिवी अखंड बंधनामध्यें आहेत ), हें ( अक्षराच्या अस्तित्वाचें ) ज्ञापक निर्दोष (अपवाद-रहित ) आहे. कोणी तरी संसार( बंधन )रहित, चेतन प्रशासिता ( नियन्ता ) असल्याशिवाय हें ( सर्व जगाला ताब्यांत ठेवणें ) घडावयाचें नाहीं. " ज्याच्यामुळें स्वच्छंदी द्युलोक व दृढ पृथ्वी " ( नियंत्रित झाली आहे ), अशी श्रुति आहे. 'गार्गी, ह्या अक्षराच्या नियमनानें मेषोन्मेष, मुहूर्त ' हीं कालमानें सर्व भूत, भविष्य, वर्तमान, उत्पत्तिमान् ( जगताचें ) आकलन करणारीं आहेत. उदाहरण, लोकांमध्यें मालकानें नेमलेला हिशेबनवीस सर्व जमाखर्च सावधगिरीनें करितो, त्याप्रमाणें मालकाच्या स्थानीं असणारें ( अक्षर ) या कालभागांचा नियन्ता आहे.

तसेंच ' प्राच्य ' ह्मणजे पूर्वदिशेकडे जाणाऱ्या ( बर्फाच्या पांघरुणानें सफेद झालेल्या ) श्वेत-हिमालय वगैरे-पर्वतांपासून निघणाऱ्या गंगादि नद्या वाहत जातात; ( पण ) जशी त्यांच्या प्रवाहाची योजना केली आहे, तशाच त्या नेमक्या जातात; अन्य दिशेला त्यांचा वाहण्याचा कल असतो तरी, ( ह्या नद्या नियमाप्रमाणें वाहत आहेत ). हें ( कोणी तरी ) नियमन करणारा अस-ल्याचें ज्ञापक आहे. दुसऱ्या ' प्रतीच्य ' ह्मणजे पश्चिमेकडे जाणाऱ्या सिंधु आदिकरून नद्या पश्चिमेकडेच वाहतात; व इतर नद्या ज्या ज्या दिशेकडे गेल्या ती ती दिशा कधीं सोडीत नाहींत, हेंही ( नियन्ता असल्याचें ) ज्ञापक आहे.

आणखी अशी गोष्ट आहे कीं, आपली अडचण करून सुवर्ण वगैरे ( दुसऱ्यांस दान कर-णाऱ्या लोकांची शहाणे लोक देखील प्रशंसा करितात. ह्या दानाच्या बाबतींत जें कांहीं दान केलें

---

१-प्राणिमात्राच्या अदृष्टाप्रमाणें उत्पत्ति स्थिति नाश व ग्रहग्रस्तपणा सूर्यचंद्राचे पाठीस लागला आहे.

२--"ज्यानें द्युलोक धरिला आहे, ज्यानें स्वर्ग ( धरिला आहे ), जो अन्तरिक्षांतील परमाणु मोज-णारा आहे, कोणत्या देवाला हविर्भाग देऊन आह्मी पूजावें. " अशीहि श्रुति आहे. ऋग्वेद मंडल १०.

जातें तें, जे लोक देतात ते व जे लोक दान घेतात ते, यांचा इहलोकींच समागम व वियोग प्रत्यक्ष दिसत असतो. पुढचा लाभ तर दिसत नाहीं. तरी दान करणाऱ्या लोकांस दानाचें फल प्राप्त होतें, असें ज्यांस दिसत असतें ते श्रुतिप्रमाण जाणणारे ( दान करणाऱ्या लोकांची ) प्रशंसा करितात. कर्त्यांची कर्मफलाशीं गांठ घालणारा व कर्मफलाची वांटणी कशी करावी हें जाणणारा प्रशास्ता ( कोणी तरी ) असल्याशिवाय ती गोष्ट ( जन्मांतरींची फलप्राप्ति ) होणार नाहीं; कां तर दान करण्याची क्रिया नष्ट झाल्याचें प्रत्यक्ष दिसत असतें. ह्यावरून दान करणाऱ्यांची व फलांची गांठ घालणारा ( कोणीतरी ) आहे.

( एक ) अपूर्व ( अदृष्ट अथवा कर्मसंस्कार ह्मणून फल देणारें तत्व ) असतें, असें ह्मणाल तर तसें नाहीं; कारण अपूर्व असल्याबद्दल कांहीं प्रमाण सांपडत नाहीं. प्रशास्ता ( ईश्वर ) आहे, यालाहि प्रमाण नाहीं, असें ह्मणाल तर, तसें नाहीं; कारण ( ईश्वर आहे ) हें श्रुतींचें तात्पर्य ( प्रमाण ) सिद्ध आहे; आणि श्रुति नेहमीं सत्य सांगत असतात, असें आह्मीं पूर्वीं सांगितलें आहे. शिवाय अशी गोष्ट आहे कीं अपूर्वाची कल्पना करतांना ( ज्या अर्थापत्तिप्रमाणाचें कारण पडतें ) तें अर्थापत्तिप्रमाण, ( फलप्राप्ति कांहीं प्रसंगीं ) अन्यरीतीनें होत असल्यामुळें जातें; कारण सेवाकर्माचें फल सेव्य ह्मणजे स्वामी देतो, मध्यें अपूर्व ( कर्मसंस्कार तत्त्व ) उत्पन्न व्हावें लागत नाहीं, ) हें पाहिलें आहे.

सेवा ही क्रिया आहे, व सेवेसारख्याच याग, दान, होम वगैरे क्रिया, यांचें सेव्य ईश्वरादिकांपासून फल मिळणें योग्य आहे. प्रत्यक्ष ( दिसणारें ) क्रियाधर्माचें सामर्थ्य न सोडून देतां फलप्राप्तीची कल्पना बसत असतां, प्रत्यक्ष क्रियांचें सामर्थ्य सोडून देणें योग्य नाहीं. आणि ( अपूर्वाची ) कल्पना अधिक आहे. ईश्वर कल्पावा, कीं अपूर्व कल्पावें ? त्यामध्यें ( सेवारूप ) क्रियेच्या स्वभावामुळें सेव्य ईश्वरापासून फलप्राप्ति होते हें प्रत्यक्ष दिसतें. अपूर्वापासून फल होतें हें, व अपूर्व, हीं दोन्ही प्रत्यक्ष दिसत नाहींत. त्यापैकीं प्रत्यक्ष नाहीं असें अपूर्व कल्पावें तर त्या अपूर्वाला फल देण्याचें सामर्थ्य आहे हें, आणि सामर्थ्य असून तें फल देतें, इतकें अधीक कल्पावें लागतें; पण आमच्यापक्षीं सेव्य ईश्वर आहे इतकेंच कल्पिलें तर, त्याला फल देण्याचें सामर्थ्य आहे, आणि तो देतो, हें कल्पिण्याचें कारण पडत नाहीं; कारण सेव्य ( स्वामी )पासून फलप्राप्ति होते, हें सर्वांनीं पाहिलें आहे. द्यावापृथिवी ( ईश्वराचे आज्ञेनें ) बांधलेलीं आहेत, ( त्यावरून ईश्वर आहे ) इत्यादि दुसरे अनुमानही दाखविलें.

याप्रमाणेंच देव, (स्वतः) समर्थ असून उपजीविकेकरितां यज्ञ करणाराची पाठ धरून भात पुरोडाश वगैरे खाद्य वस्तूंसाठीं, इतर रीतीनें जिवंत राहण्याची उत्कंठा ( मनांत ) असतांही, हीनदीन वृत्ति धरून राहतात, हें प्रशास्त्याच्या ( ईश्वराच्या ) आज्ञेनें होत असलें पाहिजे. तसेंच

---

१—परलोकीं होणारा; व आज दिसत नाहीं, पण कांहीं कालानें या लोकींच होणारा, लाभ. अत्युत्कटैः पुण्यपापैरिहैव फलमश्नुते ॥

२—आज केलेल्या कर्माचें फळ कांहीं काळानें व्हावयाचें ह्मटलें ह्मणजे मध्यें अपूर्व कल्पावें लागतें, ह्मणावें तर सेवा कर्माचें फळ स्वामी देतो. तेव्हां अपूर्वाचें कारण नाहीं.

पितर देखील त्यामुळें दर्वीला ( ह्मणजे पळी घेऊन लोक ( पितृ ) होम करितात ) त्या होमाला चिकटून असतात असें तात्पर्य निघतें. बाकी सर्व वर प्रमाणें.

**ऋचा १०—हे गार्गी, जो कोणी हें अक्षर न जाणून इहलोकीं होम करितो, यज्ञ करितो, किंवा हजारों वर्षे तप करितो, त्याचें तें ( कर्मजन्य पुण्य ) क्षीण होतें. जो कोणी हे गार्गी, हें अक्षर न जाणतां इहलोक सोडून जातो, तो कृपण ह्मणावा; पण जो हें अक्षर जाणून हे गार्गी, इहलोक सोडून जातो तो ब्राह्मण ह्मणावा.**

भाष्य-त्या अक्षराचें अस्तित्व पुढील गोष्टीनें ही सिद्ध होतें. ज्या अर्थी अक्षरज्ञान करून घेतलें नाहीं तर निश्चयानें संसारांत पडतो, आणि तें जाणल्यानें संसारविच्छेद होतो, त्या अर्थी अक्षर असलें पाहिजे असें न्यायप्राप्त आहे. कर्मापासूनच संसाराचा विच्छेद होईल असें ह्मणाल तर नाहीं. हे गार्गी, जो कोणी हें अक्षर न जाणतां ह्मणजे त्याचें पूर्णज्ञान करून न घेतां या लोकीं होम करितो, यज्ञ करितो, तप करितो, आणि तें कर्म हजारों वर्षे करीत असला तरी, त्या कर्माचें फळ नाशवंत ( क्षीण ) होणारें असतें; कां तर सर्व कर्मफल भोगाचें शेवटीं क्षीण होणारच. आणखी ( अशी गोष्ट आहे कीं ), ज्याच्या ज्ञानानें कार्पण्यनाश व संसारविच्छेद होतो, आणि ज्याचें ज्ञान नसलें तर, कर्मकर्ता कृपण ह्मणजे कर्मफलाचाच उपभोक्ता राहून, जन्ममरणचक्रांत पडून, संसारांत पडतो, तें नियामक अक्षर आहे, ही गोष्ट श्रुति सांगते—जो कोणी हे गार्गी, हें अक्षर न जाणतां इहलोक सोडून जातो तो कृपण ह्मणावा. किंमत देऊन विकत घेतलेल्या दासाप्रमाणें ( दीन असतो ); पण जो हें अक्षर जाणून हे गार्गी, इहलोक सोडून जातो, तो ब्राह्मण ह्मणावा.

**ऋचा ११—हे गार्गी, तेंच हें अक्षर अदृष्ट ( न पाहिलेलें ) आहे तरी पाहणारें ( द्रष्टृ ) आहे. अश्रुत आहे तरी श्रवण करणारें ( श्रोतृ ), अमत आहे तरी मनन करणारें मन्तृ, अविज्ञात आहे तरी जाणणारें ( विज्ञातृ ) आहे. त्याहून दुसरें-पाहणारें; ऐकणारें, मनन करणारें, जाणणारें कांहीं नाहीं. ह्या अक्षरांमध्यें खचित, हे गार्गी, आकाश गोवलेलें आहे.**

भाष्य—अग्नींत जाळण्याचा व प्रकाश देण्याचा ( स्वाभाविक ) धर्म आहे, त्याप्रमाणे अचेतनांतच[1] नियमन करण्याचा स्वभाव असेल ( अशी शंका येईल ); ह्मणून ( श्रुति ) ह्मणते— ‘ हे गार्गी, तें च हें अक्षर अदृष्ट ’ ह्मणजे कोणीही न पाहिलेलें, कां तर ( तें दृष्टीचा ) विषय नाहीं; तरी तें स्वतः ‘ पाहणारें आहे. ’ कां तर पाहणें ( दृष्टि ) हेंच त्याचें स्वरूप आहे. तसेंच श्रोत्राचा विषय नाहीं ह्मणून अश्रुत तरी श्रवणस्वरूप असल्यामुळें श्रवण करणारें आहे. त्याप्रमाणें मनाचा विषय नसल्यानें अमत तरी मनन ( मति ) रूप असल्यानें तें स्वतः मनन करणारें आहे. तसेंच बुद्धीचा विषय नसल्यामुळें अविज्ञात तरी स्वतः ज्ञानस्वरूप असल्यामुळें जाणणारें आहे. आणखी या अक्षराहून दुसरें कांहीं पाहणारें नाहीं. हेंच अक्षर सर्वत्र दर्शनक्रिया करणारें आहे. तसेंच याहून दुसरें ऐकणारें नाहीं; तेंच अक्षर सर्वत्र ऐकणारें आहे.

---

१—सांख्यमताप्रमाणें अचेतन ( जड ) प्रकृति जगाचें मूळ कारण आहे.

त्याहून दुसरें मनन करणारें नाहीं; तेंच सर्वत्र सर्वांच्या मनाच्याद्वारें मनन करितें. त्याहून दुसरें जाणणारें नाहीं; सर्वांच्या बुद्धीच्या द्वारें जाणण्याची क्रिया करणारें तेंच अक्षर आहे; अचेतन प्रधान अगर दुसरें कांहीं नाहीं.

'हे गार्गी, खचित ह्या अक्षरांमध्यें आकाश गोवलेलें आहे.' जें प्रत्यक्ष व समक्ष ब्रह्म, जो सर्वांतर आत्मा, अशनायादिक संसारधर्मांच्या पलीकडे असणारा, ज्यांत आकाश गोवलें आहे, ती ) ही पराकाष्ठा, ही परागति, हेंच परब्रह्म, हेंच पृथिव्यादि आकाशापर्यंत सत्याचें सत्य होय.

**ऋचा १२--मग त्या गार्गीनें भाषण केलें, हे पूज्य ब्राह्मणांनो, तुह्मी याला नमस्कार करून आपली सुटका करून घेतली असतां, तीच मोठी गोष्ट असें माना. तुमच्यापैकीं या ब्रह्मवादीला जिंकणारा कधीं कोणी निघेल असें नाहीं. इतकें बोलल्यावर वाचक्नवी स्तब्ध राहिली.**

भाष्य—'मग त्या गार्गीनें भाषण केलें, हे पूज्य ब्राह्मणांनो,' माझें ह्मणणें ऐका—'तीच मोठी गोष्ट असें माना ? ती कोणती ? ह्या याज्ञवल्क्यापासून नमस्कारानें तुह्मी आपली मुक्तता करून घ्यावी हेंच फार असें माना; असा श्रुतीचा अभिप्राय, कीं ह्याला जिंकिणें मनांत देखील आणणें योग्य नाहीं; मग कृतीनें कोठून होणार ? कांतर तुमच्यापैकीं या ब्रह्मवादी याज्ञवल्क्याला जिंकणारा कधींही कोणी निघेल असें नाहीं. दोन प्रश्न सांगेल तर ( ह्याला तुमच्यापैकीं ) कोणी जिंकणारा होणार नाहीं, अशी मी पूर्वीच प्रतिज्ञा केली आहे, आता ही ब्रह्मवादित्वाच्यासंबंधानें माझी खातरी होत आहे कीं, या सारखा कोणी नाहीं. 'इतकें बोलल्यावर वाचक्नवी स्तब्ध राहिली.'

आतां ( मागील ) अन्तर्यामी ब्राह्मणामध्यें असें सांगितलें कीं, ज्याला पृथिवी जाणत नाहीं, आणि ज्याला सर्वभूतें जाणत नाहींत. ( आतां ) ज्या अन्तर्यामीला जाणत नाहींत ( तो परमात्मा ); व जे जाणत नाहींत ( ते क्षेत्रज्ञ ) आणि ( या ब्राह्मणांत ) जें पाहण्याची वगैरे क्रिया करीत असल्यामुळें सर्वांचें चैतन्यरूप बीज आहे, तें अक्षर असें ह्मटलें; पण या ( तिहीं-मध्यें ) फरक काय; किंवा सारखेपणा कोणता ?

ह्यासंबंधानें कांहीं लोक ह्मणतात—महासमुद्रस्थानापन्न परब्रह्मरूप अविकृत अक्षराची किंचित् बदललेली जी अवस्था ( तो ) अन्तर्यामी, अत्यंत बदललेली अवस्था ( तो ) क्षेत्रज्ञ. तो त्या अंतर्यामीला जाणत नाहीं ( असें वर्णन केलें ). ( ह्याशिवाय ) दुसऱ्या अशा पाच अवस्था आहेत, अशी ते कल्पना करितात. मिळून आठ अवस्था ब्रह्माच्या आहेत, असें ह्मणतात. दुसरे ( कांहीं ) लोक ( ह्या ) आठ अक्षराच्या शक्ति आहेत असें ह्मणतात; आणि अक्षराच्या अनंत शक्ति आहेत असेंही ह्मणतात. आणि दुसरे तर हे अक्षराचे विकार आहेत असें ह्मणतात.

---

१—येथें श्रुतीनें अक्षराला विज्ञानक्रियाकर्तृत्व सांगितलें, तें अचेतनाला संभवत नाहीं, ह्मणून सांख्य वगैरे अचेतन प्रकृति, कर्म, स्वभाव वगैरे जगाचीं मूळ कारणें आहेत असें ह्मणतात तें अग्राह्य आहे.

२—पहा. अध्याय ३ ब्राह्मण ८ ऋचा १-२. आचार्यांच्या मण्डळींपैकीं लोकांचें मत सांगतात.

३—आचार्यांनीं विकारपक्षांत अवयवपक्षाचाही समावेश केला आहे.

अवस्थापक्ष आणि शक्तिपक्ष तर जुळत नाहींत; कारण अक्षर अशनायादिक संसार धर्मांच्या पलीकडे असल्याबद्दल श्रुति आहे. अशनायादिकांच्या पलीकडे असणें, व अशनायादिक धर्म ज्या अवस्थेला आहेत त्या अवस्थेंत असणें हीं दोन्ही एके वेळींच एका वस्तला असणे संभवत नाहीं. तसेंच शक्तियुक्तत्वही ( अशनायाद्यतीत असल्यामुळें ) संभवत नाहीं. ( अक्षराचे ) विकार किंवा अवयव आहेत असें ह्मणण्यावर आक्षेप येतात ते चवथ्यांत दाखविले आहेत ह्मणून ह्या सर्व कल्पना खोट्या आहेत.

तर ( परमात्मा, क्षेत्रज्ञ, व अक्षर ) ह्यांमध्यें फरक कोणता ? फरक उपाधिमुळें होतो असें आह्मी ह्मणतों. त्याच्या स्वरूपांत फरक किंवा सारखेपणा मुळचा नाहीं; कारण मिठाच्या खड्याप्रमाणें एकसारखी चव ( आनन्द ) देणाऱ्या स्वभावाचा तो ज्ञानाचा गोळा आहे. "ज्याला पूर्व ( कारण ) नाहीं, ज्याला पर (कार्य) नाहीं, ज्याला आंत नाहीं, ज्याला बाहेर नाहीं." आणि "हा आत्मा ब्रह्म ( आहे )" अशी श्रुति आहे. आणि "बाहेर व आंत सुद्धां असतो व अज आहे." असें आथर्वणांत आहे, ह्मणून उपाधिरहित आत्म्याचें वर्णन करितां येत नसल्यामुळें, तो भेदरहित असल्यामुळें व एकरूप असल्यामुळें असा नव्हे, असा नव्हे असें सांगण्यांत येतें.

त्या आत्म्याला अविद्या, इच्छा व कर्म यांनीं युक्त देहेंद्रियाची उपाधि जडली, ह्मणजे संसारी जीव ह्मणतात. नेहमीं अत्यंत ज्ञानरूप शक्तीची उपाधि घेतली ह्मणजे आत्म्याला अंतर्यामी किंवा ईश्वर ह्मणतात. तोच उपाधिरहित स्वरूपानें केवळ शुद्ध असला ह्मणजे त्याला अक्षर किंवा पर ह्मणतात. तसेंच हिरण्यगर्भ, सूत्र, व्याकृत ( विराट ) देवता, जाति ( जल? ), पिण्ड ( पृथ्वी ), मनुष्य, पशु, पिशाचें वगैरे देहेंद्रियरूप उपाधीनीं युक्त त्या त्या नांवाचा, त्या त्या रूपाचा ( आकाराचा ) होतो. तसें ( उपाधीनें भिन्नपणा येतो ही गोष्ट ) "तें कांपतें तें कांपत नाहीं" या ठिकाणीं वर्णिलें आहे, ह्यामुळें "हा तुझा आत्मा" "हा सर्वभूतांचा अंतरात्मा" "हा सर्व भूतामध्यें गूढ" "तें तूं आहेस" "मीचें हें सर्व" "आत्मींच हें सर्व" "याहून दुसरा पाहणारा नाहीं" वगैरे श्रुति परस्पर विरुद्ध नाहींत. इतर कल्पना ( भिन्नपणा आहे अशा ) केल्या असतां ह्या श्रुतींचा मेळ बसत नाहीं; या कारणाकरितां उपाधिभेदामुळेंच ह्यांचा भेद आहे, अन्यरीतीनें नाहीं; कांतर सर्व उपनिषदांमध्यें एकच द्वितीय रहित अक्षर आहे असें निश्चयानें ह्मटलें आहे.

## अध्याय ३ ब्राह्मण ८ समास.

---

१—भिन्नभिन्नकाळीं भिन्नभिन्न शक्ति ब्रह्माला असतात असें ह्मण्टलें तर तितक्या अवस्था असतात असें ह्मणणें येतें. २—'अपूर्वमनपरमनन्तरमबाह्यम्' । बृह. २–५–१९ 'अयमात्मा ब्रह्म' । ४–४–५. ३ 'सबाह्याभ्यन्तरोह्यजः' । ( मुंड २–१–२ ) ४ 'तदेजति तन्नैजति' । (ईशा. ५) ५—'एष ते आत्मा' बृह. (३–६–३) ६–'एष सर्वभूतान्तरात्मा'. (मुंड २–१–४) ७–'एष सर्वभूतेषु गूढः । (कठ ३–१२) ८—'तत्वमसि' । (छा. ६–१२–१२) ९—'अहमेवेदं सर्वम्' । (छां.७–२५–१) १०—'आत्मैवेदं सर्वम्' । (छां.७–२५–२) ११—'नान्योऽतोऽस्ति द्रष्टा' ( बृह. ३–७–२३ )

# शाकल्य-ब्राह्मण.

## शारीरक (प्राण)

## अध्याय ३, ब्राह्मण ९.

ऋचा १—मग त्याला विदग्ध शाकल्यानें प्रश्न केला, याज्ञवल्क्या, देव किती आहेत? त्यानें (याज्ञवल्क्यानें) ह्या निविदेनेंच उत्तर केलें. जितके वैश्वदेव शस्त्राच्या निविदेनें वर्णिले जातात, (तितके) ह्मणजे तीन, व तीन शतें, आणि तीन व तीन सहस्रें. (विदग्धानें) ह्मटलें बरें, याज्ञवल्क्या, नक्की देव किती आहेत? तेहतीस. (विदग्ध) ह्मणाला बरें. याज्ञवल्क्या, नक्की देव किती आहेत? सहा. (विदग्ध) ह्मणाला बरें. याज्ञवल्क्या, नक्की किती देव आहेत? तीन. (विदग्ध) ह्मणाला बरें. याज्ञवल्क्या, निश्चित किति देव आहेत? दोन. (विदग्ध) ह्मणाला बरें. नक्की किती देव आहेत? दीड (विदग्ध) ह्मणाला बरें. याज्ञवल्क्या, खरे देव किती आहेत? एक. (विदग्ध) ह्मणाला, ठीक आहे. ते तीन व तीन शतें आणि तीन व तीन सहस्र देव कोणते ?

भाष्य—'मग त्याला विदग्ध शाकल्यानें प्रश्न केला.' (याज्ञवल्क्यानें) पृथिव्यादिकापैकीं सूक्ष्म, सूक्ष्मतर, व सूक्ष्मतम ह्या क्रमानें पूर्वींचें पूर्वीचे पुढच्या पुढच्या तत्त्वामध्यें गोवलेलें आहे, असें सांगून सर्वांच्या अभ्यन्तरांत असणारे ब्रह्माचा खुलासा केला; आणि त्या ब्रह्माचा प्रकट झालेल्या विश्वांतील भिन्न भिन्न सूत्रांत नियन्तेपणा (असतो तें) सांगितलें. प्रकट झालेल्या विश्वांत नियन्ता असल्याचें चिन्ह (ज्ञापक) अगदीं स्पष्ट आहें, हेंही (दाखविलें). त्याच ब्रह्मांत प्रत्यक्षपणा व परोक्षपणा, ज्या देवतांचें ब्रह्म नियमन करितें त्या देवतांची संख्या कमीजास्त झाल्यानें उत्पन्न होतो, हें समजण्यासारखें आहे, ह्मणून ह्या शाकल्य ब्राह्मणाचा आरंभ आहे.

मग त्या याज्ञवल्क्याला विदग्ध नांवाच्या शकलपुत्र शाकल्यानें प्रश्न केला कीं, याज्ञवल्क्या, देव किती आहेत ? त्या याज्ञवल्क्यानें ह्याच पुढील (संख्यादर्शक) निविदेनें, शाकल्यानें जी संख्या विचारिली, ती संख्या सांगितली. जितके देव वैश्वदेवशस्त्राच्या निविदेमध्यें आहेत (तितके). निविद ह्मणजे देवतांची संख्या दाखविणारीं कांहीं मन्त्रपदें वैश्वदेव शस्त्रांत ह्मणतात, त्या मंत्रपदांना निविद अशी संज्ञा आहे. त्या निविदेंत जितके देव ऐकण्यांत येतात तितके देव आहेत; पण ती निविद कोणती ? त्या निविदेंतील पदें (याज्ञवल्क्य) दाखवितो. तीन व तीन शतें; तीन देव आणि तीनशें देव; शिवाय असेच तीन व तीन

---

१—निविद ह्मणून 'वैश्वदेवशस्त्र' देवसंख्या मोजणारा ऋक्समुदाय आहे.

सहस्रें, इतके ( ३३०६ ) देव आहेत. शाकल्यानेंहि बरें, असें ह्मटलें. अशी यांची मध्यम ( गोळा बेरजेनें ) संख्या स्पष्ट समजली, पण त्या देवांची संकोच पावणारी ( कमी कमी होणारी ) संख्या ( विदग्ध ) विचारितो. याज्ञवल्क्या, नक्की किती देव आहेत ? ( त्यास प्रश्नानुक्रमानें ) तेहतीस, सहा, तीन, दोन, दीड, एक, अशीं उत्तरें दिलीं. देवांची संक्षिप्त व विस्तृत संख्या विचारिल्यावर पुनः परिगणित देवांचें स्वरूप विचारितो—ते तीन व तीन शतें, आणि तीन व तीन सहस्रें देव कोणते ?

**ऋचा २—त्यानें उत्तर दिलें; ह्यांच्या ( तेहतीस देवांच्या ) ह्या ( ३३०६ ) विभूतिच आहेत; परन्तु देव तेहतीसच आहेत. ते तेहतीस कोणते? आठ वसु, अकरा रुद्र, बारा आदित्य, मिळून एकतीस; व इन्द्र आणि प्रजापति मिळून तेहतीस.**

भाष्य—त्या दुसऱ्यानें ( याज्ञवल्क्यानें ) उत्तर दिलें, ह्या तेहतीस देवांच्या ह्या तीन व तीनशें वगैरे विभूति आहेत; परन्तु खरें ह्मटलें असतां तेहतीसच देव आहेत. ते तेहतीस कोणते ते सांगतो. 'आठ वसु, अकरा रुद्र, बारा आदित्य, मिळून, एकतीस;' व 'इंद्र आणि प्रजापति' ह्यांनीं तेहतीस संख्या पुरी होते.

**ऋचा ३—वसु कोणते ? अग्नि, पृथिवी, वायु, अन्तरिक्ष, आदित्य, द्युलोक, चंद्रमा, आणि नक्षत्रें हे वसु. ह्यांवर हें सर्व वसवलें आहे ह्मणून ते वसु.**

भाष्य—'वसु कोणते ?' ह्या प्रश्नानें त्यांतील प्रत्येकाचें स्वरूप विचारिलें आहे. अग्नि व पृथिवी वगैरे अग्न्यादिनक्षत्रांपर्यंत वसु होत. प्राण्यांच्या कर्मफलांस आश्रय होऊन, देहेंद्रियसमुदायरूपानें आणि ( देहांची ) राहण्याची जागा ह्या रूपांनीं परिणत होऊन, ( प्राण्यांच्या ) कर्मफलांस आश्रयीभत झाल्यामुळें व प्राण्यांस राहण्याला स्थल दिल्यामुळें हें सर्व जग वसवितात, आणि ( आपण ) त्यांत राहतात. ते ज्या अर्थी वसवितात त्या अर्थी त्यांस वसु ह्मणावें.

**ऋचा ४—रुद्र कोणते ? हे पुरुषाचे दहा प्राण[1] ( इंद्रियें ) व अकरावा आत्मा ( मन ) हीं जेव्हां या मर्त्य शरीरांतून उठून जातात, तेव्हां आप्तवर्गास रडवितात ह्मणून, ज्या अर्थी रडवितात त्या अर्थी, रुद्र होत.**

भाष्य—'रुद्र कोणते ?' पुरुषाचीं कर्मेंद्रियें व बुद्धींद्रियें मिळून दहाप्राण ( इंद्रियें ), व अकरावें मन, ते हे ( अकरा ) प्राण, जेव्हां प्राण्यांच्या कर्मफलभोगाचा क्षय होतो, तेव्हां ह्या नाशवन्त शरीरांतून उठून जातात. त्यावेळीं त्याशीं संबंध ठेवणारे आप्तांस रडवितात, ह्यावरून ज्याअर्थी संबंधी जीवांस रडवितात त्या अर्थी, ते रुद्र ( रडविणारे ) होत.

**ऋचा ५—आदित्य कोणते? संवत्सराचे महिने बारा, तेच आदित्य; कारण हे सर्वकांहीं घेऊन जातात. आणि ज्याअर्थी ते हें सर्व घेऊन जातात, त्याअर्थी आदित्य ( आददान ( घेणारे ) यन्त ( जाणारे ) होत.**

---

१ प्राण शब्द श्रुतींत इंद्रिय वाचकही असतो.

भाष्य—'आदित्य कोणते?' संवत्सराचे बारा महिने–कालभाग–प्रसिद्ध आहेत. हे आदित्य कसे ? हे पुनः पुनः फेरे खाऊन प्राण्यांचीं आयुष्यें, व कर्मफलें ( आददान ) घेऊन ( यन्ति ) जातात. आणि ते, ज्याअर्थीं या प्रकारें हें सर्व घेऊन जातात, त्याअर्थीं आदित्य होत.

**ऋचा ६–इन्द्र कोणता ? प्रजापति कोणता ? गरजणारा तोच इन्द्र. यज्ञ तो प्रजापति. गरजणारा कोण ? अशनि. यज्ञ कोण ? पशु.**

भाष्य–'इन्द्र कोणता ?' 'प्रजापति कोणता ?' गरजणारा तोच इन्द्र; यज्ञ तो प्रजापति. गरजणारा कोण? अशनि. अशनि ह्मणजे अर्थात् वीर्य (शक्ति), अर्थात् बल ( समुदायशक्ति ) जें प्राण्यांचा संहार करितें, तो इन्द्र; कारण इंन्द्रांचें[1] तें काम आहे. 'यज्ञ कोण? पशु' कां तर पशु यज्ञसाधनें आहेत. यज्ञ ( वस्तुतः ) अरूपी आहे. आणि पशुरूपसाधनाचा आश्रय करितो, ह्मणून पशु तेच यज्ञ असें ह्मणतात.

**ऋचा ७—सहा कोणते ? अग्नि, पृथिवी, वायु, अन्तरिक्ष, आदित्य, आणि द्युलोक हे सहा, कारण ह्या सहामध्यें हें सर्व आहे.**

भाष्य–'सहा कोणते?' तेच अग्न्यादिक वसु नावानें सांगितले. ते चंद्रमा व नक्षत्रें वगळून सहा बाकी राहतात; कारण हे तेहतीस वगैरे पूर्वीं सांगितलेले सर्व हेच सहा होत. वस्वादिक सर्व विस्ताराचा ह्या सहांत समावेश होतो.

**ऋचा ८—ते तीन देव कोणते ? हे तीन लोक आहेत तेच; कारण ह्यांमध्यें सर्व देव आहेत. दोन देव कोणते ? अन्न व प्राण. दीड देव कोणता ? जो हा वाहतो.**

भाष्य—'ते तीन देव कोणते? हे तीन लोक आहेत तेच.' पृथ्वी व अग्नि एकत्र करून एक देव, अन्तरिक्ष व वायु एकत्र करून दुसरा, द्युलोक व आदित्य एकत्र धरून तिसरा. तेच तीन देव होत. आणि ज्या अर्थीं ह्या तीन देवांत सर्व देव येतात त्या अर्थीं हेच तीन देव असा कांहीं नैरुक्तवादींचा पक्ष[2] आहे. दोन देव कोणते ? अन्न व प्राण हेच दोन देव होत. ह्यांमध्यें वर निर्दिष्ट केलेल्या सर्वांचा अन्तर्भाव होतो. दीड कोणता ? जो वायु वाहतो तो.

**ऋचा ९–त्या संबंधानें ह्मणतात कीं जो हा एकसारखा वाहत आहे, तो दीड कसा ? ज्याअर्थीं हें सर्व ह्या ( वायूमध्यें ) वाढलेलें आहे त्याअर्थीं दीड होय. एक देव कोणता ? प्राण. तो ब्रह्म 'त्यत्' ( तत्[3] ) असें ह्मणतात.**

भाष्य—त्या बाबतींत ह्मणतात ह्मणजे प्रश्न करितात कीं, हा वायु एकासारखाच ह्मणजे एकच वाहत आहे, तर दीड कसा ? ज्याअर्थीं हें सर्व ह्यांमध्यें वाढलेलें आहे, ह्मणजे वायु असतां हें सर्व अधिक वाढीस पावतें; त्याअर्थीं दीर्डे[4] ( अध्यर्ध ) ह्मणावा. एक देव कोणता ? प्राण.

---

१–या ठिकाणीं बलालाच लक्षणेनें इन्द्र ह्मटलें आहे. २–केवळ तीन लोक हेच तीन देव असा कांहींचा पक्ष व नैरुक्तवादींचा ' त्रयोलोका ' येथें तीन जोड्या घ्याव्या असा पक्ष आहे.

३–तत् ( चिनी लोकांचें ' तव् ' ) ब्रह्मार्थी आहे. ४ अर्ध ह्मणजे वाढ. अध्यर्ध वाढीसह एक ह्मणजे दीड–दीड हा शब्द अध्यर्ध–दिड्ढ–दीढ–दीड असा झाला आहे.

तो प्राण ब्रह्म आहे. सर्व देवरूप असल्यामुळें मोठा अर्थात् ब्रह्म होय. त्यावरून तो (प्राण) तें (त्यत्) असें ह्मणतात. 'तें' ह्या परोक्षवाचक शब्दानें ब्रह्म असें ह्मणतात. यावरून देव एक व अनेक आहेत असें होतें. देव अनन्त आहेत, त्याचा निविदपदांनीं निर्दिष्ट केलेल्या (३३०६) संख्येंत अन्तर्भाव होतो. त्यांचाहि क्रमानें तेहतीस वगैरे एका प्राणापर्यंत संख्येंत अन्तर्भाव करावा. एका प्राणाचाच अनन्त संख्येपर्यंत विस्तार आहे; ह्यावरून एक, अनन्त, किंवा दरम्यानच्या संख्यांनीं निर्दिष्ट केला तो प्राणच. आणि त्यांत एका देवाचींच (प्राणाचींच) नामें, रूपें, कर्में, गुण, व शक्ति हीं त्याचा भिन्न भिन्न अधिकार मनांत आणून, भिन्न भिन्न होतात.

**ऋचा १०—ज्या (प्राणाचें) आश्रयस्थान पृथ्वीच आहे, अग्नि हा डोळा (लोक) आहे, मन ही ज्योति आहे, अशा त्या पुरुषाला सर्व आत्म्याचें श्रेष्ठस्थान (तत्व) ह्मणून जो जाणील, तो जाणरारा पंडित होईल, याज्ञवल्क्या. (याज्ञवल्क्य)—सर्व आत्म्याचें श्रेष्ठस्थान ह्मणून सांगतोस तो पुरुष मीं जाणतोंच आहें. अरे जो हा शारीर पुरुष तोच तो, पुढें बोल (विचार) शाकल्या. (शाकल्य) त्याची देवता कोणती? अमृत असें (याज्ञवल्क्य) ह्मणाला.**

भाष्य—आतां त्या प्राणरूप ब्रह्माचीं भिन्न भिन्न आठ स्वरूपें सांगण्यांत येत आहेतः—

ज्या देवाचें पृथिवी हेंच आश्रयस्थान, अग्नि ज्याचा लोक (डोळा); ज्यानें अवलोकन करितो तो लोक; अग्निद्वारें पाहतो (अनुभवितो) असा अभिप्राय आहे. मन ही ज्याची ज्योत ह्मणजे संकल्पविकल्परूप कामें करण्यास जें ज्योतीप्रमाणें उपयोगी होतें; तो हा (प्राण) मनोज्योति ह्मणावा. पृथ्वीरूप देहयुक्त, अग्निरूप दृष्टियुक्त, मनानें संकल्प करणारा, पृथ्वीचा अभिमानी देहेंद्रियसमुदाययुक्त असा (तो प्राण) देव आहे असा अभिप्राय. ह्या गुणांनीं युक्त त्या पुरुषाला जो पूर्णपणें जाणील, आणि सर्व आत्म्यांचा ह्मणजे अध्यात्मिक देहेंद्रियसमुदायरूप आत्म्याचें तो श्रेष्ठस्थान (असें जाणील); (प्रत्येक पुरुषाला) आईच्या देहापासून त्वचा, मांस व रक्त मिळतात, तें क्षेत्र (शेत-जमीन) आणि बापाच्या शरीरापासून शुक्र, मज्जा, व अस्थि मिळतात, तें बीज त्याचें श्रेष्ठस्थान व इंद्रियांचें श्रेष्ठस्थान असें जाणील; तो पण्डित ह्मणावा. असा अभिप्राय जाणावा. 'याज्ञवल्क्या,' तूं त्या पुरुषाला जाणणारा नसूनही पाण्डित्याचा अभिमान धरणारा असावास, असा (या संबोधनाचा) तात्पर्यार्थ आहे.

जर तशा पुरुषाचे ज्ञानानें पाण्डित्य मिळत असलें, तर जो सर्व आत्म्याचें श्रेष्ठस्थान ह्मणून सांगतोस, तो पुरुष मी जाणतोंच आहें. यावर शाकल्याचें भाषण गर्भित घ्यावें कीं जर तूं त्या पुरुषाला जाणत असलास तर त्याचें कांहीं विशेषण सांग. (याज्ञवल्क्य ह्मणतो) त्याचें विशेषण आहे तें ऐक. '(अरे) तो हा शारीर' ह्मणजे पृथिव्यंश शरीरांत आईच्या तीन धातूंच्या रूपानें (जननीत्वानें) असणारा (असा अभिप्राय आहे); हे शाकल्या, तूं विचारिलास, 'तो हा देव' (प्राण); परन्तु त्याला दुसरें विशेषण द्यावयाचें आहे करितां 'हे शाकल्या, विचारच (पुढें विचार).' याप्रमाणें (शाकल्य) चिडविला तेव्हां, अंकुशानें पीडिलेल्या हत्तीप्रमाणें रागाच्या स्वाधीन होऊन, शाकल्य ह्मणतो—त्या शारीर

देवाची देवता कोणती? ज्यापासून जो उत्पन्न होतो त्याची ती देवता, असें ह्या प्रकरणांत सुचवावयाचें आहे. ( याज्ञवल्क्य ) ह्मणाला, अमृत. अमृत ह्मणजे खाल्लेल्या अन्नाचा जो रस होतो, तो आईच्या रक्ताला उत्पन्न करण्यास कारणीभूत होतो; कारण त्या अन्नरसापासून रक्त उत्पन्न होतें. तें स्त्रीच्या अंगांत असतें, आणि त्यापासून ( रचलेलें ) रक्तमय शरीर बीजाला आश्रय होतें.

**ऋचा ११-काम (वासना) च ज्याचें आयतन; हृदय ( बुद्धि ) ज्याचा डोळा; मन ज्याची ज्योति; अशा त्या पुरुषाला सर्व आत्म्याचें श्रेष्ठस्थान ह्मणून जो जाणील, तो जाणणारा होईल, याज्ञवल्क्या. सर्व आत्म्याचें श्रेष्ठस्थान ह्मणून ज्याला ह्मणतोस त्या पुरुषाला मीं जाणतों. तोच हा काममय पुरुष. बोल पुढें शाकल्या. त्याची देवता कोण ? ( याज्ञवल्क्य ) स्त्रिया असें ह्मणाला.**

भाष्य--बाकी सारखेंच. काम ( वासना ) च ज्याचें आयतन. काम ह्मणजे स्त्रीसंयोगाची इच्छा. काम त्याचें शरीर असा अर्थ घ्यावा. हृदय हा त्याचा डोळा. हृदयानें ह्मणजे बुद्धीनें पाहतो, असा जो काममय पुरुष तो अध्यात्म (शारीर) काममयच. त्याची देवता कोण? (याज्ञवल्क्य ) ह्मणाला, स्त्रिया. कांतर स्त्रियांपासून कामाचें उद्दीपन होतें.

**ऋचा १२--रूपें ( रंगच ) ज्याचें आयतन, चक्षु हें ज्याचें पहाण्याचें साधन, मन ( ही ज्याची ) ज्योति, अशा त्या पुरुषाला जो सर्व आत्म्याचे श्रेष्ठस्थान (तत्व) जाणील, तो जाणणारा ( पंडित ) होईल, याज्ञवल्क्या. सर्वात्म्याचें श्रेष्ठस्थान ह्मणून जें तूं सांगतोस, त्या पुरुषाला मी जाणतोंच आहे. आदित्यामध्यें जो पुरुष आहें, तोच हा. पुढें बोल, शाकल्या. ( शाकल्य विचारतो त्याची ) देवता कोणती ? (याज्ञवल्क्य) ह्मणाला सत्य.**

भाष्य--'रूपें ज्याचें आयतन' वगैरे. पांढरें, काळें रूप वगैरे ( हें त्याचें स्थान. ) जो हा आदित्यामध्यें पुरुष आहे, तो सर्व रूपांचें विशिष्ट कार्य आहे. त्याची देवता कोणती तर सत्य, असें ( याज्ञवल्क्य ) ह्मणाला. चक्षूला सत्य असें ह्मणतात. कारण शारीरिक चक्षूपासून अधिदैवत आदित्याची उत्पत्ति आहे.

**ऋचा १३--ज्याचें घर आकाश, कान ज्याचा लोक( डोळा ), ज्याचा ज्योति मन, ( अशा ) त्या पुरुषाला सर्व आत्म्याचें श्रेष्ठस्थान ह्मणून जो जाणील, तो ज्ञाता होईल, याज्ञवल्क्या. तूं ज्या सर्वात्म्याच्या श्रेष्ठस्थानाला सांगतोस, त्या पुरुषाला मी जाणतोंच आहें. जो हा कानांतील प्रतिश्रवण प्रसंगीं पुरुष गोचर होतो, तोच हा. पुढें बोल, शाकल्या. ( शाकल्य ह्मणाला ) त्याची देवता कोणती ? दिशा असें ( याज्ञवल्क्य ) ह्मणाला.**

---

१—' चक्षोः सूर्योऽजायत ' चक्षूपासून सूर्य जाहला. पुरुषसूक्त ' चंद्रमा मनसो जातः' इत्यादि.

भाष्य-'आकाशच ज्याचें आयतन' वगैरे. जो हा कानांत असणारा ( ऐकणारा ) परंतु प्रत्येक ऐकण्याचे वेळीं विशेष ( व्यक्त ) होतो ( ओ देतो ), त्याची देवता कोणती तर दिशा, असें ह्मणाला. कारण, हा शारीरिक पुरुष दिशांतून उत्पन्न होतो.

**ऋचा १४—तम ( अन्धकार ) च ज्याचें आयतन; हृदय ज्याचा लोक; (अवलोकनसाधन); मन ज्याचा प्रकाश; अशा त्या सर्व आत्म्याच्या श्रेष्ठस्थानाला जो जाणतों, तो जाणणारा होईल, याज्ञवल्क्या. ज्या सर्व आत्म्याच्या श्रेष्ठस्थानाविषयीं तूं सांगतोस, त्या पुरुषाला मी जाणतों आहें. जो हा छायारूप पुरुष तोच हा. पुढें बोल, शाकल्या. ( शाकल्यानें विचारलें ) त्याची देवता कोणती ? त्याची देवता मृत्यु.**

भाष्य-'तम हेंच ज्याचें आयतन' वगैरे. तम ह्मणजे रात्रीचा वगैरे अंधकार घेतला आहे. त्याचें स्थूल स्वरूप छायामय, अज्ञानमय ( प्रतिबिंब ) स्वरूप आहे. त्याची देवता कोण? असें विचारल्यावरून मृत्यु असें उत्तर दिलें. अधिदैवत मृत्यु ( ईश्वर ) त्याचा ( जीवाचा ) उत्पादक आहे.

**ऋचा १५—रूपें ( तेजें ) हींच ज्याचें आयतन आहे, चक्षु ज्याचा लोक, मन ज्याची ज्योति; असा जो सर्वात्म्याचें श्रेष्ठ अधिष्ठान आहे; त्यास जो जाणील तो, जाणता ह्मणावा, याज्ञवल्क्या. तूं ज्या सर्वात्म्याच्या अधिष्ठानाविषयीं सांगतोस, त्या पुरुषाला मी जाणतों आहें. जो आरशामध्यें दृष्टीस पडतो तो हाच पुरुष. पुढें बोल, शाकल्या. ( शाकल्य विचारतो ) त्याची देवता कोणती ? ( याज्ञवल्क्य ) ह्मणाला, प्राण.**

भाष्य-'रूपें ज्याचें आयतन वगैरे.' (बाराव्या ऋचेंत) पूर्वी साधारण रूपें सांगितलीं. ह्या ठिकाणीं प्रकाश देणारीं विशिष्ट रूपें ( तेजें ) घेतलीं आहेत. रूपाधिष्ठित देवतेचें विशेष स्थान प्रतिबिंबाला आधारभूत आरसा वगैरे होय. त्याची देवता कोणती विचारल्यावरून, त्या प्रतिबिंबसंज्ञक पुरुषाच्या उत्पत्तीला असु ह्मणजे प्राण कारण आहे असें सांगितलें.

**ऋचा १६—उदक हेंच ज्याचें आयतन, हृदय ज्याचा लोक, व मन ज्योति, असा सर्वात्म्याचें अधिष्ठान जो पुरुष त्याला जो जाणतो, तो पंडित होय, याज्ञवल्क्या. मीं त्या सर्वात्म्याच्या अधिष्ठानाला, तूं सांगतोस त्या पुरुषाला, जाणतों; जो उदकांत पुरुष असतो तोच हा. पुढें बोल, शाकल्या. ( शाकल्य विचारतो ) त्याची देवता कोण ? वरुण असें ( याज्ञवल्क्य ) ह्मणाला.**

भाष्य-'उदकच ज्याचें आयतन' वगैरे. साधारण सर्व उदकें ( त्याचें ) घर. विहिरी, कुवे, तळीं वगैरे यांत असणाऱ्या उदकांत ( त्याचें ) मुख्यत्वें रहाणें आहे. त्याची देवता कोणती तर वरुण आहे. ( मूत्रादि ) संचय करणारें शारीरिक उदक तेंच विहिरीवगैरेंतील उदक; त्याची उत्पत्ति वरुणापासून[१] होते.

---

१—सूर्यकिरणद्वारा पृथ्वीवर उदक पडतें. त्याला वरुण असें नांव आहे. आनन्दगिरि.

**ऋचा १७—वीर्यच ( रेत ) ज्याचें आयतन, हृदय हा लोक, मन ही ज्योति, अशा सर्वात्म्याच्या अधिष्ठानरूपी पुरुषाला जो जाणील, तोच तज्ज्ञ होईल, याज्ञवल्क्या. जो तूं सर्वात्म्याचें अधिष्ठान ह्मणतोस तो पुरुष मीं जाणतोंच. जो हा पुत्ररूप पुरुष तोच तो. पुढें बोल, शाकल्या. त्याची देवता कोण? प्रजापति असें ( याज्ञवल्क्य ) ह्मणाला.**

भाष्य–'रेतच ज्याचें स्थान;' तोच हा. रेतांतच पुत्ररूप पुरुष राहतो. तेंच त्याचे विशेष स्थान; त्यापासून अस्थि, मज्जा, व शुक्र हीं–पित्यापासून–झालेलीं आहेत. त्याची देवता कोणती तर प्रजापति असें ( याज्ञवल्क्य ) ह्मणाला; प्रजापति–ह्मणजे पिता असें ह्मणतात; कारण, पित्यापासून पुत्राची उत्पत्ति आहे.

**ऋचा १८—हे शाकल्या, अशी हाक मारून याज्ञवल्क्य ह्मणाला. ह्या ब्राह्मणांनीं तुला जणूं निखाऱ्याचें विझवणें ( विझवण्याचा चिमटा ) केला आहे.**

भाष्य–देवरूपानें, लोकरूपानें, व पुरुषरूपानें असे तीन तीन तऱ्हेचे आत्म्याचे भेद करून एक एक प्राणदेव उपासने करितां आठ प्रकारानें सांगितला आहे. आतां दिशाविभागानें पांच ठिकाणीं पांच प्रकारचा प्राण सांगितला. तो आत्मरूप आहे, असें गोळा बेरजेनें सांगण्याचा आरंभ आहे. ( दरम्यान ) शाकल्य स्तब्ध झाला. त्याला याज्ञवल्क्य भय उत्पन्न करावें, ह्मणून ह्मणतो; शाकल्या, अशी हाक मारून याज्ञवल्क्य ह्मणाला, तुला जणूं–मूळांतलि स्वित् तर्कार्थी आहे–ह्या ब्राह्मणांनीं खचित ज्यांत निखारे विझतात, असा चिमटा वगैरे तुला केलेला आहे; पण तूं तें जाणत नाहींस, तुझा आत्मा मी जाळीत आहें, असा ( याज्ञवल्क्याचे बोलण्याचा ) अभिप्राय घ्यावा.

**ऋचा १९—याज्ञवल्क्या, अशी हाक मारून शाकल्य ह्मणाला, अरे, कुरुपंचाल देशांतील ब्राह्मणांची निंदा ब्रह्म जाणणारा असून करतोस काय? ( याज्ञवल्क्य ) ह्मणाला, मीं दिशा, त्यांचे देव व त्यांचीं अधिष्ठानें जाणतों. शाकल्य म्हणाला, दिशा व देव व त्यांचीं अधिष्ठानें जाणत असलास तर ( बरें ).**

भाष्य–'याज्ञवल्क्या, अशी हाक मारून शाकल्य ह्मणाला' वगैरे. ( तूं ) जें हें कुरुपंचाल ब्राह्मणांविषयीं फाजील ( निंदापर ) बोललास कीं, ते स्वतः भ्याल्यामुळें तुला निखाऱ्याचें विझवणें केलें आहे ( तुला तोंडघशीं दिलें आहे ), तें हें ब्राह्मणांच्या निन्देचें भाषण तूं ब्रह्म जाणणारा असून बोलतोस कीं काय? याज्ञवल्क्य उत्तर देतो कीं, हें ब्रह्मज्ञान माझें इतक्या पुरतेंच आहे, कीं दिशा जाणत आहें, दिशासंबंधी पूर्णज्ञान मला आहे. तें केवळ दिशा ( जाणतों ) एवढेंच नाहीं; पण दिशा व्यापून राहणारे देवही जाणतों, आणि दिशांचें अधिष्ठानहि जाणतों. शाकल्य ह्मणतो, दिशा, देव, व त्यांचीं अधिष्ठानें जाणतों ह्मणतोस, तें तुझें ज्ञान सफल होवो.

---

१—चिमटा असें आचार्यांनीं ह्मटलें; पण निखाऱ्याचें भक्ष्य असाही अर्थ होईल.

ऋचा २०—( शाकल्य ह्मणतो ) या प्राची दिशेला तूं आहेस; प्राचीरूप आहेस असें घेतलें असतां तुझी देवता कोण? ( याज्ञवल्क्य )—आदित्य माझी देवता. ( शाकल्य ) तो आदित्य कशांत राहतो ? ( याज्ञवल्क्य )—डोळ्यांत. (शाकल्य)—डोळा कशांत राहतो? ( याज्ञवल्क्य )—रूपांमध्यें. ( शाकल्य )—डोळ्यांनें रूपें पाहतों, पण रूपें कशांत राहतात ? ( याज्ञवल्क्य ) ह्मणाला, हृदयांत; हृदयानेंच रूपें जाणतों. हृदयांतच रूपें ( प्रतिष्ठित ) स्थिर झालेलीं आहेत. ( शाकल्य )—होय; याज्ञवल्क्या, हें सर्व असेंच.

भाष्य–दिग्रूप तूं झाल्यावर तुझी देवता कोणती ? तो याज्ञवल्क्य आपल्या हृदयरूपाला पांच भागांनीं दिशांत वाटून देऊन दिग्रूपी झाला. आणि त्या रूपानें, सर्व जगत् आत्मरूप जाणून मीं दिगात्मा आहें, असें ह्मणून तद्रूप झाला; ( मग ) पूर्वेस तोंड करून ( शाकल्यास दिशा व त्यांचीं ) अधिष्ठानें सुद्धा ( मीं जाणतों असें ) भाषण केलें होतें; ज्या क्रमानें याज्ञवल्क्याची प्रतिज्ञा होती, त्याच क्रमानें ( शाकल्यानें ) प्रश्न केला कीं, ह्या ( पूर्व ) दिशेंत ( पूर्व दिशेकडे तोंड करून उभा ) तूं आहेस; तुझी देवता कोण ? सर्वदा देहामध्यें असतांना ज्या ज्या देवतेची पुरुष उपासना करितो; त्या त्या देवतेचें रूप त्याला इहलोकींच प्राप्त होतें. असेंच पुढें श्रुति सांगेल कीं " देव होऊन देवांप्रत जातो. "[1] ( आतां ) ह्या प्राची दिशेला तद्रूप तूं झाल्यावर कोणती देवता तुला व्यापून असते. या प्रश्नाचा अर्थ असा कीं, कोणत्या देवतेनें तूं प्राचीदिक्रूप पावला आहेस. दुसरा ( याज्ञवल्क्य ) उत्तर देतो कीं, प्राची दिशेला मीं आदित्य देवतेनें व्याप्त असतों, व आदित्य माझी देवता. ( कोणत्या ) देवतेसह ( दिग्रूप येतें ) हें सांगितलें; पण, तत्स्थानासह देवता सांगावयाच्या होत्या; ह्मणून ( शाकल्य ) ह्मणतो कीं, तो आदित्य कोठें प्रतिष्ठित आहे ? ( उत्तर ) डोळ्यांत. मन्त्रब्राह्मणांमध्यें असें ह्मटलें आहे कीं, अध्यात्म ( शारीरिक ) चक्षपासून आदित्य उत्पन्न झाला. " चक्षूपासून सूर्य झाला. "[2] " चक्षूपासून आदित्य[3] " वगैरे श्रुति आहेत. कार्य कारणांतर्गत असतें. चक्षु ( हें कार्य ) कशांत आहे ? रूपामध्यें. रूपविषय ग्रहण करण्याकरितां रूपमय चक्षु, रूपानें उत्पन्न केला आहे; ज्या रूपांनीं तो उत्पन्न केला, त्यांनींच आत्मा ग्रहण करण्याकरितां चक्षु उत्पन्न केला आहे. ह्मणून आदित्यासहवर्तमान, व प्राचीदिशेसहवर्तमान, व त्या दिशेला असणाऱ्या सर्व वस्तूसहवर्तमान चक्षु रूपामध्यें राहतो. चक्षुःसंयोगानें सबंध प्राचीदिशा रूपमय झाली आहे. तीं रूपें कशांत रहातात? असें विचारल्यावरून तीं हृदयांत राहतात, असें याज्ञवल्क्यानें उत्तर दिलें. हृदयांतून रूपें उत्पन्न होतात, व हृदयही रूपमय झालेलें आहे. ज्याअर्थीं हृदयाच्या साहाय्यानें सर्व लोकांस रूपज्ञान होतें, आणि हृदय हा शब्द बुद्धि व मन एकत्र करून योजला आहे; त्याअर्थीं हृदयांत रूपें रहातात, ( हें ह्मणणें योग्य आहे. ) हृदयांत वासनात्मक रूपांचें स्मरण होतें, त्यावरून हीं रूपें हृदयांत राहतात असा अभिप्राय आहे. असेंच हें याज्ञवल्क्या, ( असें शेवटीं शाकल्यानें ह्मटलें. )

---

१—" देवो भूत्वा देवानप्येति " बृह. ४–१–२.

२—" चक्षोः सूर्योऽजायत. " पुरुषसूक्त. ३—" चक्षुष आदित्यः " ऐ. १–४.

**ऋचा २१—ह्या दक्षिण दिशेला तूं आहेस; तुझी देवता कोणती ? (याज्ञवल्क्य)–यम माझी देवता. ( शाकल्य )–तो यम कोठें रहातो; (याज्ञवल्क्य)–यज्ञांत; ( शाकल्य )–यज्ञ कशांत राहतो? (याज्ञवल्क्य)–दक्षिणेंत. शाकल्य दक्षिणा कशांत आहे; (याज्ञवल्क्य)–श्रद्धेंत. श्रद्धा जेव्हां उत्पन्न होते, तेव्हां ( यजमान ) दक्षिणा देतो, ह्मणून श्रद्धेंत दक्षिणा राहते. (शाकल्य)–श्रद्धा कशांत राहते? (याज्ञवल्क्य) हृदयांत; असें म्हणाला. हृदयानें श्रद्धा जाणतो, व हृदयांतच श्रद्धा स्थिर राहते. ( शाकल्य )–होय, हें असेंच याज्ञवल्क्या.**

भाष्य—'ह्या दक्षिण दिशेला तूं आहेस, त्या वेळीं तुझी देवता कोण?' वगैरे पूर्वीप्रमाणें. दक्षिण दिशेला तुझी देवता कोणती? माझी देवता यम असें उत्तर दिलें. दक्षिण दिशारूप मीं झालों असतां यम माझी देवता. तो यम कोठें राहतो? असें विचारल्यावरून यज्ञांत असें उत्तर दिलें आहे. दक्षिण दिशेसहवर्तमान यम कारणरूप यज्ञामध्यें राहतो; पण यज्ञकारणापासून यमकार्य कसें होतें, ह्याविषयीं ह्मटलें आहे कीं, ऋत्विक् यज्ञ उत्पन्न करितात, तो यज्ञ, यजमान त्यांस दक्षिणा देऊन, विकत घेतो. आणि त्या यज्ञाच्या बलानें यमासहवर्तमान दक्षिण दिशा जिंकितो. ह्यावरून यम यज्ञाचें कार्य असल्यामुळें, दक्षिण दिशेसहवर्तमान यज्ञांत राहतो, असें ह्मटलें. यज्ञ कशांत राहतो? याचें उत्तर दक्षिणेंत. कां तर, दक्षिणा देऊन तो ( त्याचें पुण्य ) खरेदी करितो; ह्मणून यज्ञ हा दक्षिणेचें कार्य आहे. दक्षिणा कशांत राहते, असें विचारितां, श्रद्धेंत, असें उत्तर दिलें. श्रद्धा ह्मणजे देण्याचा स्वभाव किंवा भक्तिसहित आस्तिक्यबुद्धि. त्यांत दक्षिणा कशी राहते? तर ज्याअर्थीं जेव्हां श्रद्धा उत्पन्न होतें, तेव्हांच ( यजमान ) दक्षिणा देतो; श्रद्धेच्या अभावीं दक्षिणा कोणी देत नाहीं; त्याअर्थीं श्रद्धेमध्यें दक्षिणा राहते असें ह्मटलें. आतां श्रद्धा कोठें राहते? या प्रश्नावर हृदयांत, असें उत्तर दिलें; कां तर, श्रद्धा हृदयाची वृत्ति आहे. ज्याअर्थीं हृदयानें श्रद्धेचें ज्ञान होतें, आणि तद्रूप हृदयाची वृत्ति हृदयांतच राहते; त्याअर्थीं हृदयांतच श्रद्धेचा वास आहे असें ह्मटलें. त्यानंतर ( शाकल्य ) ह्मणतो, होय असेंच याज्ञवल्क्या.

**ऋचा २२—या पश्चिम दिशेस तूं आहेस, त्या वेळीं तुझी देवता कोण? ( याज्ञवल्क्य )–वरुण माझी देवता. ( शाकल्य )–वरुण कोठें राहतो ? ( याज्ञवल्क्य )–उदकांत. ( शाकल्य )–उदक कोठें असतें ? ( याज्ञवल्क्य )–रेतांत. ( शाकल्य )–रेत कोठें रहातें ? ( याज्ञवल्क्य )–हृदयांत. त्यावरूनच ( आईबापा ) सारखा झाला, असें ह्मणतात. जणूं हृदयांतून निसटला; जणूं हृदयांतून निर्माण झाला; कां तर हृदयांत रेत रहात असतें. हें असेंच याज्ञवल्क्या.**

भाष्य—'ह्या पश्चिम दिशेला आहेस तर तुझी देवता कोण?' त्या दिशेला असतांना वरुण माझी देवता. तो वरुण कोठें राहतो तर, उदकांत; वरुण उदकाचें कार्य आहे. "श्रद्धा तेंच उदक," "श्रद्धेंतून वरुणाला उत्पन्न केला;" अशी श्रुति आहे. उदक कशांत राहतें?

१—आरस शब्दाचा हाच अर्थ आहे–उरांतून निघालेला. २—'श्रध्दा वा आपः'
३—'श्रध्दातो वरुणमसृजत.'

या प्रश्नावर रेतांत, असें उत्तर दिलें. " रेतापासून उदक उत्पन्न केलें आहे. " अशी श्रुति आहे. रेत कोठें राहतें, तर हृदयांत; कांतर, रेत हृदयांतून उत्पन्न होतें. कामवासना होणें हृदयाची वृत्ति आहे. कामुक मनुष्याच्या हृदयांतून रेत पडतें, ह्मणूनच बापासारखा पुत्र झाला असें लोक ह्मणतात. ह्या बापाच्या जणूं हृदयांतून हा पुत्र बाहेर पडला; जणूं हृदयांतून निर्माण झाला; असें ह्मणतात. सोन्यांतून कुंडल उत्पन्न होतें, त्याप्रमाणें उत्पन्न होतो. ह्यावरून हृदयांतच रेताचा सांठा आहे. असेंच हें खरें याज्ञवल्क्या.

**ऋचा २३—ह्या उत्तर दिशेला आहेस; तुझी देवता कोण? ( याज्ञवल्क्य ) सोम माझी देवता. ( शाकल्य ) तो सोम कोठें राहतो ? ( याज्ञवल्क्य ) दीक्षेमध्यें. ( शाकल्य ) दीक्षा कोठें राहते? ( याज्ञवक्ल्य) सत्यामध्यें. म्हणूनच सत्य बोल, असें दीक्षिताला म्हणतात; कारण सत्यांतच दीक्षा असते. ( शाकल्य ) सत्य कोठें राहतें ? ( याज्ञवल्क्य ) हृदयांत; कांतर, हृदयानें सत्य जाणतो, आणि हृदयांतच सत्याची कायमची वस्ती आहे. ( शाकल्य ) असेंच हें, याज्ञवल्क्या.**

भाष्य—' या उत्तर दिशेला तुझी देवता कोण. ' वगैरे. ' सोम माझी देवता. ' सोम नांवाची लता आणि सोम देवता एकत्र घेऊन सोमसंज्ञा दिली आहे. तो सोम कोठें असतो, तर दीक्षेंत. यज्ञ करणारा ( दीक्षिणीया इष्टी केल्यावर ) दीक्षित झाला ह्मणजे, सोम विकत घेतो, व विकत घेतलेल्या सोमाचा याग करून ज्ञानी होऊन, उत्तर दिशेला जातो; त्या दिशेची अधिष्ठात्री देवता सोम असल्यावरून तिला सौम्या ह्मणतात. दीक्षा कशामध्यें राहते ? हें विचारल्यावरून सत्यांत असें ( उत्तर दिलें तें ) कसें? ज्याअर्थी सत्यांत दीक्षा रहाते; त्याअर्थी दीक्षिताला ( यजमानाला ) सत्य बोल असें ह्मणतात. कारणनाश होऊन कार्यनाश न व्हावा, असा ( सांगणारांचा हेतु असतो ). सत्यांतच दीक्षा राहते; पण सत्य कशांत राहतें ? असें विचारल्यावरून ( याज्ञवल्क्य ) ह्मणाला हृदयांत; कारण, हृदयानें यजमान सत्य जाणतो; ह्मणूनच हृदयांत सत्याची वस्ती आहे. ( असें बोलल्यावरून शाकल्य ) ह्मणाला असेंच हें, याज्ञवल्क्या.

**ऋचा २४—ह्या ( ध्रुव ) ऊर्ध्व दिशेला तूं आहेस, तेव्हां तुझी देवता कोणती? ( याज्ञवल्क्य ) अग्नि माझी देवता. ( शाकल्य ) तो अग्नि कोठें असतो ? ( याज्ञवल्क्य ) वाचेमध्यें. ( शाकल्य ) वाचा कोठें राहते ? (याज्ञवल्क्य) हृदयांत. ( शाकल्य ) हृदय कोठें राहतें?**

भाष्य—' ह्या ध्रुव दिशेला तुझी देवता कोणती '? मेरुपर्वताच्या आसमंतात् राहणाऱ्या लोकांना दिशाभेद होत नाहीं. ऊर्ध्वदिशाच नेहमीं दिसत असते. त्यामुळें तिला ध्रुव (निश्चल) असें ह्मटलें आहे. याज्ञवल्क्यानें उत्तर दिलें कीं, ( त्या दिशेला ) अग्नि माझी देवता. ऊर्ध्व दिशेला प्रकाश फार असतो, आणि प्रकाश हाच अग्नि. तो अग्नि कोठें राहतो? वाणींत. वाणी कोठें रहाते? हृदयांत. याज्ञवल्क्यानें आपलें हृदय सर्व दिशेला पसरलेलें असल्यामुळें, त्याला सर्व दिग्रूपें प्राप्त

१—' रेतसो ह्यापः सृष्टाः ' ( ' रेतस आपः ' ) ऐतरेय १-४.

झालीं होतीं. देवतासहित व आधारसहित दिशा, नामरूपें, व कर्मे यांशीं याज्ञवल्क्य एकरूप झाल्यामुळें, त्याला (दिशा) आत्मरूप झाल्या होत्या. रूप तितकें सर्व प्राचीदिशेसहवर्तमान याज्ञवल्क्याच्या हृदयांत साठविलें होतें. पुत्रोत्पत्तिरूप जें केवल कर्म तें ज्ञानासहवर्तमान,फलासहवर्तमान, व तदधिष्ठात्री देवतेसहवर्तमान, दक्षिण दिशा, पश्चिम दिशा, व उत्तर दिशा, ( ह्या सर्व दिशा ) कर्मफलरूप होऊन याज्ञवल्क्याच्या हृदयांतच येऊन बसल्या होत्या. ध्रुवदिशेसहवर्तमान एकंदर नामें वाणीच्याद्वारें हृदयांत सांठविलीं गेलीं. हेंच ( हृदयच ) आणखी सर्व रूपें, कर्मे, नांवें ह्मणून जीं आहेत, तीं सर्व हृदयरूपच आहेत. आतां सर्वरूप जें हृदय तें कोठें राहतें ? असा ( शाकल्याचा ) प्रश्न आहे.

**ऋचा २५—अहल्लिका, अशी हाक मारून, याज्ञवल्क्य म्हणाला, जर हें हृदय आपणास सोडून अन्य ठिकाणीं आहे असें मानितोस, अथवा जर हें हृदय आपणाहून अन्य ठिकाणीं असेल; तर कुत्रीं तें खातील किंवा पक्षी त्याचा चुरा करतील.**

भाष्य—अहल्लिक असें दुसरें नांव ठेवून, याज्ञवल्क्यानें हाक मारिली, आणि ह्मणाला. जेव्हां ( जर ) हें हृदय ह्मणजे ह्या शरीराचा आत्मा आपणापासून अन्य देशीं कोठें तरी असतो असें मानतोस; किंवा हें हृदय शरीराहून अन्य ठिकाणीं राहील; तेव्हां ( तर ) शरीर मृत होईल; व कुत्रीं त्याला खातील किंवा पक्षी त्याचा चुरा करतील; तुकडे ओढून नेतील. ( असें सांगून याज्ञवल्क्य सुचवितो ) कीं, शरीराचा आश्रय करून आत्मा आहे; व नाम, रूप, कर्मे हेंच शरीराचें रूप असल्यामुळें तेंही हृदयावर अवलंबून आहे.

**ऋचा २६—तूं आणि तुझा आत्मा, दोघे कोठें राहतां ? ( याज्ञवल्क्य ) प्राणांत. ( शाकल्य ) प्राण कोठें राहतो ? (याज्ञवल्क्य) अपानांत. (शाकल्य) अपान कोठें राहतो ? (याज्ञवल्क्य) व्यानांत. (शाकल्य) व्यान कोठें राहतो? (याज्ञवल्क्य) उदानांत. (शाकल्य) उदान कोठें राहतो? ( याज्ञवल्क्य ) समानांत. तो हा आत्मा असा नव्हे, असा नव्हे म्हणून ज्ञेय नाहीं; कांतर, त्याचें ज्ञान होत नाहीं; तो क्षय पावत नाहीं, म्हणून अशीर्य आहे; कोठें चिकटून राहत नाहीं, म्हणून असंग आहे; व तो अबद्ध ( बांधलेला नव्हे ) असा आहे; व म्हणूनच दुःख पावत नाहीं, किंवा विनाश पावत नाहीं. हीं आठ स्थानें, हे आठ लोक, आठ देव, व आठ पुरुष आहेत. जो कोणी त्या पुरुषांचा निश्चय करून, व ते सर्व आपले ठिकाणीं आहेत असें प्रत्ययास आणून, पलीकडे असतो, त्या उपनिषदांनीं वर्णिलेल्या पुरुषाविषयीं तुला माझा प्रश्न आहे. त्या पुरुषाची जर फोड करून मला न सांगशील, तर (शाकल्या) तुझें मस्तक पडेल. हे याज्ञवल्क्याचें म्हणणें शाकल्यानें मानलें नाहीं,**

---

१—दिवसां लीन होणाऱ्या—लपून राहणाऱ्या—भुतांना अहल्लिक ह्मणतात. हृदय कोठें आहे हें ठाऊक असून छळवादाकरितां प्रश्न केला, असें जाणून निंद्य नांवानें हाक मारली.

**तेव्हां त्याचे मस्तक तुटून पडलें, आणि त्याच्या अस्थि चोरांनीं नेल्या. त्यांस त्या अस्थि दुसरेंच कांहीं आहे असें वाटलें.**

भाष्य—हृदय व शरीर हीं आपसांत परस्परांचा आश्रय करून असतात, असें सांगितलें; व कार्यरूपी देह आणि कारणरूपी ( क्रियासाधनीभूत ) आत्मा हीं अन्योन्याश्रित आहेत, असें तूं ह्मटलेंस, ह्मणून तुला प्रश्न करितों कीं, तूं ह्मणजे शरीर आणि आत्मा ह्मणजे तुझें हृदय, हीं दोन्हीं कोणाचा आश्रय करून आहांत ? ( उत्तर ) प्राणाचा, देह आणि आत्मा प्राणावर ह्मणजे प्राणवृत्तीवर (चलनवलनांवर) अवलंबून आहेत. प्राण कोठें रहातो तर अपानांत. अपान ही प्राणाची वृत्ति आहे. अपानक्रियेनें प्राण बांधलेला नसता तर तो निघून जाता. अपान कोठें राहतो, तर व्यानांत. व्यान अपानाची वृत्ति आहे. मध्यें राहणाऱ्या व्यानानें अपानवृत्ति अगाऊ बांधलेली नसती तर, अपान व प्राण हे दोघे निघून जाते. व्यान कोठें राहतो, तर उदानांत. प्राणापानव्यान ह्या तिन्हीं वृत्ति ( वायूची चलनवलनें ) उदानरूपी खुंटीला बांधलेल्या नसत्या, तर चार चहूंकडे निघून जात्या. उदान कोठें रहातो, तर समानांत; कांतर, समानाच्या आधारावर ह्या सर्व वृत्ति अवलंबून आहेत. असें ( एके ठिकाणीं ) ह्मटलें आहे कीं, शरीर ( व ) हृदयांतील वायु एकमेकांचा आधार घेऊन समुदाय ( शक्ती ) नें बांधलेले असतात; आणि त्यांस विज्ञानमय ( आत्म्याच्या ) वांछेची प्रेरणा असते. यावरून हीं सर्व आकाशापर्यंत ज्याच्या नियमनांत आहेत, व ज्याच्या आधारावर आहेत, व ज्यांत गोंवलेलीं आहेत तें ( स्वतः ) निरुपाधिक, प्रत्यक्ष, व समक्ष ब्रह्म होय; हें दाखविण्याकरितां हा यत्न आहे.

‘ तो हा ’—जो असा नव्हे, असा नव्हे असें सांगून मधुकांडांत दाखविला–तो हा आत्मा अज्ञेय आहे ह्मणजे त्याचें ज्ञान होत नाहीं, हें कसें ? तर, तो सर्व कार्यधर्मांच्या पलीकडे असल्यामुळें अज्ञेय आहे; कांतर, ( बुद्धीनें ) त्याचें ग्रहण होत नाहीं. जी वस्तु व्यक्त झालेली असेल, ती इन्द्रियगोचर होऊन बुद्धिगोचर असते. पण हें आत्मतत्व त्याच्या उलट आहे. तसा तो अशीर्य आहे. शरीरासारखी जी वस्तु परमाणु एकत्र होऊन आकाराला येते, ती शरण ह्मणजे क्षय पावते; पण हा आत्मा त्याच्या उलट असल्यामुळें क्षय पावत नाहीं; ह्मणून अशीर्य आहे. तसेंच आत्मा असंग आहे. मूर्त ह्मणजे आकारयुक्त वस्तु असते ती इतर मूर्त वस्तूला चिकटवितां येते. आत्मा त्याच्या उलट असल्यामुळें कोणत्याही वस्तूला चिकटत नाहीं; ह्मणून असंग आहे. तसाच असित ह्मणजे अबद्ध आहे. मूर्त वस्तु बांधतां येते, पण हा त्याच्या उलट असून अबद्ध असल्यामुळें त्याला बंधनव्यथा होत नाहीं, ह्मणून त्याचा नाश ही होत नाहीं. बुद्धिग्राह्य होणें, क्षय पावणें, चिकटणें, बंधनांत पडणें वगैरे कार्याचे धर्म त्याला नसल्यामुळें, तो नाश पावत नाहीं, असें समजावें.

( प्रश्नांचा ) क्रम सोडून देऊन, उपनिषद्वर्णित पुरुषाची गोष्ट ( चालली होती ती ) बाजूस ठेवून श्रुतिरूपशब्दांनीं निजस्वरूपाचें धांदलीनें वर्णन केलें; पण पुनः आख्यायिकेचा क्रम धरून याज्ञवल्क्य ह्मणतो कीं, हीं ( पृथिव्यादिक ) आठ स्थानें वर्णिलीं; ‘ पृथिवी हीच ज्याचें स्थान आहे ’ वगैरे; अग्नि लोक वगैरे आठ लोक ( वर्णिले ); अमृत वगैरे आठ देव ( वर्णिले ); शारीरिक पुरुष वगैरे आठ पुरुष वर्णिले. जो कोणी ते शारीरादि पुरुष आहेत असें

निश्चयानें दाखवील, आणि ३२ भेदांनीं लोक व्यवस्था झाली आहे असें दाखवून, पुनः प्राची दिशा वगैरेंच्या द्वारानें ( पुरुष विभाग जिकडचे तिकडे ) लावून, उपाधिरूप हृदयादि ( दृश्य ) रूपापलीकडे जाऊन, शुद्ध स्वात्मस्वरूपानें राहील, तोच औपनिषद पुरुष. त्या ( औपनिषद पुरु षा ) ला भूक तहान वगैरे असत नाहीं; (तो औपनिषद ह्मणजे) त्याचें ज्ञान उपनिषदांचें अध्ययन केल्यानें होतें, इतर प्रमाणांनीं होत नाहीं. असा तो तूं विद्याभिमानी पुरुष आहेस, त्या तुला ( च ) विचारतों. त्या ( औपनिषद ) पुरुषाचें तूं मला स्पष्ट व्याख्यान करून न दाखविशील तर तुझें शिर तुटून पडेल; असें याज्ञवल्क्य ह्मणाला. पण शाकल्याचें तो औपनिषद पुरुष असें मत नव्हतें; व त्यास त्याचें विज्ञान झालेंच नव्हतें. ( त्यामुळें ) त्याचे शिर तुटून पडलें. गोष्ट झाली. तो औपनिषद पुरुष असे त्याचें मत नव्हते वगैरे श्रुतीचें ह्मणणें आहे.

आणखी ही ( श्रुति ) असें ह्मणते कीं, त्याच्या ( शाकल्याच्या ) अस्थि, त्याचे शिष्य संस्कार करण्याकरितां आपल्या घरीं नेत असतांनां, चोरांनीं चोरून नेल्या. ( चोरांनीं ) कां ( नेल्या? ) तर ( त्यांस त्या अस्थि गाठोड्यांत बांधलेल्या असाव्या आणि शिष्य ) धन ( नेत आहेत,) असें चोरांनां वाटलें. पूर्वकालीं झालेली गोष्ट ह्यांत सुचविली आहे. अष्टाध्यायींत समान वायूपर्यंत शाकल्याचा व याज्ञवल्क्याचा जो संवाद झाला तो दिला आहे; व त्यांत याज्ञवल्क्यानें शाप दिला कीं, "पुरांतें, अतिथ्यांतें तूं मरशील; व तुझीं हाडें ही तुझ्या घरीं पोहोंचणार नाहींत." त्याप्रमाणेंच तो मेला. त्याच्या अस्थि देखील, चोरांना हें कांहीं दुसरेंच आहे असें वाटल्यावरून, त्यांनीं उचलून नेल्या. याकरितां कोणीं कोणाशीं उलट वाद घालूं नये; कांतर एखादा ( याज्ञवल्क्यासारखा ज्ञानी ) प्रतिवादी भेटतो. वर सांगितलेली गोष्ट ( ब्रह्मवेत्त्याशीं नम्र ) असावें या बद्दल आहे; व ( ब्रह्म ) विद्येच्या स्तुतीदाखल आहे.

**ऋचा २७—मग ( याज्ञवल्क्य ) म्हणाला, हे पूज्य ब्राम्हणहो, तुमच्यापैकीं ज्याची इच्छा असेल त्यानें मला प्रश्न करावा, किंवा सर्वांनीं मला विचारावें. ( अगर ) तुमच्यापैकीं ज्याची इच्छा असेल त्यास मीं विचारतों; किंवा तुम्हां सर्वांना मीं विचारितों. त्या ब्राम्हणांचें धैर्य झालें नाहीं.**

प्रस्ताव भाष्य—ज्या ब्रह्माचें 'असा नव्हे असा नव्हे' असें अन्यनिषेधपर वर्णनानें व्याख्यान केलें; त्या ब्रह्माविषयीं तें असें आहे, असें विधिरूप वर्णन कसें करावें, हें दाखविण्याकरितां पुनः तीच गोष्ट धरून, विश्वाचें मूळ सांगावें, ह्मणून श्रुति ह्मणते. मागील गोष्टीचा संबंध इतकाच कीं, ब्रह्म न जाणणारे ब्राह्मणांचा पराभव करून गायी याज्ञवल्क्यानें घ्याव्या, हा न्यायच होईल, असें मानून श्रुति सांगत आहे.—

ऋग्भाष्य—'मग याज्ञवल्क्य ह्मणाला.' मग ब्राह्मण स्तब्ध बसले असतां (याज्ञवल्क्य) ह्मणाला. हे पूज्य ब्राह्मणहो ! तुमच्यापैकीं याज्ञवल्क्याला प्रश्न करावा अशी ज्याची इच्छा असेल त्यानें

१—बृहदारण्यकाच्या पूर्वीचा एक अष्टाध्यायी ग्रंथ आहे.

२—पुण्यक्षेत्र नाहीं अशा देशांत. ३—पवित्र तिथि नव्हे अशा काळीं.

पुढें येऊन मला विचारावें; ( किंवा ) तुह्मीं सर्वांनीं मला विचारावें; अथवा याज्ञवल्क्यानें आपणांस विचारावें अशी ज्याची इच्छा असेल त्यास, किंवा तुह्मांसर्वांस मी विचारितों. ते ब्राह्मण मुळींच धजावले नाहींत; ( याज्ञवल्क्यानें ) बोलाविलें असून कोणीही कांहींच प्रत्युत्तर देण्यास सरसावला नाहीं.

ऋचा २८—मग याज्ञवल्क्यानें त्यांस श्लोकरूपानें पुढील प्रश्न केले:—

जसा वनस्पती तरू । तसाच सत्य हा नरू ।
त्याचे केस पर्णपरी । शुष्क साल दोहोंवरी ।। १ ।।

भाष्य —ते ब्राह्मण तटस्थ झाले तेव्हां त्यांस श्लोकरूपानें पुढील प्रश्न केले. वनाचा पति लौकिकी वृक्ष जसा असतो—मूळांतील वनस्पतिशब्द तरूचें विशेषण आहे—'तसाच सत्य नरू' ( वृक्षासारिखा पुरुष हें ह्मणणें ) सत्य आहे. त्याचे केस–त्या नराचे केस एरव्ही तरूच्या पानां सारखे आहेत. त्या नराची बाह्य शुष्क त्वचा (चर्म) वनस्पतीच्या शुष्क सालीप्रमाणें आहे.

वाहतें चि हो रक्त ह्यांतुनी । चीक जेवि तो तरुत्वचेंतुनी ।
चर्म फाटतां रक्त ओसरे । वृक्ष तोडितां चीक पाझरे ।। २ ।।

भाष्य-—ह्या पुरुषाची ( त्वचा फाटली ह्मणजे ) त्यांतूनच रक्त वाहतें. वृक्षाची साल ( काढली ह्मणजे ) त्यांतूनच रसाचा प्रवाह फुटतो. ज्याअर्थीं वनस्पतीचें व पुरुषाचें हें सर्व सारखेंच आहे; त्याअर्थीं पुरुषाच्या त्वचेवर घाव घातला ह्मणजे त्याचें रक्त बाहेर जातें; तसेंच वृक्ष तोडला ह्मणजे त्याचा रस बाहेर पडतो.

मांसें याचीं, शकलें त्याचीं । अंतर्सोली स्नायुपरी ।
हाडें आंतिलं काष्ठें त्याचीं । मज्जा मज्जेपरी खरी ।। ३ ।।

भाष्य—ह्याप्रमाणेंच ह्या पुरुषाचीं मांसें ( लोचे ) असतात, तशीं वृक्षाचीं शकलें, असा अर्थ घ्यावा. वृक्षांचें 'किनाट' ह्मणजे शकलाच्या आंत ज्याचीं वल्कलें होऊं शकतात अशी लांकडाला चिकटलेली अंतर्साल असते, ती पुरुषाच्या स्नायूप्रमाणें बळकट असते. पुरुषाच्या अस्थि ह्मणजे स्नायूंच्या आंत हाडें असतात, त्याप्रमाणें 'किनाटाच्या' आंत लांकडे असतात. वनस्पतीची मज्जा पुरुषाच्या मज्जेप्रमाणेंच असते. अधिक दुसरें कांहीं नसतें. वनस्पतीची मज्जा तशी पुरुषाची, व पुरुषाची मज्जा तशी वनस्पतीची.

वृक्ष हा बळें तोडिला तरी । येतसे पुन्हा मूळ तें वरी ।
मर्त्य मृत्युनें छाटिला रयें । कोणत्या मुळीं वाढतो स्वयें ।। ४ ।।

भाष्य—वृक्ष तोडला असतांना पुनः पुनः मूळांतून नवा अंकुर फुटतो–वें पहिल्यापेक्षां टवटवीत होतो–मुळांत ( यत्– ) जरी–तरी असें ह्मटलें आहे; त्यावरून पूर्वीं वनस्पतीचा व पुरुषाचा सर्वस्वीं सारखेपणा दाखविला; परंतु वनस्पतींत एक अधिक गोष्ट दृष्टोत्पत्तिस येते ती ही कीं, तो तोडला तरी ( मूळ शिल्लक असतें त्यांतून ) पुनः वाढतो. परंतु पुरुष मृत्यूनें

( यमानें ) छाटिला तर त्याची पुनः वाढ दृष्टोत्पत्तीस येत नाहीं; पण कोठून तरी त्याची पुनः उत्पत्ति होत असावी; ह्मणून तुह्माला विचारितों कीं, यावत् मनुष्य मृत्यूनें तोडिला तर कोणत्या मुळापासून वाढतो. मरण पावलेल्या पुरुषाला कोणत्या तऱ्हेनें पुनः वाढ आहे ? हें ( याज्ञवल्क्यप्रश्नाचें ) तात्पर्य आहे.

रेतोद्भव ह्मणूं नका । रेत प्रेतां असेल कां ? ।
बीजोद्भव वनस्पती । बीजींच स्पष्ट जन्मती ॥ ५ ॥

भाष्य—वीर्यांतून मनुष्य पुनः उत्पन्न होतो असें ह्मणाल तर तसें ह्मणूं नका; कारण जिवंत पुरुषापासून वीर्य उत्पन्न होतें–मेलेल्या पुरुषापासून वीर्योत्पत्ति नाहीं. आणखी अशी गोष्ट आहे कीं, धान्यबीजापासूनही वृक्ष होतो, केवळ कलम लावल्यानें नवा वृक्ष वाढतो असें नाहीं. ( संस्कृत मूळांत ) 'इव' शब्द आहे तो निरर्थक आहे. वृक्ष देखत देखत ( स्पष्टपणें ) मरून जाऊन बीजापासूनही पुनः वृक्षाची उत्पत्ति होते.

मुळें उपटुनी वृक्ष काढिला । तो पुन्हा नसे जन्म पावला ॥
परी मर्त्य हा तोडितां यमें । वाढतो पुन्हा मूळ ना गमें ॥ ६ ॥

भाष्य—जर मुळें व बीज यासहवर्तमान वृक्ष उपटून टाकून दिला तर, तो पुनः उत्पन्न होऊन वाढणार नाहीं, ह्मणून मी तुह्मांस सर्व जगाचें मूळ विचारितों; मर्त्यप्राणी मृत्यूनें तोडून टाकिला तर तो पुनः कोणत्या मूळापासून वाढतो ? ( हें समजत नाहीं. )

जाहलाचि हा ? नाहिं, जन्मतो । त्या पुन्हा कोण जन्म घालितो ।
विज्ञानानंद तें ब्रह्म । दात्याची मुख्य ती गति ॥
तज्ज्ञ तन्निष्ठ पावती ॥ ७ ॥

भाष्य—तो झालेलाच आहे असें जर तुह्मी मानतां तर त्याविषयीं प्रश्न काय करावयाचा आहे ? अशी शंका घ्याल; कारण होणाऱ्याची उत्पत्ति विचारावी; झालेल्याची विचारूं नये. हा तर झालेलाच आहे, ह्मणून त्याविषयीं प्रश्नच योग्य होत नाहीं; असें ह्मणाल तर, ( श्रुति सांगते ) नाहीं. कांतर मेलेला पुनः होतोच ( असें मानिलें पाहिजे, न मानावें तर ) न केल्या कर्मांच्या फळाची प्राप्ति व केल्या कर्मांचा नाश होऊं लागेल; सबब मीं तुह्मांस विचारितों कीं मेला ह्मणजे त्याला पुनः कोण उत्पन्न करितो ? त्या ब्राह्मणांना, मेला ह्मणजे ज्यांतून पुनः उत्पन्न होतो, तें जगाचें मूळ, हें ठाऊक नव्हतें. त्यावरून याज्ञवल्क्य ब्रह्मनिष्ठ ठरून त्यानें ब्राह्मणांस जिंकिलें; व गायी घेतल्या. गोष्ट संपली.

जगाचें जें मूळ, आणि ( श्रुति ) शब्दानें ( प्रत्यक्ष ) असें वर्णिलें, व ज्याविषयीं याज्ञवल्क्यानें ब्राह्मणांना प्रश्न केला, तें निजरूपानें श्रुति आपणास सांगते. तें विज्ञान ह्मणजे शुद्धज्ञानरूप व आनंदरूप आहे. तें ज्ञान विषयज्ञानाप्रमाणें कोणत्याही दुःखानें अनुषक्त असत नाहीं. तें काय ( आहे, ह्मणाल ) तर, प्रसन्न, शांत, अनुपम, कष्टरहित, नित्यतृप्त, व एक ( मधुरानंद) रसात्मक तत्व होय; असें (शेवटीं–अध्याय समाप्तीला) श्रुति सुचवीत आहे. तें ब्रह्म कोणतें

हें दाखविण्याकरितां दोन विशेषणें दिलीं आहेत. 'राति' ह्मणजे धन (धनदान) हें मुळांतील प्रथमारूप षष्ठ्यर्थी आहे. ते धनाच्या दात्याचें–कर्मकर्त्या यजमानाचें–(शेवटचें) कर्मफल देणारें उत्तम स्थान आहे. शिवाय (त्रिविध) एषणांतून उठून जाऊन त्या ब्रह्मांतच जो कर्म न करतां राहतो तो तें ब्रह्म जाणतो, ह्मणन तन्निष्ठ तद्विदाला तेंच उत्तम स्थान होय.

ह्या (ऋचेच्या) संबंधानें पुढील विचार (लक्ष्यांत घ्यावा.) आनंदशब्द लोकांमध्यें सुखवाचक प्रसिद्ध आहे, पण ह्या स्थळीं आनंदशब्द ब्रह्माचें विशेषण ह्या स्वरूपानें श्रुत आहे, व आनंद तेंच ब्रह्म (असें ह्मटलें आहे). अन्य श्रुतींतही "आनंद तें ब्रह्म असें त्यानें जाणिलें." "ब्रह्मांचा आनंद जाणणारा" "ज्या अर्थी हें आकाश आनंदरूप होणार नाहीं" "जो भूमा तेंच सुख (आनंद)" "हाच श्रेष्ठ आनंद" इत्यादि श्रुति आहेत. जें सुख जाणिलें जातें त्याला आनंद ह्मणण्याचा प्रचार आहे. ब्रह्मानंद जर जाणण्यासारखा असेल तर ह्या आनंद शब्द ब्रह्मास लावणें योग्य होईल.

श्रुतिप्रमाणावरून ज्ञेय आनंदरूप ब्रह्म आहेच तर, त्याबद्दल काय विचार करावयाचा आहे? (अशी शंका आल्यास तसें) नाहीं; कारण विरुद्ध श्रुतिवाक्यें आढळतात. आनंद शब्द ब्रह्माला जोडलेला असतो, ही गोष्ट खरी; आणि ब्रह्म एकरूप घेतलें ह्मणजे तें विज्ञानरूप आहे, असें ह्मणतां येत नाहीं. "पण जेव्हां यांचें सगळें आत्मरूपच झालें तेव्हां कोणीं कोणाला पहावें, व कोणीं कोणाला जाणावें," "जेव्हां तो दुसरें कांहीं पहात नाहीं, दुसरें कांहीं ऐकत नाहीं, दुसरें कांहीं जाणत नाहीं, (तेव्हां) तो भूमा (महत्तम ह्मणावा)" "विज्ञानस्वरूप आत्म्यानें वेष्टिला गेला ह्मणजे बाहेरचें कांहींही तो जाणत नाहीं." इत्यादि विरुद्ध श्रुतिवाक्यें सांपडतात. त्यावरून विचारकरणें अवश्य आहे. वेदवाक्यांच्या अर्थाचा निर्णय करण्याकरितां ह्मणून, आणि मोक्षवाद करणाऱ्यांत विप्रतिपत्ति (विवाद) आहे ह्मणून, विचार करणें योग्य आहे.

सांख्यांपैकीं व वैशेषिकांपैकीं मोक्षवाद करणारे मोक्षस्थितीमध्यें जाणण्यासारिखा (संवेद्य) आनंद नाहीं, असा पक्ष घेऊन बसले आहेत. इतर वादी (आत्म्याला) अत्यंत आनंद स्वसंवेद्य आहे असें (ह्मणतात.) आनंद वगैरे श्रुत असल्यामुळें यांपैकीं योग्य पक्ष तो कोणता? "खातो खेळतो मौज करतो" "तो जर पितृलोकाच्या इच्छेनें युक्त होतो" "तो

---

१—आनंदो ब्रह्मेति व्यजानात्। तैतिरीय ३–६–१.

२—आनंदं ब्रह्मणो विद्वान्। तैतिरीय २–९–१, २–४–१.

३—यदेष आकाश आनंदो न स्यात्। तैतिरीय २–७–१.

४—यो वै भूमा तत्सुखम्। छां. ७–२३–१.

५—एष परम आनंदः। बृ. ४–३–३३.

६—यत्र त्वस्य सर्वमात्मैवाभूत्तत्केन कं पश्येत्। बृ. ४–५–१५.

७—"तत्केन कं विजानीयाद्यत्र नान्यत्पश्यति नान्यच्छृणोति नान्यद्विजानाति स भूमा"

८—"प्राज्ञेनाऽऽत्मना संपरिष्वक्तो न बाह्यं किंचन वेद" बृ. ४–३–२१.

[illegible]रमाणः" छां. ८–१२–३. १०—"स यदि पितृलोककामो भवति" छां. ८–२१.

सर्वज्ञ व सर्व जाणणारा आहे" "सर्व इष्ट फलें भोगितो" इत्यादि श्रुतीवरून मोक्ष स्थितींत जाणण्यासारिखें ( संवेद्य ) सुख आहे, असें ( होतें. )

शंका—(ब्रह्म) एकरूप घेतलें ह्मणजे क्रिया साधनांचा ( कारकांचा ) (ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान) असा विभाग पडत नाहीं; ह्मणून ज्ञान होण्याचा संभव नाहीं; कारण विज्ञान ही क्रिया आहे, आणि प्रत्येक क्रियेला अनेक क्रियासाधनें लागतात, ( असा दोष येईल; पण ) हा दोष येत नाहीं. वैदिकवचनें प्रमाणभूत असल्यामुळें आनंदरूप ब्रह्माचें विज्ञान होत असेल. तें विज्ञानरूप व आनंदरूप आहे; इत्यादि वेदवाक्यें ब्रह्माची आनंदरूपता जाणण्यायोग्य नसती तर अयोग्य होतील, असें आह्मी ह्मटलेंच.

समाधान–पण, अग्नि थंड आहे, व उदक जात्या ऊष्ण आहे असें वचन असलें तरी, अग्नि थंड व उदक ऊष्ण असूं शकत नाहीं. कारण (वस्तुधर्म) जाणवण्याचा मात्र वाक्यामध्यें गुण आहे. देशांतरामध्यें अग्नि थंड असतो, किंवा जेथें जातां येत नाहीं अशा अन्य देशांत उदक ऊष्ण असतें, असें वाक्यांनीं जाणवणें शक्य नाहीं; ( अशी ) शंका येईल, तर ती शंका नाहीं, कारण, प्रत्यगात्मस्वरूपामध्यें आनंद व ज्ञान प्रत्यक्ष आहे; तें विज्ञानरूप व आनंदरूप आहे; इत्यादि वाक्यांमध्यें अग्नि शीत आहे वगैरे वाक्याप्रमाणें प्रत्यक्ष ज्ञानाला विरुद्ध अर्थ दाखविण्याचा धर्म नाहीं. त्यांचा अर्थ प्रत्यक्षाला अनुरूप आहे असें अनुभवास येतें. मीं सुखी आहें असा आपला सुखीपणा आपण होऊनच कळतो. त्यावरून तीं वाक्यें अत्यंत प्रत्यक्षानुरूप आहेत; ह्मणून ब्रह्म आनंदरूप व विज्ञानरूप असून आपण होऊनच कळतें. अशा रीतीनें आनंदवर्णणाऱ्या "खातो, खेळतो, रमतो" वगैरे पूर्वोक्त श्रुति अन्वर्थ होतील.

सिद्धांत-(हें कांहीं खरें) नव्हें. देह किंवा इंद्रियें यांच्या अभावीं (आंनदाचे वगैरे) ज्ञान होतें असें ह्मणतां येत नाहीं. शरीरांचा (अगदीं) वियोग होणें हाच शेवटचा मोक्ष. आणि शरीराभावीं इन्द्रियें असूं शकत नाहींत; कारण त्यांस रहाण्यास जागा नसते. आणि मग देह व इंद्रियें नसलीं ह्मणजे विज्ञान असूं शकत नाहीं; आणि देहाद्यभावीं विज्ञान उत्पन्न होतें असें ह्मणावें तर देह किंवा इंद्रियें घेण्याचें मुळींच कारण नाहीं असें येऊं लागेल. शिवाय ( ब्रह्माच्या ) एकत्वास बाध येऊं लागेलः श्रेष्ठ ब्रह्म आनंदरूप असल्यास, नित्य विज्ञानरूप असल्यामुळें ( आत्म्याला ) नेहमीं जाणीलच, ( असें ह्मणाल तर तसेंही ह्मणतां येत ) नाहीं. संसारी मनुष्य घेतला तरी संसारांतून मुक्त झाला (आहे, असें ह्मटलें ह्मणजे) तो स्वस्वरूपाप्रत पावणार. तळ्यांत ओंजळभर पाणी टाकिलें तर तें पृथक् रहात नाहीं; ( त्याप्रमाणें मुक्त मनुष्य ) आनंद स्वरूप ब्रह्म जाणण्याला (पृथक्पणें राहूं शकत नाहीं.) त्या स्थितींत मुक्त आपल्या आनंदरूप आत्म्याला जाणतो हें ह्मणणें व्यर्थ आहे. आतां पृथक् राहून माझा आत्मा आनंदरूप आहे, असें जाणतो असें ह्मणावें तर (ब्रह्म) एक आहे, या सिद्धांताला विरोध येतो; आणि तसें घेतलें ह्मणजे सर्व श्रुति परस्पर विरुद्ध होतात.

---

१—"स सर्वज्ञः सर्ववित्." मुंडक १–१–९ न्यास १–१–९.

२—"सर्वान् कामान् समश्नुते." छा. ७–१०–२ तैतिरीय. २–५–१.

३—स्थूलसूक्ष्मादि शरीरांचा अगदीं वियोग होणें याचें नांव मोक्ष.

( मुक्त ब्रह्माहून भिन्न आहे व अभिन्नही आहे अशी ) तिसरी कल्पना योग्य नाहीं. ब्रह्माला निरंतर ( एकसारखें ) आत्मानंदविज्ञान आहे, असें ह्मटलें असतां, ( केव्हां ) विज्ञान असतें व ( केव्हां ) विज्ञान असत नाहीं, ही कल्पना व्यर्थ होईल. आत्मानंदाविषयीं ब्रह्माला निरंतर एकसारखें ज्ञान असणें हाच ब्रह्माचा स्वभाव आहे तर तें आनंद जाणतें अशी कल्पना अयोग्य होईल; ( कारण ) आनंदाचें ज्ञान होत नसतें त्या प्रसंगींच ती कल्पना यथार्थ असते. (कोणी मनुष्य) आपणाला जाणतो, व दुसऱ्यालाहि जाणतो असें ( पृथक् बुद्धि व पूर्वी अज्ञान असतें ह्मणून ) ह्मणतात. बाणावर वगैरे ज्याचें मन ( एकसारखें ) चिकटलेलें आहे, ( बाण व आपण जणूं एकच झाला आहे, ) त्याला बाणाचें ज्ञान आहे, किंवा नाहीं अशी कल्पना करणें यथार्थ होत नाहीं.

ज्याला खंड आहे अशा आत्मानंदाला तो जाणतो, ( असें ह्मणावें ) तर आत्मविज्ञानाला खंड झाला असतां, दुसरा विषय ज्ञानछिद्रामध्यें घुसण्याचा प्रसंग येईल; आणि आत्मा स्वस्वरूप बदलतो असें होऊन तो विकारयुक्त अनित्य नश्वर आहे असें ह्मणण्याचा प्रसंग येईल.

( हे सर्व दूर करावयाचें ) ह्मणून ब्रह्म विज्ञानरूप व आनंदरूप आहे हें श्रुतिवाक्य ब्रह्माचें स्वरूप वर्णन करण्यापुरतें आहे. ब्रह्मानें आत्मानंद जाणण्यासारखा ( संवेद्य ) आहे अशा अर्थाचें नाहीं. तो 'खातो खेळतो' वगैरे श्रुतिवाक्यांशीं विरोध येईल असें ह्मणाल तर, नाहीं. कारण, ब्रह्म सर्वात्मक असल्यामुळें जसें लक्षांत येईल तसें वर्णन करणारी ही श्रुति आहे. मुक्ताचा सर्वात्मपणा गृहीत झाला ह्मणजे कोठें योग्यांमध्यें किंवा देवांमध्यें असतांनां खाण्याचें वगैरे घडतें, त्या प्रमाणें त्याचें वर्णन करितात. आणि मुक्त पुरुष सर्वात्मा असल्यामुळें सर्वात्मरूप मोक्षाची स्तुति करण्याकरितां असें ह्मणतात.

जसा प्रसंग पडेल तसें ह्मणण्यात येतें; हा पक्ष घेतल्यास ह्याजकडे दुःखीपणाही येईल. योग्यांमध्यें खाणें वगैरे असतें त्याप्रमाणें स्थावरामध्यें असतांना दुःखीपणाही प्राप्त होईल, असें ह्मणाल तर नाहीं. सुखीपणा व दुःखीपणा वगैरे विशिष्टस्थितिनामरूपें दिलेल्या देहेन्द्रियांच्या उपाधीपासून भ्रांति उत्पन्न होते, त्या भ्रांतीमुळें आरोप केला जाऊन तीं उत्पन्न होतात, असें ध्यानांत आलें ह्मणजे सर्व शंकांचा परिहार होतो. परस्परविरुद्ध श्रुतींनीं काय दर्शविलें जातें हें आह्मीं ( पूर्वी ) सांगितलेंच आहे. ह्या कारणाकरितां "ह्याचा हा श्रेष्ठ आनंद" ह्या श्रुतीप्रमाणें सर्व आनंदवाक्यें आहेत असें जाणावें.

## अध्याय १ समाप्त.

---

१—'जाणतें' ह्मणणें आनंद न जाणण्याचा प्रसंग पडतो ह्मणून यथार्थ होतें.

२—बुद्धितत्व पृथक् कायम असतें व तद्द्वारा ज्ञान होत असतें तोंपर्यंत मी अमूक व दुसरा अमूक [illegible]न्य ज्ञान होतें एरव्हीं होत नाहीं; त्या प्रसंगीं जाणतों ह्मणणें योग्य असतें. परंतु ब्रह्माचा [illegible] स्वभाव असल्यामुळें अज्ञान प्रसंग नाहीं व तें आनंद जाणतें ह्मणणें योग्य नाहीं. हें [illegible]रण देऊन स्पष्ट केलें आहे. आनंदगिरि.

## Books by the same author.

### ( काशीनाथ बाळकृष्ण मराठेकृत ).

* १. रसायनशास्त्र ( आवृत्ति दुसरी ) .... .... .... .... .... ०-१२-०
Chemistry.

२. जीवनेंद्रियशास्त्र ( पहिली आवृत्ति ) .... .... .... .... .... ०-१२-०
Physiology.

३. भूवर्णन. .... .... ... ... .... .... .... ... .... ०-१२-०
Physical Geography.

४. ज्योतिःशास्त्र. ... .... ... ... .... .... .... .... ०-१२-०
Astronomy.

५. भूशास्त्र. ... .... .... .... .... .... .... .... .... ०-१२-०
Geology.

६. वनस्पतिशास्त्र. .... ... ... .... ... .... .... .... ०-१२-०
Botany.

७. न्यायशास्त्र..... ... .... ... .... .... ... .... .... ०-१२-०
Logic.

* ८. नावल व नाटक.... ... .... .... .... ... .... .... ०-४-०
An essay on Novels & Dramas.

* ( छापत असलेलें ) श्रीछान्दोग्योपनिषदाचें मराठी भाषान्तर—

अध्याय ३-४-५-६ .... .... .... .... .... .... ....

---

* हीं पुस्तकें रा. रा. विष्णु काशिनाथ मराठे घर नं. ७८४ सदाशिव पेठ पुणे. ...